
# बाईपणाच्या गोष्टी-२

स्वाती पाचपांडे



# या मित्रांनो! घेऊन जा! लुटा! लुटा! लुटून न्या!

# बाईपणाच्या गोष्टी-२

## हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो.

मजा येते.

पण

## तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हालाही आनंद मिळेल

### आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना हे पुस्तक मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

# बाईपणाच्या गोष्टी-२

लेखिका

स्वाती किशोर पाचपांडे,

# बाईपणाच्या गोष्टी-२


## लेखिका: स्वाती किशोर पाचपांडे,

12, प्रभूनक्षत्र, नवशा गणपती बसस्टॉप, गंगापूर रोड, नाशिक, 422013

व्हाट्सअप्प नंबर 9881274206

swtpachpande@gmail.com

चित्रकार: संतोष पाठक नाशिक :7350983700



या पुस्तिकेतील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (तुरुंगवास व दंड) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

# प्रकाशक :ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.in

www.esahity.com

esahity@gmail.com

eSahity Pratishthan

eleventh floor

eternity

eastern express highway

Thane.

Whatsapp: 7710980841

**प्रकाशन : २ डिसेंबर २०२०**

©esahity Pratishthan®2020

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे- आवश्यकआहे.



# सौ. स्वाती किशोर पाचपांडे

**BSc, MBA, MPM, BAMCJ**

**साहित्यभूषण** पदवी
(कुसुमाग्रज प्रतिष्ठान, नाशिक)

मुक्त विद्यापीठ MBA समन्वयक

छंद-लिखाण, गायन आणि वाचन

स्वाती पाचपांडे सन 2005 पासून नाशिकच्या विविध वृत्तपत्रांमधून सातत्याने सदरलेखन करत आहे तसेच 2007 पासून नाशिक आकाशवाणीवर रानजाईचे संवादलेखन करत आहेत. स्त्रियांचे भावजीवन उलगडून दाखवणारे त्यांचे सुनंदिनी हे पुस्तक 2018 मध्ये प्रकाशित झाले आहे.. व्यवस्थापन विषयावरील 100 लेख नुकतेच पूर्ण झाले आहेत. त्याच विषयांवर व्याख्याती म्हणून कार्यरत आहेत. आकाशवाणीवर सखी कार्यक्रमात सहभाग असतो.

आजवर अनेक नामांकित मासिके तसेच दिवाळी अंक ह्यातून कथालेखन केले आहे. त्यात माहेर, स्त्री, मिळून साऱ्या जणी, व्यासपीठ इत्यादी अंकांचा सामावेश आहे.

त्या लेवा सखी मंडळ नाशिक पदाधिकारी असून त्या माध्यमातून आजवर विविध सामाजिक उपक्रम राबवले जात आहेत. बराच काळ त्यांची विशेष कार्यकारी पदावर नेमणूक होती.

त्यांणी नाशिकच्या सावाना माध्यमातून अनेक वाचनप्रेरक उपक्रम घेतले आहेत. कृषीनगर येथील संत ज्ञानेश्वर सार्वजनिक वाचनालयाच्या सांस्कृतिक मंडळावर नियुक्ती झालेली आहे.

14 एप्रिल 2019 रोजी त्यांची दोन पुस्तके, मॅनेज मॅन 1 आणि मॅनेज मॅन 2, प्रकाशित करण्यात आली. दैनंदिन जीवनातील व्यवस्थेवर भाष्य करणारे मार्गदर्शक असे हे पुस्तक आहे. शैक्षणिक क्षेत्रात विद्यार्थी, शिक्षक ह्यांना उपयुक्त पुस्तक असा गौरव मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू श्री. सुहास पेडणेकर ह्यांनी केला.

# मनोगत..

लेखक हा भावनांशी जखडलेला माणूस असतो आणि मानवी भावभावनांचा गुंता त्याला आपल्या लेखणीद्वारे मोकळा करायचा असतो.. शब्दांच्या साहाय्याने जेव्हा गुंता मोकळा मोकळा होत जातो तेव्हा त्या निर्मितीला आपण साहित्य असे संबोधतो. साहित्याची बीजे त्याला आजूबाजूच्या वातावरणातून मिळत असतात.. काही प्रसंग असे असतात की जे काळजाला भिडतात आणि मग लेखणीतून झरझर उतरतात.

माझ्या प्रासंगिक सदरलेखनाला महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक असलेल्या महाराष्ट्र टाइम्स वृत्तपत्रातून वाव मिळाला आणि ते लिखाण वाचकांच्या मनापर्यंत झिरपत गेले.. वाचकांकडून मला उदंड प्रतिसाद मिळत गेला आणि मीच थक्क झाले.. मी जे शब्दातून मांडत असते अगदी तसेच किंवा थोड्याफार फरकाने वाचकांना देखील वाटत असते अशी जाणीव मला होते. इतकेच की मी ते सगळयांच्या मनातले कागदावर उतरवण्यास यशस्वी झालेली असते. जणू काही माझ्या शब्दांना पंख फुटले आहेत आणि ते त्यांच्यापर्यंत पोहोचले आहेत.. त्याक्षणी वाटले की माझे शब्द माझ्यासाठी संजीवनी ठरले आहेत.. शब्दांनी नाते जोपासली

गेली आहेत.. लिखाणवाचनाने समृद्ध अशी माणसे मी जोडली आहेत.. अशा रितीने लेखातले शब्द मला नेहमीच सन्मान देत गेले.. मग वाटले की ह्या शब्दांना पुस्तकांची छानशी चौकट द्यावी आणि वाचकांना ते लेख एकत्रितरित्या वाचता यावे याच हेतूने पुस्तकाची आखणी केली आहे. महाराष्ट्र टाइम्स वृत्तपत्राने त्यात प्रकाशित झालेल्या लेखांचा संग्रह करण्याची परवानगी देखील दिली.. गेल्या अडोतीस वर्षांपासून पत्रकारितेमध्ये ज्यांचे नाव आदराने घेतले जाते असे महाराष्ट्र टाइम्स नासिक समूहाचे निवासी संपादक श्री.शैलेंद्र तनपुरे यांनी माझ्या शब्दाला मान देत उत्कृष्ट अशी प्रस्तावना देखील लिहून दिली.2005 पासून मी वृत्तपत्रीय सदर लेखन करत असल्याची नोंद त्यांनी घेतली.अत्यंत बहुआयामी व्यक्तिमत्व लाभलेल्या तनपुरेसरांचे मनःपूर्वक आभार मानत आहे. महाराष्ट्र टाइम्स मैफल टीमचे प्रशांत भरवीरकर, अश्विनी पाटील तसेच गायत्री कुलकर्णी ह्यांचे देखील मनःपूर्वक आभार ज्यांच्या माध्यमातून माझे लिखाण सुजाण वाचकांच्या पर्यंत पोहचू शकले आहे.. लिखाणासाठी प्रेरणा देणाऱ्या माझ्या कुटुंबियांचे तसेच आप्तस्नेहीजनांचे देखील मी नेहमीच ऋण मानते.लिखाणासाठी विषय देणाऱ्या सख्यांचे मनापासून आभार..!

माझ्या पुस्तकाचे नाव आहे 'बाईपणाच्या गोष्टी'.. बाईपणाचा पसारा हा नेहमीच अफाट असतो आणि तो शब्दांच्या चिमटीत पकडण्याचा मी प्रयत्न केला आहे.ती तर कुटुंबाचा कणा असते. कुटुंबासाठी कुटुंबाच्या सुखासाठी तिचे सदैव धडपड असते.. त्या बाईचे मन जाणून घेताना आपण थक्क होत जातो.. तिचे भावोत्कट बोलणे खूप काही सांगून जाते आणि त्यातूनच तिचे अंतरंग उलगडत जाते.. ती जसे घर चालवते तसे विमानही चालवू शकते.. काळाची हाक ऐकत तिने आपला वेग वाढवला आहे आणि काळाच्या कसोटीवर स्वतःला सिद्ध केले आहे पण तिच्यातले बाईपण मात्र तेच आहे.. तिचे अंतरंग म्हणजे भावभावनांचे एक सप्तरंगी इंद्रधनू होय.. तिच्या आयुष्यातील विविध नातेसंबधांविषयी तिला नेमके काय वाटते हे जाणून घेणे गरजेचे असते.. तिच्या रोजच्या नेहमीच्या आयुष्यात खूप काही दडलेले असते.. विषय म्हंटले तर तसे अगदी साधे असतात पण ते जगण्यातील महत्त्वपूर्ण विषय असतात मग बाईपणाच्या गोष्टी ह्या जगण्याच्या गोष्टी वाटू लागतात.. तेच सर्व विषय सदरातून उलगडून दाखवले आहेत आणि त्यातूनच माझे हे पुस्तक साकारले आहे.. मला आशा आहे की माझे हे पुस्तक वाचकांच्या पसंतीस उतरणार आहे.

'किताबे करती है बाते बीते जमाने की..

दुनिया की.. इंसानों की.. आज की..

कल की.. एक एक पल की..

खुशियों की.. गमों की..

फुलों की.. जीत की.. हार की..

प्यार की.. मार की.. ' शायर सफदर हाश्मी यांच्या ह्या ओळी मला नेहमीच आवडतात आणि माझे पुस्तकप्रेम अधिकच बहरत जाते.. माझे हे पुस्तक देखील असेच जगण्यावरील भाष्य करणारे आहे.

बदलत्या काळाची हाक ऐकत पुस्तक डिजिटल स्वरूपात आणणाऱ्या ई साहित्य प्रकाशनचे मनःपूर्वक आभार..! ई साहित्य टीमचा हा प्रयत्न नक्कीच स्तुत्य आहे ज्यामुळे माझ्यासारख्या लेखकांना हक्काचे व्यासपीठ मिळाले आहे.. त्यांच्या अविरत कार्यास मी शुभेच्छा व्यक्त करत आहे.

## समाजजीवनाचा अलवार परिचय


शैलेन्द्र तनपुरे

स्वाती पाचपांडे या समाजजीवनातील विविध विषय अलवारपणे मांडणाऱ्या मनस्वी लेखिका आहेत. त्यांच्या लेखनाशी माझा परिचय साधारण पंधरा वर्षांपूर्वी आला. दै. गांवकरीच्या प्रतिमा या महिलांविषयक पुरवणीसाठी त्या लिहित असल्याने प्रथम त्यांच्या लेखनाचा व नंतर त्यांचा परिचय झाला. घर, कुटुंब, नातेसंबंध व त्याभोवती भिरभिरणारा समाज याला केंद्रस्थानी ठेवूनच त्यांनी बव्हंशी लेखन केले आहे. पुढे महाराष्ट्र टाइम्सच्या मैफल पुरवणीतही त्यांनी लेखनसंचार केला. बाईपणाच्या गोष्टी मांडतांना त्यांच्यातील प्रवाहपतीत न होणारी पण तटस्थपणे परस्परसंबंधाकडे पाहणारी व त्यातून सकारात्मक संदेश देणारी लेखिका प्रकर्षाने समोर येते. घराघरातील बारीक सारीक गोष्टींचा आठव त्यांच्या प्रत्येक कथेत येतो, तेव्हा त्यांच्यातील सूक्ष्मदर्शी व्यक्तिमत्वाचा उलगडा होतो. त्यातून त्यांच्या निरीक्षणशक्तीचा तसेच दांडग्या स्मृतीचाही परिचय होतो. सणवार, उत्सव, भांडीकुंडी, साड्या, दागदागिने आदी महिलांच्या जीवाभावाच्या विषयांना त्या हात घालतात तेव्हा ते चित्र एवढं जिवंत वाटायला लागतं की जणू त्या साऱ्या प्रसंगाचे आपण साक्षीदारच आहोत. एवढेच नव्हे तर पुराणातील गोष्टी, इतिहासातील संस्कार

आणि विद्यमान काळ व भविष्यात होणाऱ्या बदलांचा वेध असा सारा आसमंत त्या अलगदपणे उभा करतात. जमिनीशी नातं दृढ ठेवतांनाच आकाशाशीही ते संवादी करण्याचा त्यांचा आग्रह हा इतिहास, वर्तमान व भविष्याला बांधून ठेवणारा सेतू बनून जातो. स्वत: एक महिला असूनही अनेकदा त्या आपल्याच भगिनींच्या दोषांचीही थेटपणे चर्चा करतांना दिसतात, तेव्हा त्यांच्यातील तटस्थपणाचा प्रत्यय येतो. बाईपणाच्या गोष्टी त्या सांगत असल्या तरी त्यात पुरुषांबद्दल दुस्वास नसतो, किंबहूना हा भवसागर तरुन नेण्यासाठी या दोन्ही घटकांमधील संवादाची कशी आवश्यकता आहे, गरज आहे हेच अधोरेखित करण्याचा त्यांचा प्रयत्नही अनेक लेखांमध्ये दिसतो. लेख वा कथा लिहितांना त्या अनेकदा गाजलेले संगीत, चित्रपटातील गाणी, संताच्या रचना, शायरी, गझल असा विविधांगी खजिना उघड करतात तेव्हा त्यांच्या तील अष्टपैलुत्वाचे दर्शन होते. ललित लेखनात त्यांचा हातखंडा आहे. त्यातूनच अलगदपणे पुढे आलेल्या या बाईपणाच्या गोष्टी वाचकांना खिळवून ठेवतील, अशी खात्री आहे. स्वातीताईंना व त्यांच्या या पुस्तकास खुप खुप शुभेच्छा..

शैलेन्द्र तनपुरे

निवासी संपादक, महाराष्ट्र टाइम्स, नाशिक



**अर्पणपत्रिका**

**मोठी झालेली माझी समंजस मुले**

**तन्वी आणि सोहम..**

**ज्यांनी लिहितच जाणाऱ्या आपल्या आईला**

**नेहमीच समजून घेतले**

**आणि सदैव प्रेरणादायी शब्द दिले**


**अशा दोघांना**

**हे पुस्तक प्रेमपूर्वक अर्पण..!**

# अनुक्रम

**अजनबी तुम जाने पहचानेसे लगते हो..**
**समानतेची व्याख्या**
**माझे भांडायन..**
**धोना था मन भूल गया तू.. .**
**काय कसे काय ठिक ना सर्व..?**
**तू चाल पुढे..**
**मी असेन तुमच्यासंगे भोई..**
**अकेले है तो क्या गम है..**
**असेन मी.. नसेन मी**
**पासवर्ड नामक सुपरवर्ड..**
**आभासी वास्तव..**
**तू खिच मेरी फोटो..**
**काजव्याचे झाड..**
**काळजाला हवी रेंज..**
**माहेर माहेर.. मनाला मोहर..**
**ये रे घना ये रे घना.. .**
**मनाच्या उंबरठ्यावर.. ..**
**भय इथले संपत नाही.. .**
**मनी वसे ते चित्र दिसे..**
**घराचे झाले मंदिर..**
**महिला राजकारणातील एक प्यादे**
**चंद्र आहे साक्षीला..**
**बाईपणातील आईपण..**
**ओझे विरलेल्या क्षणांचे..**
**गेले द्यायचे राहून.. तुझे नक्षत्रांचे देणे..**

# बाईपणाच्या गोष्टी-१



# 26

# अजनबी तुम जाने पहचानेसे लगते हो..



आज नेहमीप्रमाणे घराजवळील बागेत प्रभातफेरीसाठी गेले होते.. चार राऊंड झाले तरी त्या नेहमी दिसणाऱ्या मावशी आल्या नव्हत्या.. गेल्या आठ दिवसांपासून त्यांची भेटच नव्हती तर काहीतरी चुकल्यासारखे वाटत होते.. मनाला उगाचच चुटपुट लागली होती.. मनात आले आपण साधा त्यांचा नंबर ही घेतला नाही.. कुठे असतील..?तब्बेत तर ठिक असेल ना..?हल्ली काय केव्हा कानावर येईल सांगता येत नाही.. तसे त्यांना गुडघेदुखी व्यतिरिक्त काही त्रास नव्हता.. मावशी कुठे अडकल्या असतील का..?तशा त्या अतिशय कर्तव्यदक्ष आहेत.. विचारचक्र सुरू झाले आणि अगदीच निराशा झाली की आजही त्यांची भेट झाली नाही.. मी बागेतून जड पावलांनी बाहेर पडले..

काही गोष्टी अगदी सवयीच्या झालेल्या असतात.. बागेत येणाऱ्या आणि ज्यांची आणि माझी अगदी तोंडओळख आहे अशा व्यक्तीमध्ये अडकणे कितपत योग्य आहे म्हणून थोडी स्वतःवर चिडचिड देखील झाली.. असे वरचेवर अडकणे योग्य

नाही त्याचा आपल्याच मनाला त्रास होतो असे म्हणत मनाची समजूत घालू लागले.. तरी कुठेतरी ठरलेल्या वेळी त्यांची वाट पाहणे काही सुटत नव्हते..

सहज आठवला आमच्या भेटीचा पहिला दिवस.. त्या दिवशी माझी लेक बारावीत जिल्ह्यात पहिली आली होती आणि माझा फोन सारखा वाजत होता.. अभिनंदनाच्या वर्षावात आईचे मन हरखून गेले होते.. आनंद कुणाला सांगू असे झाले होते.. आम्ही एका बाकावर बसलो आणि मी नकळतपणे त्यांना मुलीची यशोगाथा सांगितली.. त्यांनीही खूप भरभरून कौतुक केले.. आपल्या आनंदात सहभागी होणारे फक्त आपलेच लोक असतात.. सगळ्यांकडे असा मनाचा मोठेपणा नसतो.. कारण मी देखील त्या दरम्यान संमिश्र अनुभवांना सामोरे जात होते.. काहींचे कुचकट शेरे ऐकून थक्क व्हायला झाले होते.. रक्ताची नाती इतक्या परकेपणाने वागतात तेव्हा दुःख तर नक्कीच होते.. काय विशेष इतके मार्क्स मिळाले आता पूढे बघू ना कसे काय करते ते.. . खरतर अपयशाचे खापर ते अशा रितीने फोडत होते.. अशांना आत्मपरीक्षण करणे गरजेचे असते.. मग ठरविले की यश मनातच ठेवायचे.. साधेपणाने सांगत सुटायचे नाही.. आपले यश आपला आनंद सगळ्यांसाठी आनंददायी अनुभव असतो असे नाही.. अशा लोकांसमोर अबोल

राहणे शहाणपणाचे ठरते.. अपत्याने यश संपादन केले तर आईवडिलांचे मानसिक खच्चीकरण करण्यात आले.. अर्थातच नेहमीप्रमाणे मी ते सहजतेने घेतले.. नाते तोडले तर नक्कीच नाही.. उलट त्यांच्याबद्दल कणव दाटून आली.. यशाचा मार्ग सातत्यपूर्ण प्रयत्नात असतो आणि प्रत्येक यश हे सापेक्ष देखील असते.. यशाच्या वाटेवर आपल्या पुढेही अमाप जनसागर असतो ह्या वास्तवाचे भान ठेवावेच लागते.. त्यामुळे तात्कालिक यशाने हुरळून चालत नाही.. निखळ आनंद घ्यायला काय हरकत असते म्हणून आनंदाला पारावर राहत नाही हेही तितकेच खरे आहे.

हो.. पण तरीही मनातले समाधान सांगायला कुणीतरी हक्काचे हवे असतेच.. अशी आपली माणसे की ज्यांना आपल्या सुखात आनंद असतो.. पण ती आपल्यापासून कोसो मैल दूर असतात किंवा त्यांच्याकडे वेळेची वानवा असते.. बागेतल्या अनोळखी मावशी मला भेटल्या आणि मन रिक्त होत गेले.. त्या क्षणाची खरंतर ती माझी मानसिक गरज होती.. मी त्यांच्या मुलीच्या वयाची आल्याने त्याही एकेरीत येत मला मोलाच्या गोष्टी सांगू लागल्या.. त्यांची दोन्ही मुले डॉक्टरेट झालेली होती.. त्यांना पण असेच एकटे पाडले गेले होते.. मुलांना मदत लागेल तसे त्या जाऊन राहत असत.. सुनांचे मुलींसारखे लाडकोड करायच्या..

बोलण्यात कधीही नकारात्मक संभाषण नसायचे.. किंवा कुणावर दोषारोप नसायचे.. कधी कधी मला त्या खूप उत्तुंग भासायच्या.. त्या स्वतःही निवृत्त प्राध्यापिका होत्या.. आता मात्र नातवंडे सांभाळण्याच्या व्यापात साधा पेपर वाचायला त्यांना वेळ मिळत नव्हता.. ज्यांना खूप वाचन करायचे होते.. हे त्या हसत हसत सांगत होत्या.. आपली उपयुक्तता वाढवलीच पाहिजे असे म्हणायच्या.. मी खूप काही शिकत होते.. ओळखीच्या लोकांना जे सांगता येत नाही ते ह्यांना सांगता येत होते.. त्या मला वेड्यात काढत नव्हत्या किंवा अर्थाचा बेअर्थ देखील करत नव्हत्या.. किंवा मी अभिमानाने सांगते त्यात त्यांना गैर वाटत नव्हते कारण घेतलेल्या कष्टांची त्यांना जाणीव होती.. कधीतरी म्हणायच्या की तू काल नेमकी भेटली नाहीस.. मुलाने मोठी कार घेतल्याचे सांगायचे होते.. जाऊ शेजारी राहते पण तिला अशा सुवार्ता सांगितल्या की वाटते की मी तिला खिजवत आहे.. माझ्या मुलाने कष्ट केले तर त्याला फळ मिळत आहे.. असो..

हं.. तर अशा त्या मावशी ज्यांचे मला पुरते नाव आडनाव माहीत नाही त्यांच्याशी बोलणे सवयीचे होत गेले.. आता ठरविले की भेटल्या की फोन नंबरची देवाणघेवाण करू या.. मनात किती साचले आहे जे त्यांना सांगायचे आहे.. मनात कुठेतरी

एकटेपणाची भावना होतीच.. तितक्यात त्या समोरून घाईघाईत येतांना दिसल्या.. 'अग आपली भेटच नाही.. तुझ्याशी संपर्क साधता येईना.. . काका आजारी होते तर त्यांची सुश्रुषा करतांना पार दमछाक झाली ग पण आता बरे आहेत.. म्हणून तुला भेटायला आले.. मिळाली का ग तुझ्या मुलीला शिष्यवृत्ती..?खूप हुशार आहे ग ती.. मला खुप वेळा आठवण आली बघ .. '.. आमची संभाषणाची गाडी पुन्हा मुळ पदावर आली.. यशस्वी लोकांकडे अयशस्वीतेचे किस्से देखील असतातच जे सांगितले की बोच हलकी होते..

त्या म्हणाल्या .. 'आता काकांना वेळ द्यावा लागेल.. इकडे येणे होईल असे नाही.. घराजवळ चकरा मारत जाईन.. ' क्षणभर मी व्याकुळ झाले की आता भेटीत खंड पडेल मग मी कुणाला सांगू माझ्या संसाराचे कोडकौतुक..?…पण मी सावरत म्हणाले की भेटू या ना अधुनमधून असेच आणि इथेच.. ' इच्छा असूनही फोननंबर घेतला नाही.. त्यांनीही नाही मागितला.. आम्हाला दोघींना जणू काही त्या बाबतीत अनोळखीपणाचा आनंद घ्यायचा होता.. अतिपरिचयात अवज्ञा व्हायला आम्ही घाबरत होतो की काय..?पुन्हा वाटले हे तर आपल्या मनाचे खेळ आहेत.. प्रत्येक भेटीला काही ना काही आयुष्य असतेच असते आणि प्रत्येक

भेटीला शेवटही असतोच असतो.. मग सवयीचा अट्टाहास हवा कशाला.. बस युही चलते रहेंगे.. चलते रहेंगे.. खुशीया बाटते रहेंगे..

# 27

# समानतेची व्याख्या



आज सुटीचा दिवस.. नेत्राने घर आवरायला घेतले होते.. चहा करायला गेली तर साखरेच्या डब्याचे झाकण काही केल्या उघडत नव्हते.. ती स्वतःवरच वैतागली.. मग उंचावरील डबा काढायचा होता.. माळ्यावरील सामान आवरायचे होते.. ऑनलाईन बँकिंग करतांना पासवर्ड बदलायचा होता.. आत्मविश्वास आहे पण तरीही तो सोबत असला की निर्धास्त वाटते.. स्वयंपाकघराचा तो कप्पा खुणावत होता.. न वापरातील भांडी तिथे ठेवायची होती.. नकोच पण आज ही कामे.. कंटाळा आलाय तो असला की जबाबदारी विभागल्यासारखी वाटते.. अरे पण कशी काय होणार इतकी सारी कामे..?सुटी सार्थकी लागली पाहिजे ना.. !निशांत हाताशी असला की दोघे मिळून कामे पटापट उरकत असत.. एरवी दोघेही नोकरीवर जायचे त्यामुळे घराकडे जरा दुर्लक्षच होत असे.. आज मात्र निशांत टूरवर गेला होता त्यामुळे राजराणीच्या संसारात नीरव

शांतता होती.. राणीला करमत नव्हते.. बघता बघता लग्नाला पाच वर्षे झाली होती आणि एकमेकांना एकमेकांची सवय होऊन गेली होती.. पण असेही ठिक नाही म्हणत मरगळ झटकत नेत्रा उठली आणि कामाला लागली..

काही कामे अगदी लहानसहान होती पण तिच्या लक्षात आले की ही सगळी तांत्रिक कामे आपण निशांतच्या खात्यावर सोपवली आहेत.. तिला एकदम हसू आले.. मीही इंजिनिअर आहे पण मला असे का वाटतेय की हे सिमेंटच्या भिंतीवर खिळे ठोकण्याचे काम त्यालाच जमेल.. मिक्सर बिघडले आहे तोच बघेल.. टेरेसवर ट्यूब लाईट नाही त्याला सांगितले पाहिजे.. अरे हो आणि कार आवाज करतेय त्याला सांगायला हवे.. सुटीच्या दिवशी तो जास्त वेळ लोळत राहिला का तिचे रक्त उकळत असे.. ती त्याला त्याने करायच्या कामांची यादी देत असे.. आज्ञा राणीसरकार असे म्हणत तोही कामाला लागत असे.. घरातले जड सामान हलवायचे तर ते एकटीचे काम नाही बाई असे ती म्हणायची.. घर दोघांचे.. संसार दोघांचे तर दोघांचेही योगदान हवेच हवे असे म्हणत दोघे घर आवरत असत.. तोही भाजी निवडू लागत असे.. वेळप्रसंगी भांडी ही विसळत असे.. त्यात एकमेकांवरील प्रेम नक्कीच कारणीभूत होते.. त्या आठवणीने

तिला स्वतःशीच हसू आले.. कितीही स्त्री पुरुष समानतेचा डंका वाजवला तरी वास्तव हे असे काहीसे होते.. ती त्याच्या खांद्याला खांदा लावत प्रत्येक क्षेत्रात कार्यकुशल आहे तरीही असे का वाटतेय की हे त्याचे काम आहे किंवा हे काम त्यालाच जमू शकते.. स्वतःवर शंका घेत ती त्या त्याच्या कामाला धजत नसे.. दोघांचे संसारातील कार्यक्षेत्र जणू काही ठरवून घेतलेली असतात.. त्यात कुठेही अहंकाराला जागा नव्हती.. ज्याला जे सोईचे वाटते किंवा जो जे काम सहजतेने करू शकतो त्याने ते करावे असा कार्यकारण भाव त्यामागे होता.. . ठरविले तर त्याचे काम ती करू शकत होती.. पण लहानपणापासून मनावरील पगडा म्हणा की सार्वमत म्हणा समाजानेच कार्यविभागणी करून दिली आहे.. साधा चहा जरी करायला सांगितले तर तो ओटाभर पसारा घालत असे की नको बाबा तुझी स्वयंपाकघरातील लुडबुड असे ती लटक्या रागाने म्हणत असे.. नकळत तो कामे वाढवून ठेवत असे.. आता आज मात्र तिला घर आवरायचे तर त्याची अनुपस्थिती जाणवत होती..

तितक्यात मैत्रिणीचा फोन आला की त्यांच्या शहरात खूप प्रतिक्षेनंतर एक छानसे नाटक आले आहे तर ती तिकीट काढून ठेवणार आहे.. नेत्रा म्हणाली नको ग रात्री येतांना उशीर होईल.. एकटीने नको वाटते.. मैत्रिणीने खूप आग्रह केला पण ही मात्र ठाम

होती न जाण्यावर.. तिची थोडी स्वतःवरच चिडचिड झाली की आपण का असे बदलत चाललो आहोत..?सगळीकडे तोच कशाला हवा सोबत..?मनात आणले तर जाऊ शकते मी पण.. आणि त्याचे तसे काहीही म्हणणे नसते.. दोघांनी एकमेकांना मनसोक्त स्पेस दिली आहे.. इतकी स्पेस की आता हवा अगदी खेळती राहते दोघांच्या मनात.. मग तिने घरातच राहणे पसंद केले.. एरवी तो असला की काही कामे होतच नाही म्हणून आवडते पुस्तक वाचायला घेतले तर त्यातही मन लागेना.. अगदी एकटीने टीव्ही पाहणे ही नको वाटले.. तिथे गाणे लागले होते.. 'प्यार करते है हम तु म्हे कितना.. दो आँखे तो क्या दो जहाँ मे समाये ना इतना.. ' तिला मनापासून हसू आले.. . 'तू इस तरह मेरे जिंदगी मे समा है.. ' त्याच्या आठवणीने ती एका आंतरिक समाधानाने मोहरून आली.. आपल्या नात्याबद्दल विचार करू लागली.. संसारात दोघांचे ध्येय एकच असले की सगळे काही सोपे होत जाते.. ध्येय म्हणजे हेच की एकमेकांना सुखी करणे.. आनंदी ठेवणे.. तुतु मैमैं तर असणारच.. भांड्याला भांडेही अधूनमधून वाजत राहणार.. तो तर नात्यातला जिवंतपणा आहे.. परिपूर्ण दोघेही नाहीत म्हणून परिपूर्णतेचा अट्टाहास देखील नाही.. सहजीवन त्यामुळेच फुलत आहे.. बहरत आहे..

नेत्राने सहज एक स्त्रीवादी मासिक वाचायला घेतले.. आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त तो एक विशेष अंक छापण्यात आला होता.. एकंदरीतच अंकाचा सूर हाच होता की स्त्रीवर खूप अन्याय होत आहे.. स्त्रियांनी सजग झाले पाहिजे इत्यादी इत्यादी.. नेत्राला वाटले आपले भांडण किंवा मतभेद पुरुषांशी नाही तर विकृत पुरुषी मानसिकतेशी आहे पण विषय काहीसा भरकटत चालला आहे.. सगळीकडे सगळेच काही खरे असते असे नाही आणि एकच मापदंड सगळीकडे लावून चालतही नाही.. कुठेतरी गंभीर अन्याय घडत असतो आणि त्यामुळे सकल पुरुषजातीला दूषणे लावली जातात.. पुरुषसत्ताक समाज तर नक्कीच आहे पण त्या पुरुषप्रमाण पद्धतीसमवेत चालतांना तिला सोपे वाटत होते कारण तिच्या आयुष्यात आलेल्या सर्वच पुरुषांनी त्यात वडील, भाऊ, पती, पुरुष सहकारी तसेच मित्र सगळ्यांनी तिचे भावजीवन समजून घेतले होते त्यामुळे तिच्यात कुठलाच आक्रस्ताळेपणा नव्हता.. तिने स्वतःला संरक्षक करून घेतले होते. त्यामुळे तिला आपलाच उदो उदो करावासा वाटत नव्हता.. असे हे सुख आपल्या सगळयाच सख्यांच्या वाटेला येवो असे तिला मनोमन वाटून गेले.. कुंपणाच्या आत तिच्या सुखाच्या राशी होत्या. स्वतःचा सन्मान करत असतांना त्याचे तिच्या पाठीशी उभे राहणे आठवत होते.. तो देत असलेली प्रेरणा आठवत होती.. तिच्या

यशाने सुखावलेला त्याचा चेहरा आठवत होता.. मग सन्मानाची माळ मी माझ्याच गळ्यात का घालावी हा प्रश्न तिला पडला होता.. विचारांनी तीच थकली होती.. घरातील प्लम्बिंगचे काम करायला एक जण येणार होता त्याला तिने निशांत घरी असतांना यायला सांगितले.. बघेल निशांतच.. आपल्याला कुठे त्यातले सांगितलेले फारसे लक्षात येते असे म्हणत तिने तेही काम टाळले.. भाजीबाजार करण्यासाठी घराबाहेर पडली.. पेट्रोल भरण्यासाठी पम्पावर थांबली.. नंबर न लावता डायरेक्ट पुढे गेली आणि एका मुलीच्या मागे आपली ऍक्टिवा लावली.. मनातून थोडेसे ओशाळ ल्यासारखे झाले कारण मागे मोठी रांग होती.. समानता हक्काने मागून घेत असतांना आपल्या स्त्रीत्वाचा असा फायदा घ्यायला आपण अजिबातच कचरत नाही.. विचारांच्या दांभिकपणाची तिलाच गंमत वाटली पण आता इतका विचार करायला वेळ नव्हता.. अगदी जाणूनबुजून कळून सवरूनही..

# 28

# माझे भांडायन..



घरातील धुणीभांडी झाडूफरशी करता करता ती कामे एका महिन्यात कशी अंगवळणी पडली आहे.. हो ना.. ! असावे सादर हेही ठिकच आहे.. माझी मदतनीस केवळ एकदिड तासात ह्या सगळ्या कामाचा डोंगर उपसते आणि मला मात्र त्या भोवती खूपसे रेंगाळणे होते आहे.. का माहिती आहे का..?.. भांडी घासता घासता प्रत्येक भांड्याशी बोलणे होत आहे.. अय्या हे भांडे किती छान आहे ना.. !अजिबात जास्त गॅस लागत नाही आणि पदार्थ करपतही नाही.. आणि ह्या भांड्याचा घाट किती सुबक आहे.. !आपल्या नाशिकची तांब्यापितळेची भांडी आहेतच प्रसिद्ध.. प्रत्येक भांडे मग ते केव्हा घरात आले त्याची जन्मकथा आठवू लागले.. ज्या व्यक्तीने अगदी नाव टाकून दिले त्या व्यक्तीबद्दलच्या आठवणींना उजाळा मिळाला.. पूर्वी कसे ना अगदी नाव टाकून भांडी दिली जायची.. त्यामागे स्नेहभावना नक्कीच आहे आणि भांडे ओळखायला पण मदत

होते.. विशेषतः सासूबाईंच्या भांड्यांवरील तारीख वाचायला मला आवडते.. त्या काळात अशी भांडी असायची तर.. एकेकीला त्या माहेरचा नावाचा अभिमान देखील असतो.. आपल्या भांडे गल्लीत एक जण ठोक्याने अगदी कोरीव अक्षरात नाव टाकून देतात..

तर आज ही पारंपारिक भांडी चिंच, पितांबरी आणि लिंबूमीठ लावून उजळवण्यात काही तास सत्कारणी लावले.. माहित आहे हवेने ते पुन्हा तसेच काळवंडणार पण तरीही चार दिवस तो लखलखाट डोळ्याला सुखावत जाणार हेही तितकेच खरे.. !

माझी एक हळवी मैत्रीण जेव्हा लग्नानंतर नोकरीनिमित्त स्वतंत्र चूल मांडू लागली तेव्हा सासूला तिने तांब्याची कळशी मागितली तर सासू म्हणाली आण तुझ्या माहेराहून.. त्यानंतर एकटी सून असूनही तिने काहीच अपेक्षा ठेवली नाही.. हळूहळू तिने मनासारखी भांडी घेतली आणि आता तिने सुनबाईला खूप सारी नाविन्यपूर्ण भांडी घेऊन दिली संसार मांडण्यासाठी.. शिवाय तिच्या मनात धाकधूक सुनेला आवडेल ना मी हे सारे केलेलं.. खरंच काळ किती चांगल्या अर्थाने बदलला आहे.

एकदा आजोबांनी मोडीत दिलेली मोठाली भांडी मामाला जुन्या भांडी बाजारात दिसली ज्यावर त्याच्या पणजोबांचे नाव

कोरलेले होते.. मग त्याने ती भांडी गरज नसतांनाही विकत घेतली आपल्या पूर्वजांची आठवण म्हणून.. अशा हळव्या आठवणी भांड्यासोबत जोडलेल्या असतात.. आताही कधीतरी आई म्हणते की अग आम्हाला तसा मोठा कुकर घ्यायचा आहे नॉनस्टिकचा तेव्हा वाटते हिची देखील भांडे घेण्याची हौस आहेच अजून मग माझी तर असणारच ना.. लग्न जुने झाले म्हणून काय झालं..?कधी कधी तर बोलणी खाते पण भांडे येतेच घरात.. आता मात्र एक शिकले आहे की सेट असलेली भांडी जमा करायची आणि गरज नसेल तर मनाला मुरड घालायची.. भेट म्हणून मिळालेलं भांडे कितीही छान असले आणि सेटला साजेसे नसले तर पुढे सरकावयाचे.. शेजारच्या वयस्कर मावशी म्हणाल्या.. 'अग आम्ही तर स्टीलची ही भांडी घेण्यासाठी महिना पाच रुपये अशी भिशी लावली होती त्यातच हा पोळ्यांचा डबा आणि मसाल्याचा डबा घेतला आहे.. एकेक मुलाचे नाव मी त्यावर टाकले आहे.. 'अशी भांडी त्यांना कशी काय नजरेआड करता येणार आहे.. निर्जीव वस्तूत असा जीव अडकत जातो..

अशी भावनिक गुंतवणूक टाळत मग माझ्याकडून भांडी खरेदीवर थोडा आवर घातला जातो.. लेकीला कन्यादानाची भांडी

देतांना तर उत्साह संचारला होता तोही आवरता घ्यावा लागला.. ती म्हणाली इतका वेळ नसणार आहे ग ममा हे सगळं आवरायला..

छोटी कुटुंबे आणि आता तर बहुतेक ठिकाणी छोटे समारंभ असले तरी बाहेरूनच मागवले जाते अन्न मग माळ्यावरची मोठी भांडी खाली येतच नाही.. वाळवणे कमी झाल्याने मोठी भांडी तशी वापरली जात नाही.. दिवाळी ते दिवाळी स्वच्छ केली जातात.. असो


तर असे आहे माझ्या मनातील भांडायन.. एखादी सेटमधील वाटी किंवा डिश दिसली नाही की जीव खालीवर होतो.. म्हणतात ना आम्हा स्त्रियांना घरातील चमचाही लगेच ओळखू येतो.. आणि त्या चमच्यातही जीव अडकलेला असतो.. मला वाटते असे पुर्वापार आपोआप होत असावे.. हो ना.. !

सध्याच्या लॉकडाऊनमुळे भांड्यांशी अशा मनसोक्त गप्पा मारल्या.. तेही सुखावले असतीलच.. !

## 29

# धोना था मन भूल गया तू.. .

किंवा लॉकडाऊन आणि धोबीघाट..



लिहिणाऱ्या लोकांना नेहमीच दोन संसार असतात.. एक त्यांच्या लिखाणाचा.. डोक्यातल्या पसाऱ्याचा.. आणि दुसरा असतो नेहमीचा जसा की चारचौघांचा गृहस्थाश्रम असतो.. तो संसारही टूकीने प्राधान्याने करायचा असतो.. असे अनेकदा होते खरे म्हणजे आता ह्या क्षणी लिहावेसे वाटतेय पण लिहू शकत नाही.. एक गृहिणी ह्या नात्याने घरातल्या व्यक्तींच्या वेळा सांभाळायच्या असतात.. जेव्हा हातातले काम हातावेगळे होते तेव्हा काही तासांपूर्वीची ऊर्मी असेलच असे नाही.. मेंदूला ताण देत कधी कधी आठवावे लागते की आपल्याला काय लिहायचे होते.. तोवर मनात नवीन विषयांचा प्रवेश झालेला असतो मग तो ओघ नवे वळण घेतो.. काही विषय अगदी ठाण मांडून बसलेले असतात त्यांना हात घालावाच लागतो.

मनात सतत काही ना टकटक होत असते.. साध्या साध्या गोष्टीतही लिखाणाला विषय मिळत जातात.. मग वाटते की लिहिलेच पाहिजे मी नाहीतर त्या गोष्टीवर माझ्याकडून अन्याय नाही का होणार..?त्या आठवणी कोमेजून नाही का जाणार..?आणि मी नाही तर कोण लिहिणार कारण त्या माझ्या जगण्याशी निगडित आहेत ना.. आता काही रोजच्या आयुष्यातील अनुभव असे आहेत की त्यात वाचणाऱ्याला साधर्म्य वाटत जाते.. कधी कधी तो सार्वत्रिक अनुभव असतो.. लेखकाने केवळ त्या अनुभवाला शब्दरूप दिलेले असते.. हं.. तर हेच की त्या अनुभवांना मूर्त रूप देता आले पाहिजे.. त्यासाठीच मरगळ दूर फेकली पाहिजे..

आजही लिहायला बसले आणि लक्षात आले की धोबीघाट आवरायचा आहे.. कपडे भिजवले आहेत आणि ते धुवायचे आहेत.. सकाळी उत्साहाने चादरी, पडदे धुवायला टाकले आहेत ती आठवण आली.. आणि लिहिण्याची नशा क्षणात उतरली.. मुकाट्याने कपडे धुवायला घेतले.. पूर्णतः स्वयंचलित वॉशिंग मशीन आहे घरी पण त्या मशीनशी अजून म्हणावी तशी गट्टी झाली नाही.. असे वाटते की ही सगळ्या कपड्यांना सारखेच बळ वापरणार मग काही कपडे अकारण जास्त घुसळले जाणार आणि

त्या कपड्यांमध्ये ही किती जीव.. मग शॉर्टकट टाळावा लागतो.. सध्याच्या लॉकडाऊन काळात तर ही कामे अपरिहार्य आहेत.. मग काही कपड्यांना ब्रश लावला.. काही कपडे हलक्या हाताने धुतले.. मोकळया बाल्कनीत उन्हामुळे अवघ्या दोन तासात कपडे वाळतात देखील.. !

सहज त्यावरून आठवले की साधारण अर्धशतकापूर्वी कपडे धुणे किती कष्टदायी असायचे.. पाणवठा गेला मग नळ आले नाहीतर विहिरीतून पाणी काढत कपडे धुणे व्हायचे.. नदीवर तर एक संस्कृती वसलेली असायची.. सासुरवाशीणी सुना डोक्यावर पाटी भरून कपडे आणत आणि धुणी धुत असत.. आपल्याला छळणाऱ्या सासुरवास करणाऱ्या व्यक्तीच्या नावाने धुणे आपटले जात असे.. त्यातून मनातील घुसमटीचा निचरा होत असे.. सोबत आयाबाया असत त्या तिला लेकीप्रमाणे माया करत असत.. त्यामुळे ते केवळ धुणे धुणे नसायचे तर त्या निमित्ताने बाहेर पडता येत होते.. अजूनही ग्रामीण भागात हे चित्र दिसते..

बालपणी मी सहासात वर्षाची असतांना काकूबरोबर गंगेवर जायचे.. ती नाशिकला एकमुखी दत्ता जवळील वाड्यात राहायची.. काकू मोठ्या रुमालाची कंबळ करत ती डोक्यावर ठेवायची आणि त्यावर धुण्याची पाटी ठेवायची.. त्यात साबण,

ब्रश आणि निळीची बाटली असायची.. आणि एक लाकडी धुपटणे असायचे ज्यामुळे कपडे स्वच्छ निघायचे.. ती कपडे धुवायची ते पाहायला मजा वाटायची.. मदत करायला गेल्यास ती पाण्याजवळ येऊ देत नसे.. पाण्यात दूरवर खडा फेकला की गोल गोल तरंग उमटत असत.. मग येतांना पाटीत कपड्यांचे घट्ट पीळे असायचे आणि सोबतच गंगेवरून घेतलेला भाजीपाला असायचा.. मीठ लावलेली काकडी मिळायची त्यामुळे तो एक आगळावेगळा आनंद होता.. आताही निमित्ताने गंगाघाटावर जाणे झाले की तो धोबीघाट आठवतो.. तेव्हा कमी लोकसंख्यामुळे प्रदूषण विषयक सजगता कदाचित नसावी.. आता तर इच्छाच होणार नाही नदीत कपडे धुण्याची.. !

आई नेहमी तिच्या बालपणीची गोष्ट सांगते.. ती होती अकरा वर्षाची आणि तिची लहान बहिण चार वर्षांची.. एके दिवशी मोठ्या आक्काच्या मागे धाकटी माई लागली की मी पण तुझ्यासोबत येते गिरणा नदीवर धुणे धुवायला.. आजोबा तेव्हा खान्देशातील म्हसावद गावात तलाठी होते.. त्यांना धावतच एकजण सांगायला आला की तुमच्या मुली नदीत वाहून जात आहे.. सगळे घर नदीकाठी घाबरेघुबरे होत आले.. कपडा आपटत असतांना आईच्या हातातून सुटला आणि तो पकडण्यासाठी

माईमावशीने क्षणार्धात उडी मारली.. तिला पकडण्यासाठी आईने पाठोपाठ उडी मारली पण तिच्या झिंज्या ओढत आयाबायांनी तिला वाचवले.. प्रसंग खूप बाका होता.. एक नावाडी नाव लावत होता.. त्याने अंगावरील कपड्यांसह डोहात उडी मारली आणि मावशीला वाचवले.. आई सांगते की त्या नावाड्याच्या खिशात पाकीट होते आणि पायात बूट पण.. त्याने एक जीव वाचवला होता.. जणू काही त्याच्या रूपाने देव धावून आला होता.. अशा बाक्या प्रसंगातही मावशीने हातातला कपडा घट्ट धरून ठेवला होता.. हा प्रसंग आजीला समजला तेव्हा ती रडू लागली आणि दोघींना कुशीत घेतले.. आजही सगळ्या बहिणींचे प्रेम तसेच अबाधित आहे..

लहानपणी वाड्यात नळावर कपडे धुण्यासाठी पण नंबर असायचे.. चौकोनी काळा खडबडीत कातळ की ज्यावर एक घसरा जरी मारला तरी कपडा स्वच्छ होत असे.. विशेषतः चादरी आपटायला आणि पिळायला दोघीदोघी असत.. तिथेही हलक्या आवाजात जी नसेल हजर तिच्या कागाळ्या असायच्या.. मग ते कपडे वाळत घालणे.. अभिषेकाची धार असायची कधीकधी.. कोण जास्त स्वच्छ कपडे धुते अशी जणू काही अघोषित स्पर्धा

असायची.. मी पण नवीन घरात असा दगडी चौरंग बसवून घेतला आहे..

आंघोळीनंतर स्वच्छ कपडे घालतांना प्रसन्न वाटते असे आई म्हणत जायची.. जे तिने आजवर अवलंबले आहे.. आजही तिला उष्टे कपडे कपाटात कोंबलेले आवडत नाही.. तिचे हे कपडे धुण्याचे वेड अफाटच आहे मग वाटते ती देखील मनाने अंतर्बाह्य अशीच स्वच्छ आहे.. . संतवाणी सांगूनच गेली आहे की कपडे धुतांना आपले हातही स्वच्छ होतात.. कोरोना साथीतही हात धुण्याचे महत्व आहेच.. मोलाने कपडे धुवून देणारे धोबी रामायण काळापासून अस्तित्वात आहे.. तेव्हाही चौकात सीतेविरुद्ध रामाला सांगणारा एक धोबी होता.. कुस्तीत धोबीपछाड नावाने एक खेळ असतो.. 'धोबी का कुत्ता ना घर का ना घाट का.. ' ही एक नेहमी प्रत्ययास येणारी म्हण आहे.. घर ते घाट अशा फेऱ्या करणाऱ्या कुत्र्याला दोन्ही ठिकाणी अन्न मिळत नाही.. पूर्वी परीटाकडे भट्टीला कपडे टाकत.. आता आपण सर्रास ड्रायक्लीनिंग किंवा रोलप्रेसद्वारा कपड्यांची काळजी घेतो..

धुणे धुवायची प्रत्येकाची पद्धत वेगवेगळी असू शकते.. आधी तासभर महागड्या पावडरीत कोमट पाण्यात कपडे भिजवून ठेवले की छान निघतात.. ते जिद्दी डागही पळून जातात.. 'उसकी

सारी मेरे सारी से सफेद कैसी..?'हे प्रश्नचिन्ह कदाचित प्रत्येकीला असावे इतका जाहिरातींचा बोलबाला असतो.. मग चांगले मोकळ्या पाण्यात खडबडले किंवा खंगाळले जातात कपडे.. एखादया व्यक्तीला कडक समज द्यायची असल्यास मी त्याला चांगले धुतले आणि आपटले चारचौघात असा शब्दप्रयोगही असतो.. !कपडे वाळत घालता घालता हे सारे काही आठवत गेले..

जणू काही माझे मनही स्वच्छ होत गेले.

## 30

# काय कसे काय ठिक ना सर्व..?

आज दुपारीच सुधाताईंचा फोन आला.. एकदम अवचित त्यांचे नाव फोनवर पाहता मी अचंबित झाले.. आता सध्या कोरोना लॉकडाऊन दिवस त्यामुळे आयुष्य बरेच काही संथ झाले आहे.. कुठे बाहेर जाणे येणे नाही की कुणी आपल्याकडे येत नाही.. सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन असण्याचा प्रश्न नाही.. स्वहिताय आणि समाजहिताय केव्हाही घरात बसणे उत्तम हा पर्याय आहे अर्थातच अत्यावश्यक सेवा देणाऱ्या सामाजिक घटकांना घराबाहेर पडावे लागत आहे.. त्यांचे ऋण आपण सर्वांनी नक्कीच ठेवले पाहिजे.. ही जाणीव प्रत्येकाने ठेवली पाहिजे.



सुधाताई मोलाने उत्तम स्वयंपाक करतात.. तीस ते पस्तीस जणांचा स्वयंपाक त्यांना तीन ते चार तासात मेनू काय आहे त्यानुसार उरकतो.. आमच्या जवळच्या मैत्रिणीच्या ओळखीने त्यांची ओळख झाली आणि त्या सर्वांनाच आवडल्या.. साधी,

स्वच्छ आणि नितळ राहणी, प्रेमळ स्वभाव.. हाताला तर अतिशय अप्रतिम चव.. अगदी साक्षात अन्नपूर्णा म्हंटले तरी चालेल.. स्वच्छ काम आणि कामाचा फाफटपसारा नाही.. नंतरचे पण इतके छान आवरणार की लक्षात ही येणार नाही की ह्या ओट्यावर तीस लोकांसाठी पुरणपोळी रांधली आहे.. अन्न शिजवल्यावर त्याची चव पण नाही घेणार.. गोडाचा मोह नाही की पदार्थाची आसक्ती नाही.. आपण कितीही आग्रह केला तरी त्या दोन घास घेणार नाहीत.. कुठलीच अवांतर बडबड नाही.. स्वच्छ दोनतीन रुमाल मात्र हाताशी लागतात.. 'ताई तेवढे रुमाल मात्र काढून ठेवाल बरं का..' 'अच्छा .. हातधरणे म्हणत आहात का तुम्ही..?आले लक्षात माझ्या.. मलाही ती सवय आहेच स्वयंपाक करतांना येता जाता स्वच्छ कपड्याला हात पुसण्याची.. ' मग आम्ही दोघी त्या विषयावर बोललो.. किती पसारा असतो ना विषयांचा आणि जगण्याचाही.. हातधरणे असेही आयुष्यात लागत असतेच.. त्याची गरज पडतेच पडते.

दर गणपतीत त्यांना आमच्याकडे स्वयंपाकाचे हमखास आमंत्रण असते आणि त्याही घर लांब पडते तरी येतात .. श्रद्धेने रांधतात आणि स्वयंपाक आवडला का असे विचारत तृप्त हसतात.. अन्न हे पूर्णब्रम्ह म्हणत मोजकेच अंदाजाने रांधतात.. अन्न

जास्तीचे उरत नाही इतका अचूक अंदाज असतो.. पाहुणे मंडळी थक्क होतात की इतक्या कमी वेळात इतके निगुतीने कसे काय रांधले असावे?

तर अशा ह्या सुधाताई.. एरवी आमचा कामाशिवाय फोन नाही होत पण आज अवचित त्यांचा फोन आला.. काय कारण असावे बरं हा विचार करत मी फोन घेतला.. सध्या तर त्यांनाही बाहेरचे काम नसावेच मग काही अडचणीत असाव्यात का असा विचार मनात डोकावला.. त्या खूप स्वाभिमानी हे देखील मला माहित होते.

सुधाताई म्हणाल्या.. 'काही नाही हो ताई.. सहज फोन केला.. तुम्ही लोक गप्पा मारतात ते व्हाट्सअप्प की काय ते माझ्या फोनला नाही पण नंबर आहे तुमचा.. म्हंटलं चला आज त्याचा उपयोग करू या.. '

'अरे वा..  छान वाटले तुमचा आवाज ऐकून.. कशा आहात..?काय निमित्ताने फोन केला..?'.. आपण कितीही काहीही सहजपणे म्हणत असलो तरी फोनमागे काही ना काही प्रयोजन असतेच असते हे आता अनुभवावरून पक्के माहित झाले आहे.. अगदी आपल्याकडूनही कळतनकळतपणे असे घडत असतेच

की.. आणि ते थोडेफार क्षम्य देखील असावे कारण उगाचच समोरच्या व्यक्तीचा वेळ घ्यायला नको वाटते..

सुधाताई म्हणाल्या.. 'काही नाही हो.. तुमची दिदी तिकडे ठिक आहे ना हे विचारायचे होते.. तिकडे जास्त धुमाकूळ आहे ते बातम्यांना पाहिले आणि मला भारी काळजी वाटली.. म्हणून फोन लावला.. दुसऱ्या एका ताईला पण फोन लावणार आहे तिच्या मुलाची खुशाली विचारायला.. '

त्यांचे हे बोलणे ऐकून मला एकदम भरूनच आले.. माझ्या लेकराची आस्थेने विचारपूस करणारी सुधाताई एरवी तशी संपर्कात नसूनही मला खूप विचारी आणि आभाळागत उंच भासली.. हल्ली अगदी जवळचे देखील अभावानेच इतक्या आस्थेने विचारत असतात.. जो तो आपल्याच विश्वात गर्क आणि तल्लीन असतो.. किंवा तिने विचारले का मला मग मीच का विचारावे असा प्रश्न असतो.. स्वच्छताप्रिय अशी ही सुगरण अन्नपूर्णा मनाने ही तितकीच स्वच्छ भासली मला..!

मग मीही एकदम ठरवले की आपणही दिवसातून निदान असे पाच फोन तरी करायचे.. आताच्या आव्हानात्मक काळात जे लोक आपली सेवा देत आहेत त्यांना फोनवरून धन्यवाद द्यायचे.. आपला एक शब्द त्यांना प्रेरणा देऊन जातो.. वैद्यकीय क्षेत्रात काम

करणारे वर्ग मित्रमैत्रिणी ह्यांना फोन लावला.. कामाशिवाय त्यांना विचलित न करणारी मी जेव्हा त्या डॉक्टर सखीला म्हणाले की काळजी घे ग खूप.. तुझे कार्य छानच आहे पण तू स्वतःही तितकीच महत्वाची आहे.. मग आमच्या खूप मनमुराद गप्पा झाल्या त्यात तिच्या मनावरील ताण त्या फोनपूरता तरी नक्कीच निवळला असावा.. घरपोच सेवा देणारे वैद्यकीय क्षेत्राशी निगडीत घटक, काही नर्सेस, कोपऱ्यावर गस्त घालणारे पोलीस ऑफिसर असे ज्यांचे नंबर फोन यादीत आहेत त्यांना धन्यवाद द्यायचे आहेत.. ते लढत आहेत म्हणून आपण सुरक्षित आहोत.. हो ना..!

# 31

# तू चाल पुढे..



परी आज शाळेतून आली ती अगदी हिरमुसली होऊनच.. तिचा चेहरा अगदी ओढलेला होता.. आईने तिला जवळ घेतले आणि म्हणाली.. ' चल.. हातपाय धू बरं.. मी तुझ्या आवडीचे बटाट्याचे पराठे केले आहे.. माझ्या बाळाने किती किती म्हणजे पाच पाच बक्षीसे मिळवली आहे यंदा.. अभ्यास, खेळ आणि चित्रकला सगळ्यात नंबर वन.. साजरे केलेच पाहिजे.. काय हवे ग तुला गिफ्ट परीराणी..?'

त्यावर तिची कळी खुललीच नाही आणि आई पण काळजीत पडली.. परी म्हणाली नको ग आई हे नंबरवन.. कुणी माझ्याशी नीट बोलतच नाही.. मला एकटे एकटे करून टाकतात.. आज पण शाळेत एका स्पर्धेला नाव द्यायचे तर मला कुणी सांगितलेच नाही.. डबा खातांना मला हाक मारत नाही.. मीच प्रत्येक वेळेस स्वतःहून त्यांच्यात जाते पण माझी साधी आठवण पण नसते कुणाला.. आज

सुमीच्या घरी सगळ्या जमणार आहेत पण मला सुमीने बोलविले नाही.. चित्रकलेची बक्षिसे तीच घेते पण यंदा तिचे चित्र अर्धवट होते आणि माझे तर अगदी छापल्यासारखे दिसते आहे असे सगळे म्हणत होते.. पण का असे ग आई.. सुमी बोलत का नाही माझ्याशी?.. ती तर माझी किती जुनी बालवर्गापासूनची मैत्रीण आहे.'

परी अगदी रडकुंडीला आली होती.. तिचे शल्य ऐकल्यावर आईला वाटले की आता आपलेच डोळे भरून येतील पण आईने ते महत्प्रयासाने आवरले.. कारण आई पण असेच काहीसे अनुभवत होती.. शाळेच्या गेटवर सगळ्या आया एकत्र यायच्या तेव्हा परीची आई एकटी बाजूला उभी असायची.. ती भाग घ्यायची पण तिची दखल कुणीच घेत नसे.. खरंतर त्या जुन्या मैत्रिणी पण परकेपणा जाणवत जायचा कारण काय तर तिचा आणि तिच्या कुटुंबाचा होणारा उत्कर्ष होय.. तरी ती स्वतःहून आपले यश कुणाबरोबर वाटून घ्यायची नाही.. कुणाला नकळत पण न दुखवणारी ती प्रचंड दुखावली जायची.. ती काय स्वतःला शहाणी समजते.. ती काय हवेतच असते असे तिच्याविषयी पाठीमागे बोलायच्या.. अगदी एखाददुसरी मैत्रीण तिला समजून घ्यायची.. आपले काय चुकतेय हे आईला कळतच नव्हते.. आणि आता

परीही असेच काहीसे सांगत आली होती.. आई परीला थोपटत गेली आणि परी आईच्या कुशीत झोपून गेली.. बारा वर्षाचे आपले गुणी लेकरू वयाच्या मानाने जास्तच प्रगल्भ आहे म्हणून आईला काळजीही वाटली.. जगात अतिविचारी आणि अतिगुणी असणेही अवघडच असते.. प्रवासात जे मागे पडतात त्यांना ते स्वीकारता येत नाही.. विरोधाभास असा होता की परीची आई अजिबात गार्विष्ठ किंवा अहंकारी नव्हती.. कधीतरीच तिने सल्ले दिले असतील तेव्हा केवळ दुसऱ्याचे भले व्हावे हीच भावना होती.. त्यात तिला कुठेही आपले शहाणपण दाखवायचे नव्हते.. सदैव विचारातच असायची.. जगाला ती यशस्वी वाटायची पण हिला स्वतःबद्दल कधीच समाधान नसायचे.. आपले घड्याळ जगाच्या मागे पडले आहे असे तिला सतत वाटत राहायचे.. कधी कधी तर तिच्यात न्युनगंडही असायचा.. आपण खूप मागे तर नाही पडलो ना ह्या विचाराने ती आपल्या मुलांना प्रेरणा देत राहायची.. त्यात गैर असे काहीच नव्हते.. त्यामुळे तिला गर्व तर मुळीच नसायचा.. कारण तिला नेहमीच विस्तीर्ण आकाश खुणावत असायचे.. साधेपणाने ती मार्गदर्शन करू पहायची तर तिला चुकीचे लेबल लावले जात असे.. अगदी हाच अनुभव तिला जवळच्या आप्तांकडून आलेला असायचा.. ती आपण होवूनच बोलायला जायची.. आईचे ठिक पण परीचे आयुष्य अजून बहरायचे आहे..

तिला आताच जगाबद्दल कटुत्व नको यायला.. जपले पाहिजे तिच्या भावविश्वाला.. संवेदनशील लोकांचे जगच वेगळे असते.. प्रत्येक गोष्ट ते मनाला लावून घेत असतात.. परीने खंबीर बनलेच पाहिजे.. नाहीतर ती एकलकोंडी बनू शकते.. आणि त्यासाठी आईने पण वास्तव स्वीकारले पाहिजे.!

'परी.. हस बरं आता.. '

'मग तू मला एक गोष्ट सांग छानशी.. '

एकीकडे परीचे जेवण चालू होते आणि आई तिला गोष्ट सांगू लागली जी तिला तिच्या शिक्षिकेने शाळेत असतांना सांगितली होती..

'सातासमुद्रापलीकडे एक गाव असते जिथे बुटक्या आणि काळया लोकांची जमात असते.. हे बुटके त्यांच्याच विश्वात असतात आणि त्यांचे जग अगदी सिमित असते त्यात त्यांना कुणी आपल्या पुढे गेलेले अजिबात चालत नाही मग ते बुटके त्याच्या जीवावर उठत असत.. अज्ञानाचा अंधकार आणि जोडीला प्रचंड अहंकार त्यामुळे त्यांचे जीवन साचलेल्या डबक्यासारखे होते.. त्यांचा राजाही तसाच दुराग्रही आणि घमेंडी.. '

'मग ग काय आई.. पुढे सांग ना.. '

'ह.. तर ह्या बुटक्यांच्या राज्यात एक वाट चुकलेला उंचसा राजबिंडा राजपुत्र येतो.. सगळे बुटके कुतूहलाने त्याच्याकडे बघतात.. राजपुत्र वृत्तीने शुर असतो तो त्या बुटक्यांच्या मनात मैत्रीचे स्थान उत्पन्न करतो.. राजपुत्राने विचार खूप चांगले असतात मग त्याला वाटते ह्या काळाच्या मागे पडलेल्या बुटक्यांना आपल्या सोबत घेवून जावे.. तो तसा प्रयत्नही करतो पण बुटक्यांमध्ये ती क्षमताच नसते.. ते हळुहळू राजपुत्राचा द्वेष करू लागतात.. ह्यालाच कसे काय इतके ज्ञान म्हणून त्याचा दुस्वास करू लागतात.. विशेष म्हणजे राजपुत्राच्या विरोधात लगेचच त्यांची एकी होते आणि ते राजपुत्राला पाण्यात बघतात का तर राजपुत्र सगळयाच बाबतीत त्यांच्यापेक्षा उंच आहे.. मग ते त्याची मानहानी करत जातात इतकी की राजपुत्र दुःखीकष्टी बनत जातो आणि त्याच्या चेहऱ्यावर उदासी दिसून येते.. त्याचा आत्मविश्वास डगमगू लागतो कारण त्याच्यावर अकारण छोटेमोठे आरोप झालेले असतात.. '

परीचे मन खूप कळवळले.. 'मग ग काय होते पुढे?.. हे योग्य नाही ना पण.. '

'हो.. मग राजपुत्राच्या लक्षात येते की तो वाट चुकला आहे .. इथे आपले शहाणपण अजिबात कामाचे नाही.. तो बुटक्यांकडे दुर्लक्ष करतो आणि नवीन वाट शोधतो जिथे त्याच्यासारखे

सर्वार्थाने उंच लोक असतात जे दुसऱ्यांचे यश खिलाडूपणाने स्वीकारतात.. राजपुत्र बुटक्यांच्या देश सोडतो आणि आनंदाने पुढील प्रवासाला सुरुवात करतो.. बुटक्यांना मोठे व्हायचेच नसते पण मत्सर करणे उपजतच त्यांच्या रक्तात असते.. '

परी विचाराधीन होते आणि काहीशी तणावमुक्त पण होते.. वर्गातील सर्व बुटके एकत्र आले होते आणि जणू तिला वाळीत टाकले होते.आई तिला सांगत राहते की सतत आत्मपरीक्षण केले पाहिजे.. .स्पर्धा तर स्वतःशीच ठेवली पाहिजे.. दुसऱ्याच्या यशातून प्रेरणा घ्यावी आणि यशस्वी होत जावे.. यशापयश हे नेहमी आपल्या मानण्यावर असते.. सगळेच आपल्या सोबत असतील अशी अपेक्षा ठेवणे अगदीच चुकीचे आहे.पाय नेहमीच जमिनीवर घट्ट रोवले पाहिजे.. यशाने तर कधीच हुरळून जायचे नाही कारण अपयश हे अगदी हाकेच्या अंतरावर दबा धरून बसलेले असते.. टीका झाली तर त्यातूनही स्वतःला घडवायचे असते.. परीला अजून जग अनुभवायचे होते.. 'एका तळयात होती बदके पिले सुरेख.. होते कुरूप वेडे पिल्लू तयात एक.. ' ह्या गोष्टीरुप गाण्यातील पिल्लू जेव्हा स्वतःचे प्रतिबिंब पाण्यात बघते तेव्हा त्याला कळते की 'तो राजहंस एक.. '.. आपल्या आजूबाजूला अगदी अशीच


काही आभाळासारखी उंच माणसे वावरत असतात जी सतत स्वप्नांचा ध्यास घेत असतात..

'अभी तो लोगोंने सुना है मेरा नाम..

उस नाम की पहचान अभी बाकी है.

# 32

# मी असेन तुमच्यासंगे भोई..



आई.. जरा माझ्याशी बोल ना.. निनाद तुझा जावई आणि मी तर तुझी मुलगी ना.. आल्यापासून पाहतेय तुला निनाद शिवाय दुसरे काही सुचतच नाही.. अगदी पट्टजावई आहे तुझा तो.. ' लग्नानंतर पहिल्यांदाच माहेरी आलेली मृण्मयी आईशी लटक्या रागाने बोलत होती..

'मग ग.. आहेच ना तो माझा मुलगा.. कायद्याने मुलगा असंच म्हणतात जावयाला.. सन इन लॉ .. '

'ते ठिक ग.. निनादही आहेच तसा.. सगळ्यांना समजून घेणारा आणि मान देणारा.. पण आई मला एक सांग जावयाची जितकी उठबस असते तितकी सुनेची का नसते..?.. स्वागत तिचेही असते पण अगदी सुरुवातीलाच.. म्हणजे तिच्याकडून अगदी अपेक्षांचा डोंगर असतो.. घरातील रीतिरिवाज, कुलधर्म, संस्कार पाळणे हे सारे तिच्यावर सोपवले जाते.. अभावानेच तिचे स्वागत

होते.. तिला आर्थिक स्वातंत्र्य दिले तरी तिला ऐकवले जाते की बघ आम्ही किती आधुनिक विचारांचे आहोत.. आमच्याकडून तुला बंधन नाही.. आई पण तो तर तिचा हक्कच असतो ना..?तो बहाल करणारे लोक स्वतःकडे मोठेपणा का घेतात..?'

मृण्मयी पोटतिडकीने बोलत होती.. आईला त्यातले बरेच काही पटत होते पण आई ते मान्य करत नव्हती.. निनादचे आदरातिथ्य करण्यात ती गढून गेलेली असते.. आईची आई पण जावयाला अगदी देव मानत आली होती.. तोच संस्कार आईत झरतांना लेक पाहत होती आणि तिला थक्क व्हायला झाले होते.. पुरुषप्रधान मानसिकता आईतही ठासून भरली होती.. तसे पाहिले तर मृण्मयी आणि निनाद दोघेही एकमेकांना सर्वच बाबतीत अनुरूप पण का कोण जाणे आई मात्र निनाद घरी आला की सदैव मानसिक दडपणाखाली असायची.. आपली मुलीची बाजू म्हणत नमते घ्यायची.. एरवी स्त्रीपुरुष समानतेवर तावातावाने बोलणारी आपली आई अशी अचानक कशी काय बदलू शकते ह्याचे आश्चर्य लेकीला वाटत होते.. निनादसाठी आणि त्याच्या नातेवाईकांसाठी काय करू आणि काय नाही असे आईला वाटत असे.. निनाद समंजस होता आणि अकारण फायदा घेणारा तर नक्कीच नव्हता..

आणि आई पण अगत्यशील होती.. लेकीला सुखात ठेवणारा जावई आईला म्हणूनच प्रिय होता..

मृण्मयीच्या लग्नातील गोष्ट.. कन्यादानाच्या प्रसंगी जावयाला विष्णूरूप मानत त्याचा सन्मान होत होता.. लग्न अगदी थाटामाटात पार पडत होते.. मुलीकडची मंडळी सर्वात शेवटी पंगतीला बसली.. आईच्या मैत्रिणी म्हणाल्या की आधी त्यांचे जेवण होवू दे.. चांगले नाही वाटत आपण आधी जेवण करणे.. आपण मुलीकडचे ना?.. निघतांना सर्व व्याही मंडळी एकमेकांना नमस्कार करत होती.. मृण्मयीची आई वयाने मोठी म्हणून सहजपणे निनादच्या आईने हात जोडले तर लगेच एक वयस्कर आजी कडाडल्या.. 'अग वरमाय ना तू.. हात काय जोडते त्यांच्यापुढे..?'.. नमस्काराची कृती अगदी सहजतेने झाली होती त्यात मानाचा प्रश्न नव्हताच.. सगळेजण क्षणभर निशब्द झाले.. विचारांना प्रवृत्त करणारी ही कृती होती.. सप्तपदीच्या वेळेस पहिले पाऊल निनाद टाकणार मग त्या पावलावर पाऊल मृण्मयी टाकणार.. भटजीबुवा पण पुरुषप्रधान संस्कृतीतले त्यांनी पण मंत्रातून भला मोठा उपदेश नवरीला केला.. म्हणजे निनादला पण चार गोष्टी सांगितल्या तशा पण त्यात उपदेशाचा डोस नवरीला जास्त होता.. नवरदेव नवरी गमतीने एकमेकांना नेत्रपल्लवी करत होते.. त्यांना कळतच नव्हते

असे असते का संसारात.. आपल्याला असं काय शिकवतात वडीलधारे असा ते विचार करत होते.. दोघे एकमेकांना नक्कीच समजून घेणारे होते.

मागे एका लग्नाचा ठराव चालू होता तो प्रसंग आठवला.. मुलगा श्रीमंतघरचा म्हणून त्याच्या श्रीमंतीला साजेसा मानपान हवा होता.. लग्नात सुनेच्या अंगावर भरपूर दागिने दिसले पाहिजे आणि लोकांनी म्हंटले पाहिजे मोठ्या घरची मुलगी सून म्हणून आणली आहे ह्यासाठी अट्टाहास होता.. मग घाला की तुम्हीच सुनेला दागिने.. बैठकीत एकेक आवाज चढत होते.. एखादी वस्तू विकायला काढल्यावर जसा भाव केला जातो तशी गत होती.. जसा भेंडीबाजार भरला होता.. घासाघीस करता करता लग्न ठरले.. वरमाय मानपान ठरला.. सगळे खर्च मुलीकडे आणि मुलाकडे खर्च कमीत कमी.. मुलाला जन्म दिल्याने हे सर्व अधिकार प्राप्त झाले का लगेच असा प्रश्न मनात आला.. मुलाची आई म्हणत होती आम्ही आमच्या मुलीला भरपूर हुंडा दिला आहे त्यामुळे इतकं तर हवेच आमच्या मुलाला.. अहो पण तुम्ही इथे वसुलीला बसले आहात का..?काही केल्या काही त्यामागचे लॉजिक समजत नव्हते.. .न मागणाऱ्या व्यक्तीला देण्यात जास्त आनंद असतो हे इतके साधे त्यांना कळत नव्हते.. लाडक्या लेकीला हौशीने

स्वखुशीने स्त्रीधन दिले जाते आणि पुढेही माहेर म्हणजे तिचे हक्काचे आधारस्तंभ असतेच मग मागायचे कशाला..?काळ किती बदलला हे भानच नसावे का?.. मुलीचे शिक्षण आणि पगार दोन्हीही मुलाइतके असतांनाही मुलाकडील नातेवाईक स्त्रिया अटीतटीची भाषा करत होत्या.. प्रश्न पडला की ह्या स्त्रिया ही कुणाची तरी मुलगी आहेच ना.. की विसर पडला त्यांना आपल्या लग्नाच्या गोष्टीचा.. हिरारीने त्या भाग घेत आहे आणि विजयाचा आनंद चेहऱ्यावर ओसंडून वाहतो आहे. प्रत्येक लग्न म्हणजे एक सुरस कथाच असते.स्त्री स्त्रीला समजू शकत नाही का..?केवळ मुलगा जन्माला घातला म्हणून हे सर्व मागून घेतलेच पाहिजे का..?

असाच एक प्रसंग.. कष्ट उपसणाऱ्या अनुसया बाईची लेक लग्नानंतर एक वर्षातच माहेरी आली.. सासरी तिला घालूनपाडून बोलत होते.. सुख तर तिला लाभलेच नाही.. आपल्या गुणी संस्कारी मुलीचा छळ पाहून आईचे मन अस्वस्थ झाले होते.. एके दिवशी सासरची माणसे लेकीला घ्यायला आली त्यात सासू पण होती.. मध्यस्थ अनुसयाबाईला म्हणाला.. 'तुम्ही मुलाच्या आईच्या पाया पडा आणि आमच्या मुलीला नांदवा अशी विनंती करा मगच ते मुलीला घेवून जातील.. 'ह्यावर अनुसयाबाई कडाडल्या आणि मुलाच्या आईला म्हणाल्या.. 'बाई तू जितक्या

कळा दिल्या ना मुलाला जन्म देतांना तितक्याच कळा मी देखील मुलीला जन्म देतांना दिल्या आहेत.. नऊ महिने मी देखील लेकीला गर्भात वाढविले आहे मग असा भेद कशासाठी करायचा..?बाईचा जन्म आपणच असा बदनाम करायचा का..?तुला सून हवी तसा मलाही जावई हवाच आहे.. तुझ्या मुलाला मी आपले मानते मग तू माझ्या लेकीची अशी परीक्षा का घेत आहेस बरं..?' त्यांच्या ह्या प्रश्नावर मुलाकडचे लोक निरुत्तर झाले आणि त्यांनी मुलीला घरी चल अशी विनंती केली.

मन खूप विषण्ण झाले काहीच बदलले नाही असे म्हणायचे का म्हणजे बदल झाला तो केवळ वरवर झाला आहे.. समाजाचे अंतरंग अजूनही त्याच जुन्या विचारधारेत अडकले आहे.. हुंडापद्धत तर बंद झालीच नाही असं खेदाने म्हणावे लागेल.. तुम्ही देताय समोरचे टेबलाखालून घेताय पण त्याचा पायंडा पडतोय हा विचार कुणीच करत नाही.. त्यापेक्षा गरीबाकडे सोयरीक केली असती तर त्यातून त्याचे आयुष्य तरी उभे राहिले असते..

अगदी कानीकपाळी ओरडून समानतेचा नारा लावणारी मंडळी प्रत्यक्षात मात्र पुरुषी मानसिकतेला छेद देवू शकत नाही.. दोघांच्या भूमिका पूरक आहेत आणि दोघांचेही एकमेकांवर नितांत प्रेम आहे तरीही समानता की केवळ कागदावर असावी का हे फार

मोठे प्रश्नचिन्ह आहे.दोघांच्या आयुष्यातील अपूर्णता एकमेकांमुळे परिपूर्ण होत असते त्यामुळे लहान मोठेपणाचा प्रश्न नसतोच पण तो प्रश्न फणा काढून उभा असतो.. घरासाठी हसरी सून हवी असते आणि मुलीसाठी साजेसा जावई देखील हवा असतो.. कारण त्यामुळे नवीन कुटुंबव्यवस्था उदयास येत असते.. विशेष म्हणजे दोघांचे एकमेकांवर अंतस्थ प्रेम असते तरीही ही विचारांची चौकट त्यांना एकदम ओलांडता येत नाही.. हे सर्व सकारात्मक असतांना तिला मात्र सतत गृहित धरले जाते.. स्त्रीवादी भूमिकीतून नक्कीच लिहित नाही परंतु आजही जबाबदारीचे ओझे तिला असतेच असते.. कुटुंबाचा ती कणा असते.. स्वतःहूनच तिला आपल्या घरात गुरफटून राहायला आवडत असते.. ह्याचा अर्थ त्याने जबाबदारीतून हात झटकावे असं मुळीच होत नाही.. आताचा तो खूप चांगल्या अर्थाने बदलला आहे.. त्याला तिच्या कक्षा ज्ञात आहेत.. ती घरात बसली तर पर्यायाने त्याचेच नुकसान आहे म्हणून तो सामंजस्याने वागतो आहे..  तिला तिचे अवकाश बहाल करत आहे.. त्यात कुठेच उपकाराची भावना डोकावत नाही कारण ती सर्वच बाबतीत सक्षम आहे.. खांद्याला खांदा लावून काम करत आहे.. असे सगळे चित्र असतांनाही मानसिकता मात्र पूर्णतः बदलता आलेली नाही.. त्या मानसिकतेची शिकार तीच असते.. अगदी तिच्याच स्त्रीजातीला तिचे स्वातंत्र्य किंवा वर्चस्व मान्य

नसते मग सुरू होते सत्ता आणि अधिकार ह्यांना धरून शीतयुद्ध.. परवा एक जण म्हणाली की पूर्वी तरी एक बरे होते की उघडउघड सुनांचे छळ करायचे आता मात्र मानसिक छळवाद असतो जो कुणाला सांगताही येत नाही आणि दाखवता देखील येत नाही.. एकविसाव्या शतकाकडे झेप घेत असतांना आपण समानतेला खरोखरच स्वीकारले आहे का हे चाचपडून पाहिले पाहिजे.. .. काळ किती बदलला हे भानच नसावे का?.. तिलाही मोठेपण नकोच आहे.. त्याच्या सोबतच सदैव राहायचे आहे.

मी नसे क्षुद्र ती वहाण पायी..
मज नको देवीचे स्थान डोई..
या वसुंधरेच्या उदवहनाची..
मी असेन तुमच्यासंगे भोई..

# 33

# अकेले है तो क्या गम है..



वसुधा ऑफिसमधून घरी आली.. कसेबसे जेवण आटोपले आणि आपल्या खोलीत ती आली.. घरात कुणाशीच बोलायची तिची इच्छा नव्हती.. एकटेच रहावे निदान काही तास तरी असे तिला प्रकर्षाने जाणवले.. रस्त्याने ही रहदारी त्यात सतत वाजणारा हाताचा जणू वाढीव हिस्सा असलेला हा मोबाईल कुठेतरी फेकून द्यावा असे तिला वाटत होते.. पंचेचाळीस वर्षाची ती हल्ली अशी लवकर अस्वस्थ होत असे.. आताही तिने खोलीचे दार धाडकन बंद केले.. कुठलाच बाहेरचा आवाज तिला नको होता.. मोबाईल तिने बंद केला आणि स्वतःशीच हसली.. हो आता फक्त मी आणि माझा एकांत.. दुसरे कुणीच नाही.. दोन तास तरी ती खोलीबाहेर पडणार नव्हती.. मनात एक समाधानाची लहर उमटली.. आज वागले खरं स्वतःच्या मनाप्रमाणे पण थोडे अपराधी पण वाटते आहे.. घरातील कामे वाट बघत आहे.. बोलले पण नाही कुणाशी मी.. घरही

आपली वाट बघत असते.. हं पण नेहमीच काय दुसऱ्याला काय वाटेल म्हणून जगायचे?.. स्वतःसाठी कधी जगायचे नाही का.. आता ह्या क्षणी एकटे राहावेसे वाटतेय ही कदाचित त्या क्षणाची गरज असू शकते.. स्वतःशी संवाद साधायचा राहूनच जातो.मुले लहान होती तेव्हाही घर, नोकरी आणि सोबत मुलांचे संगोपन होतेच.. आता मुले बाहेर पडली तर हिच्यावर करडी नजर आहेच.. तिला अस्वस्थ करणाऱ्या अनेक गोष्टी तिच्या आजूबाजूला होत्या.. तिला अगदी उबग आला होता.. नेमकेपणाने तिला आपला मानसिक त्रास सांगता येत नव्हता पण तिला एक कोपरा मात्र नक्कीच हवा होता जिथे फक्त ती आणि तीच असणार होते.. स्वतःचे असे लाड तिला पुरवायचे होते.गर्दीत माणूस असा भांबावतो आणि त्याला गर्दीपासून दूर पळावेसे वाटते.. जेव्हा त्या गर्दीत आपल्याला समजून घेणारे कुणीच नसते तेव्हा ओघाने एकटेपणा येतोच.आपल्या काळजातील काही माणसे जरी सोबत असली की मन कसे भरून येते.. झाड जसे सुगंधी फुलांनी चोहीकडून डवरून येते अगदी तसेच हर्षभरित वाटू लागते आणि एकटेपणा तर औषधाला पण शिल्लक राहत नाही.. सुखद आठवणी मनात घोळवत एक तासातच ती ताजीतवानी झाली आणि मोबाईल चालू केला.. संदेशांची मग ही टपटप झाली.. मुलीचा फोन येवून गेला होता.. जगच जणू एक तासाने मागे पडले

की काय असे तिला वाटू लागले आणि पुन्हा ती माणसांच्या कळपात हरवून गेली.. स्वतःशीच हसू आले आणि तिने मान्य ही करून टाकले की आपल्याला अगदी थोड्या वेळच एकटे एकटे आवडू शकते कारण लहानपणापासूनच ती गर्दीत रमली आहे.एकटेपण आवडू शकते पण तो सवयीमध्ये परावर्तित होऊ न देणे आपल्या हातात असते.

मनुष्य हा नेहमीच समूहप्रिय असतो.. अनेक एकेकटे माणसे एकत्र आले की त्यांचा एक समूह बनतो.. आदिमानव टोळी करून राहायचा आता आपण व्हाट्सअँप समूहात रमतोच की.. तर समूहाचा भाग बनलेले ते समूहाचे नियम पाळू लागतात.. भावनिकदृष्ट्या त्यांना सुरक्षित वाटू लागते.समूहाचे राजकारण त्यांना ज्ञात होत जाते.. लहानपणापासून आपण एकीचे बळ ही गोष्ट वाचलेली असते.. एक काठी मोडायचा प्रयत्न केला तर लगेच तुटते आणि तेच अनेक काठ्या एकत्र बांधलेली लाकडाची मोळी तोडता येत नाही हे आपल्यालाही पटत असते पण हा समूह जेव्हा विशाल बनत जातो तेव्हा त्या समूहाला तोंड देत देता स्वतःशी असलेला संवाद खुंटतो आणि आपला श्वास गुदमरायला लागतो.. असं काही घडते की आपण समुहापासून दूर पळतो आणि मग एकटेपण हवेहवेसे वाटू लागते.. लोक म्हणतात काय एकलकोंडा

आहे हा माणूस.. पूर्वी किती भरभरून बोलायचा आणि आता मात्र वाट बदलून घेतो.. पाहून न पाहिल्यासारखे करतो.. कुणी म्हणते किती एकाकी आहे ना ह्याचे जीवन.. एकटेपणा ह्याला खात नसावा का?.. पण हा एकटेपणा त्यानेच ओढवून घेतलेला असतो.ऐकला चलो रे म्हणत तो जीवन जगतो आहे.. समुहापासून त्याला मुक्तता हवी असते.समूहाकडून त्याला निखळ आनंद हवा असतो जो कुठेतरी गढूळलेला असतो.

एकटेपणाचे पण किती प्रकार असतात ना.. .आयुष्यातील काही टप्पे धावपळीचे असतात तर काही संथ असतात.. मुले मोठी झाल्यावर घराबाहेर पडतात तेव्हा पालक एकटेपणा अनुभवतात.. कारण मुलांच्या गोंगाटाची त्यांना सवय झालेली असते.. मुले मोठी झाली तरी आई मोठी होत नाही.. हे गाणे ऐकतांना डोळ्यात टचकन पाणी येते.

'एकटी एकटी एकटी घाबरलीस ना आई

म्हणूनच तुला सोडून दूर गेलो नाही.' एखादी ती भरल्या गोकुळात पण एकटेपणाचा सामना करत असते.जगावेगळे असे काहीच नसते तरीही मन स्वीकारत नाही.

काहींना उतारवयात एकटे पडू ही भीती असते त्यासाठीच प्रत्येकाने आपले सोयीचे वर्तुळ आधीपासूनच बनवले पाहिजे जे

तुम्हाला एकटे पडू देणार नाही.एकटे मूल वाढविण्याऱ्या एकल पालकांचा एक समूह आहे.. ज्यांना एकच लेक आहे त्यांनी समूह बनवला आहे.. एकल महिला संघटना आहे.. थोडक्यात काय तर भविष्याची मानसिक तरतूद आजच ह्या मंडळींनी केली आहे.. नंतर एकटेपणा आपल्याला कोलमडून टाकेल म्हणून आजच पावलांची दिशा बदलावणारी ही मंडळी आहे.काहींना अकारण एकटेपणा सहन करावा लागतो.. एकटी असलेली ती दुकट्याच्या प्रेमात पडते आणि दुकट्याची पत्नी एकटी पडते.. अशी अनेक उदाहरणे आपण आजूबाजूच्या जगात पाहत असतो.. ज्याचा त्याचा आनंद असला तरी आपण एकटेपणा दूर करण्याच्या नादात कुणाच्या एकटेपणाला कारणीभूत तर नाही ठरत ना ह्याकडे लक्ष असले पाहिजे.जन्माला येतो तेव्हा एकटेच असतो आणि जग सोडतांना देखील एकटेच असतो.. सरणापर्यंत साथ देतो तो मनातला एकाकी भाव असतो.एकदा वर्तमानपत्रात जाहिरात वाचली होती की एका जेष्ठ व्यक्तीला दुपारच्या वेळात रमी खेळण्यासाठी सोबती हवा आहे.. जाहिरात वाचून अंतर्मुख झाले पण ते वास्तवच होते.. बंदिस्त दाराआड असा एकटेपणा फोफावतो आहे.काहीजण त्यासाठी पाळीव प्राण्यांना जवळ करतात.. काहीजण पुस्तकांमध्ये हरवून जातात.. काहींची गाण्यात समाधी लागते.. काहीजण स्वतःहूनच समोरच्या व्यक्तीशी बोलत सुटतात.. एकटेपणा त्यांना सहन होत

नाही.. उंच आकाशात सुर्यालाही एकाकी वाटत असेल का..?त्याची किरणे सारखी डोकावून बघत असतात आणि घराला ऊब देत असतात.एक आजोबा बंगल्यात एकटेच असतात तेव्हा त्यांच्या सोबत घरात मोठ्या आवाजातला टीव्ही असतो.

एकटेपण आवडत्या व्यक्तीच्या नसण्यामुळे देखील येत असते.गर्दीत ती व्यक्ती सोबत नसली की एकटे पडल्यासारखे वाटते.क्षितिजावरील चंद्रही मग उदास एकाकी भासू लागतो.. सभोवताली चांदण्या असतात तरीही.. पिल्लू जेव्हा पंखात बळ आल्यावर घरट्याबाहेर झेप घेत असते तेव्हा ते एकटेच असते पण त्या एकटेपणात आकाशाला गवसणी घालणारा आत्मविश्वास सामावलेला असतो.. कधीतरी काही पावले तरी एकटे चालून पहावे.. निदान त्या निमित्ताने आपल्यासोबत किंवा पुढेमागे कोण चालतय हे लक्षात येते.. स्वतःच्या क्षमता समजतात आणि कुणी आपल्याला शोधायला आले आहे का हे पण चाचपडून बघता येते पण म्हणून दूरवर एकटे चालण्याचा अट्टाहास नको.. खरंतर एकाकीपणाची ही भावना आपल्याच मनातून उगम पावलेली असते.. 'अकेले है चले आओ कहा हो.. ' अशा गाण्याच्या ओळी आर्त वाटू लागतात.. आतून आतून कोसळल्याची भावना एकटे करून जाते.. मी एकटा पडेन का अशी असुरक्षिततेची भावना

त्याच्या मनात डोकावते.. जगापेक्षा जास्त यशस्वी झालो तर मी एकटा पुढे जाईन आणि बरोबरीचे मागे पडतील.. "मेले मे अकेले.. 'अशी गत होईल ही भावना मनात घर करत जाते.. .

'चल अकेला चल अकेला चल एकेला..

तेरा मेला पिछे छूटा राही चल अकेला.. '

हो.. काहींना एकटेपणा मनापासून आवडतो.. ते चक्क आपल्या एकलेपणावर खुश असतात.मी आणि माझे वर्तुळ इतकेच त्यांचे सिमित जग असते.कुणाशीच घेणेदेणे नसते.आपल्याला असे वाटते की ह्यांच्यावर एकटेपण लादले असावे का पण तसेही नसते.. काहींना आयुष्यात तडजोड नको असते.. स्वातंत्र्याची ओढ अगदी अनावर असते.. बंधने तर त्याहून नको असतात.. प्रेमाचा शिस्तीचा पहारा नको वाटतो.. गॅझेट्सचा वापर वाढत जातो.. बाकीची मंडळी सोशल आहेत ह्याचा पण त्यांना त्रास होत असतो.. आभासी जगात रात्रंदिवस रमणारी ही मंडळी शेजारी कुणी येऊन उभे राहिले तरी दखल घेत नाही ही देखील एक प्रकारची सामाजिक हानीच असते.. जो तो आपल्या आपल्या नादात गुंगला तर समाजधुरा कुणी सांभाळायची हा एक प्रश्नच आहे.. माणसाला माणूस ओळखत नाही.. लग्नाचे वय वाढते.. लग्न करण्यापेक्षा एकटे काय वाईट असा प्रतिप्रश्न लग्नाळू

उपवरांकडून येतो तेव्हा समाजपुरुष खडबडून जागा होतो.. अकेले है तो क्या गम है असं ते म्हणत असतात.. गर्दीत एक ठिपका होण्यापेक्षा एकांताचा पूर्णचंद्र काय वावगा असा त्यांचा रास्त प्रश्न असतो.. असा जर प्रत्येकाने आपला कंफर्ट झोन सोडलाच नाही तर आपली कुटुंबव्यवस्था डगमगू लागेल.काही लोकांना वाटते की मी म्हणजे अगदी परिपूर्ण आहे.. त्यांच्या 'मी'पणामुळे ते एकटे पडतात..

शायरजी म्हणतात..

'जाने क्यो अकेले रहने को मजबूर हो गये..

हो गये तन्हा इस महफिल मे..

कि हमारे अपने भी हमसे दूर हो गये.. '

# 34

# असेन मी.. नसेन मी



प्रिया एक पंचेचाळीस वर्षाची उमद्या व्यक्तिमत्वाची उद्योजक स्त्री.. राहणीमान आणि बोलणे सारे काही छान छान.. गळयात ठश ठशीत मंगळसूत्र आणि गोऱ्या कपाळावर लालचुटुक टिकली.. माझ्या बालपणातील ती सखी प्रिया.. आमच्या घरी शाळेच्या मधल्या सुटीत येत असे.. काही नाती कशी असतात ना की ज्यांना मधली काही वर्षे सहवासाचे पाणी मिळत नाही तरीही ती टिकून राहतात.. प्रिया पण मला आज खुप दिवसांनी मैत्रीदिनानिमित्त भेटली आणि आम्हाला दोघींना मनापासून आनंद झाला.. काय बोलू आणि काय नाही असे झाले होते.. कितीही तास गप्पा केल्या तरी ती मधली वर्षे भरून येणार नव्हती पण आमचा प्रयत्न नक्कीच त्या दिशेने होता..

प्रिया अगदी सफाईदार ड्राइविंग करत असे.. तिच्या कारमध्ये तिने मला बसवले.. आम्ही लांब फेरफटका मारून येणार होतो.. गप्पांचा पाऊस आज नक्कीच पडणार होता.. कारचे दार तिने

उघडले तोच समोर तिच्या पतीचा संजयचा फोटो दिसला.. फोटोतून संजय जणू आम्हा दोघींना अभिवादन करत होता आणि आमच्या गप्पांमध्ये भाग घेत होता.. मी एकदम चपापले.. थोडे गंभीर झाले.. आठ वर्षे होऊन गेले त्याला जाऊन पण असा एक क्षणही गेला नसेल की ती त्याला विसरली असेल.. माझी भाववस्था पाहून प्रिया हसत म्हणाली अग मी बऱ्याचदा बाहेरगावी सहासात तास प्रवास एकटीने करते तेव्हा हा फोटो पाहिला की असे वाटते आम्ही सोबतच आहोत..

प्रियाच्या बोलण्यात सारखा त्या दोघांनी एकत्र घालविलेल्या क्षणांचा उल्लेख येत होता.. एकमेकांवर निस्सीम प्रेम करणारे ते हसरे सुखी दाम्पत्य.. एकाला काही लागले तर दुसऱ्याच्या डोळ्यात आसू उभे राहणार.. सहवास सुखाचा आणि तरल आनंदाचा त्यांनी उपभोगला.. आता ते सुख त्याच्या अवचित जाण्याने सरले होते पण मागे राहिलेल्या आठवणी आज तिला परत त्या सुखाची अनुभूती देऊन जात होत्या.. संसाराच्या परमोच्च आनंदाच्या क्षणी नियतीने त्याला तिच्यापासून हिरावले आता दाद तरी कुणाकडे मागणार..?अचानक आजाराचे निमित्त होऊन पंधरा दिवसात खेळ संपला.. त्या आजारात तिने त्याला विझतांना पाहिले.. त्याच्या डोळ्यातील प्रेम मात्र तिच्यावर वर्षाव करत

होते.. शेवटची त्याची तगमग पाहता तिने देवाला हात जोडले की ह्या जीवघेण्या यातना त्याला नको देऊ.. पाहवत नाहीय मला आणि त्या क्षणी देवाने तिचे मागणे ऐकले आणि त्याची सुटका केली.. वास्तवाचा स्वीकार करायला जड जात होते.. त्याच्या तिच्या प्रेमाची निशाणी असलेला तिचा गोंडस मुलगा तिचा आधार शोधत होता.. त्याच्याकडे पाहत तिने कसेबसे आपले कढ आवरले.. प्रियाचे बोलणे ऐकून माझे डोळे भरून येत होते.. किती धीरोदात्तपणे प्रसंगाला सामोरे जात आहे ती हे पाहून मला तिचा एकदम अभिमान वाटला.. प्रियाने संजयचा व्यवसाय वाढीस नेला होता आणि मुलाला उच्चशिक्षण देऊन उत्तम घडवले होते..

विषय बदलावा आणि तिला बरे वाटावे म्हणून मी म्हंटले किती छान दिसतो तुला हा सिल्कचा ड्रेस त्यावर ती म्हणाली अग हा त्यानेच मला भेट दिला.. शेवटच्या घटका मोजत होता आणि माझा वाढदिवस आला तर माझ्या बहिणीकरवे ड्रेस आणवला आणि मला घालायला लावला.. डोळ्यात त्याच्या माझीच छबी पाहून मला गलबलून येत होते.. त्याचे आणि माझे कधीच भांडण झाले नव्हते ह्याचे मला आश्चर्य वाटते.. त्याला दूर न्यायचे होते तर भेटवले तरी कशाला नियतीने आम्हाला.. मी उदास राहिलेली त्याला आवडत नसे म्हणून आता आतून आतून उभे राहण्याचा

प्रयत्न करतेय कारण मला माहित आहे की तो आहेच माझ्या आसपास.. तो दूर नाहीच राहू शकत.. प्रियाचे शब्द माझ्या काळजात घर करत होते.. कुठून बरे हिने इतका धीर एकवटला असावा ना.. बोलता बोलता तिचे घर आले देखील.. आम्ही कारमधून उतरलो.. ती म्हणाली चल छानशी कॉफी घेऊ या.. तिचे घर कलात्मकरित्या सजवले होते.. तिने सर्व रूम्स दाखवल्या.. त्यांची बेडरूम दाखवली आणि तिथला त्याचा पुरुषभर उंचीचा हसरा फोटो पाहून मी थक्क झाले.. प्रिया म्हणाली दिवसभराच्या कामातून निवांत झाले की इथे येते आणि सारे काही त्याला सांगते.. मन कसे हलके होऊन जाते.. त्याच्या कुशीत जणू मी गाढ झोपून जाते.. मला एकदम श्रमपरिहार झाल्यासारखे वाटते आणि मी पुन्हा नव्या दिवसाची आखणी करत रुमबाहेर पडते.. तितक्यात तिचा मुलगा आला.. उंचपुरा आणि दोघांवर गेलाय असा वाटणारा.. आईची खुपशी काळजी घेणारा तो विचाराने प्रगल्भ वाटला.. मी खरंतर विचारात हरवून गेले होते पण प्रियासाठी स्वतःला सावरत होते.. किती सोसलेय माझ्या सखीने तरी आनंद पेरतेय संसारात.. जगण्याचा उत्सव तिच्याकडून शिकला पाहिजे.. त्याच्याशिवाय अशक्यप्राय वाटणारे जगणे ती जगू पाहतेय.. मी तिला मनोमन सलाम केला आणि तिच्याविषयीचा माझ्या मनातील आदर अधिकच दुणावला.. खरंच ह्यालाच जीवन ऐसे नाव.. मी तिच्याशी

काहीच बोलू शकले नाही.. माझ्या शब्दांनी तिच्या मनाची पडझड झाली असती जी मला नक्कीच अक्षम्य होती आणि मला तिचे आभासी भावविश्व विस्कटण्याचा नक्कीच अधिकार नव्हता.. तिला मनोमन वेळ देण्याचे ठरवून मी तिथून बाहेर पडले.. .जगात किती विविधता आहे ना की आपण विचारच करू शकत नाही.. केवळ दोन शरीरे पण मन मात्र एकच.. मग भौतिक पातळीवर ती व्यक्ती अस्तित्वात नसली तरी त्या व्यक्तीचे मनात 'असणे' म्हणजे नेहमीच चैतन्याचा झरा ठरू शकते..

जेष्ठ कवियत्री शांता शेळके ह्यांच्या कवितेतील पुढील ओळी म्हणूनच काळजात घर करतात. 'असेन मी, नसेन मी, तरी असेल गीत हे..

फुलाफुलांत येथल्या उद्या हसेल गीत हे.. '

# 35

# पासवर्ड नामक सुपरवर्ड..

मधली सुटी झाली तशी परी धावतच शाळेच्या गेटवर गेली.. आई आज डबा बनवू शकली नव्हती म्हणून नवीन ड्रायव्हर काकांसोबत आई डबा पाठवणार होती.. त्यांना परीने एकदाही पाहिलेले नसते.. परीचे नाव एक काका गेटवर विचारत असतात.. परी सावध होत ऐकत असते आणि स्वतःहुन पुढे जाते.. काका म्हणतात 'तूच का परी.. मॅडमने डबा दिला आहे.'.. 'अहो पण डब्यात काय आहे.. काका म्हणतात.. 'अटक मटक चवळी चटक.. ::ते असे म्हणताच सोनूली परी काकांना टाळी देते आणि मोठ्या बाईंसारखे म्हणते.. ' ह.. तर तुम्हीच आहात आमचे ड्रायव्हरकाका.. द्या डबा भूक लागली आहे .. आणि आईला सांगा चवळी लागली गोड गोड जीभेला आले फोड फोड.. 'काका म्हणतात 'म्हणजे मी हे घरी सांगायचे का..?'.. 'अहो इतकेही कळत नाही का आमची सीक्रेट भाषा आहे ही.. आईची आणि माझी.. ''हो का.. येईल हळूहळू माझ्या लक्षात ही सांकेतिक भाषा.. 'तिथे हजर असलेल्या परीच्या

मैत्रिणी गालातल्या गालात हसत असतात.. त्यांना त्या शब्दांची गम्मत वाटू लागते आणि त्या म्हणतात .. 'चला आपण अटकमटक खेळू या.. ' परीच्या सुरक्षिततेसाठी आईने ही शक्कल लढवलेली असते पण ती किती उपयुक्त असते.. जसे पूर्वीच्या काळी राजे महाराजे युद्धात समोरासमोर आले की एकमेकांना ओळखू यावे म्हणून 'परवलीचा शब्द' वापरत. त्या शब्दाचा अर्थ शत्रूला माहितच नसायचा.. मग आपले कोण परके कोण ते लक्षात यायचे..

परवलीचा शब्द म्हणजेच ज्याला पासवर्ड असे संबोधले जाते.. किती किती पासवर्ड लक्षात ठेवावे लागतात त्याला गणतीच नाही.. हुकुमाचा एक्का असे म्हंटले तरी चालेल.. ज्याची स्मरणशक्ती तल्लख तोच ते लक्षात ठेवू शकतो.. पाकिटात तीन-चार बँकांची कार्ड्स असतात.. बँकेचा व्यवहार करतांना पासवर्ड आठवावा लागतो.. जीमेल, फेसबुक, ट्विटर सगळीकडेच परवलीचा शब्द लागतोच लागतो.. नाव, जन्मतारीख, कुटुंबातील व्यक्तींची नावे, जन्मतारीख, लग्नाची तारीख असे सारे काही वापरून झालेलं असते मग काय ठेवावा पासवर्ड हा मोठा प्रश्नच असतो.. मुलाला फोन करून पासवर्ड विचारते तेव्हा त्याला माझी प्रचंड काळजी वाटते.. ममा लक्षात ठेवायचे आणि हो लिहून नाही ठेवायचे.. हो रे बच्चा असं त्याला मी समजावते.. मल्टिटास्किंग

जमाना असल्याने आधीच मेंदूची खूप शकले झाली आहेत .. मेंदूत काय काय आणि कसे कसे साचवणार हा मला पडलेला भाबडा प्रश्न पण मी त्या प्रश्नाला दूर सारण्याचा मनापासून प्रयत्न करते.. मग डोकं लावून विचारांती छान पासवर्ड तयार करते.. स्वतःवर बेहद्द खुश पण होते पण पुन्हा तेच.. त्यात तो पाठ होतो तोपर्यंत बदलण्याची वेळ येवून ठेपलेली असते कारण खूप दिवस झाले की पासवर्ड बदलावा म्हणे.. व्हाट्सएप महाराज भीती घालतच असतात संदेश पाठवून.. पुन्हा पुन्हा मी साशंक होत जाते.. कधी कधी अगदी आठवेल असे वाटते पण काहीतरी एखादा आकडा इकडेतिकडे होतो.. असे वाटते खुल जा सीम सीम होवून जावे.. असा हा पासवर्ड तो तयार करायचा लक्षात ठेवायचा आणि कुठे वापरायचा आहे हेही जाणून घ्यायचे कसबच म्हणावे लागेल.. सामानाच्या बॅगला आकड्यांचे लॉक तेही लक्षात ठेवा.. असे होते ना की ती वस्तू जास्त सुरक्षित ठेवण्याच्या नादात आपले व्याप वाढत असतात..

लहानपणी मे महिन्याच्या सुटीत मी गोष्टींची पुस्तके वाचायचे त्यात असेच असायचे की तो भलामोठ्ठा पेटारा असतो.. त्यात खजिना असतो आणि राजपुत्र जवळ येताच ठराविक शब्द उच्चारतो आणि मग पेटारा उघडतो.. अशी पण गोष्ट असायची त्या

राजाचा प्राण पोपटात असतो.. पोपटाची मान मुरगळली की राजा गतप्राण.. गंमतही वाटायची आणि असे प्रत्यक्षात असेल का असा बालसुलभ प्रश्नही पडायचा.. पण असे असतेच ना मनाचे लागेबांधे असतातच.. नात्याचे रेशीम धागे असतात.. मन मनात अडकलेले असते.. तू फक्त माझे नाव सांग तुझे काम होवून जाईल.. ते नाव म्हणजे जणू काही पासवर्ड असते.. लोक एकमेकांच्या ओळखीचे भांडवल करत असतात आणि मग आपणच शब्दात अडकतो.. अर्थात त्यामुळे माणसे जोडली जातात.. विशेषतः स्त्रिया त्यांच्या माहेरच्या गावाशी मनाने बांधल्या गेलेल्या असतात.. मग माहेरच्या गल्लीतील कुत्रे देखील आपले वाटते.. विश्वाच्या अफाट पसाऱ्यात मोजक्या लोकांशी आपले सूर जुळत असतात.. एखादी व्यक्ती आपल्याशी अतिशय फटकून वागत असते तरीही आपल्याला त्या व्यक्तीचे भलेच व्हावे असे अंतर्यामी वाटत असते.. काही प्रश्नांना उत्तरे नसतात हेच खरं.. आपले हळवे भावबंध त्यात अडकलेले असतात.. एखादी मायेची व्यक्ती आपली वीक पॉईंट असू शकते.. तुमच्यासाठी आणि तुमच्यासाठीच मी आनंदी राहणार आहे बरं का.. म्हणजे ह्या आनंदाचा पासवर्ड देखील आपण कुणाच्या तरी हाती सोपवलेला असतो.. कुणाच्या तरी असण्यावर नसण्यावर हा आनंद अवलंबून असतो.. कुणाच्या तरी येण्यावर जाण्यावर आपला आनंद

अवलंबून असतो.. अर्थात ती मनाची विभ्रमावस्था असते त्यातून बाहेर आलेच पाहिजे..

'रुसूबाई रुसू कोपऱ्यात बसू.. '.. .गोबऱ्या गालांची परी का रुसली तेच कळत नाही.. काय असावा बरं पासवर्ड?.. त्यातला वर्ड शब्द महत्वाचा आहे.सगळे तिला मनवत आहेत पण कळी काही खुलत नाही.. 'आमचा राजू का रुसला.. आमचा राजू का रुसला.. ' या गाण्यातील राजू पण रुसला आहे.. त्याला हसवण्याचा प्रयत्न होतो आहे.. आपल्या काळजातील माणसे खुश असली पाहिजे असे मनापासून वाटते.. दुःख त्यांच्या आसपास फिरकूच नये असे वाटत राहते.. कसेही करून मनापर्यंत पोहोचवणारा पासवर्ड आपल्याला हवा असतो आणि त्याचा शोध अविरतपणे चालू असतो.. 'जो तुमको हो पसंद वही बात कहेंगे.. तुम दिन को अगर रात कहो रात कहेंगे'..

चला तर मग शोधू या असे अगणित पासवर्ड जे झटदिशी मनाचे दरवाजे उघडत जातील..

# 36

# आभासी वास्तव..



जन पळभर म्हणतील हाय हाय..

नव्वदी पार केलेल्या आजी निवर्तल्या.. समृद्ध जीवन जगलेल्या आजींचे सोने झाले असे प्रत्येकजण म्हणू लागला.. आपण जन्माला येतो तेव्हाच काही श्वास आपल्या खात्यात जमा असतात.. ते संपले की इहलोकीचा प्रवास सुरु होतो.. जी व्यक्ती जाते तिच्या दृष्टीने हा दिवस महत्वाचा असतो अगदी खूप वय झाले तरी.. विशेष म्हणजे चालता बोलता मरण आले हे भाग्यच म्हणायचे आजींचे.. दोन श्वासांच्या दरम्यान अवघे जीवन असते.. वास्तव हेच की पिकले पान निसर्गनियमाने गळून पडते आणि त्याची जागा नवपालवी घेत असते.

जगण्यातील निवांतता हरवत चालली आहे हे मात्र खरंच आहे.. रेंगाळायला किंवा स्मृती जागवायला वेळ नाहीच कुणाकडे.. दुःख उगाळायला उसंत नाहीच.. जो तो आपला धावतोय आणि धावतच जातो.. त्या दिवशी मी पण तिथे मरणघरी एक स्नेहीपरिचित नात्याने गेले होते.. अगदीच शांतता होती.. आधी तर मला वाटले मी घर चुकले की काय..?.. आजी पण अगदी शांत पहुडल्या होत्या.. सहज विचार आला मनात की किती किती साचले असेल ना ह्यांच्या मनात.. कातडीला सुखदुःखे चिकटलेली असतील त्याचे काय होत असेल पुढे.. स्त्रीच्या जीवनातील सर्वच स्थित्यंतरे त्यांनीही अनुभवली असतील.. काही अनुभव तर स्त्रीच्या समवेत संपत असतील नाही का.. काही क्षण सन्मानाचे असतील तर काही मनाच्या तळघरात डांबून ठेवलेले असतील.. खूप चांगली कर्मे केले असतील.. काही चुकाही झाल्या असतील.. .शेवटी माणूसच आहे ना.. माणूस गेले की सगळेच संपते.. माझी विचारशृंखला सुरूच होती.. आजी शाळेत शिक्षिका होत्या.. आजवर अगणित विद्यार्थ्यांच्या जीवनाला त्यांनी आकार दिला होता.. मी मनोमन त्यांना अभिवादन केले..

सहजच तिथे बसल्याबसल्या काही गोष्टींची नोंद मनाने घेतली.. म्हंटले तर रोजच्या जगण्यातील ह्या गोष्टी असतात..

तिथेही मानवी वृत्तीचे दर्शन होत जाते.. त्यात जगावेगळे असेही काहीच नसते.. आजी संध्याकाळी आठ ला गेल्या मग उद्या सकाळी त्यांना नेणार होते.. त्या दृष्टीने अंतेष्टीच्या सामानाचे नियोजन पुरुष वर्गात सुरू होते.. आतल्या खोलीत गडबड जाणवत होती.. निरोप गेले का नातेवाईकांना अशी विचारणा होत होती.. आजींचे मुलेसुना पन्नास ते साठ वयादरम्यानचे.. नवमाध्यमे सहजतेने हाताळणारे होते.. सुनबाई म्हणाल्या मी टाकलंय सगळ्या नातेवाईक ग्रुप्सला.. सासरमाहेर समुहाला आजींची निधन वार्ता दिली आहे त्यावर दोघांच्याच प्रतिक्रिया आल्या.. नमस्कार आला.. आदरांजली आली.. फुले आली.. तेवढ्यात मुलगी म्हणाली इतके पंचवीस जण आहेत सगळे मामामावशी आणि त्यांचे मुलंमुली.. पाहिले नसेल का त्यांनी व्हाट्सअँप पण एक तास झाला पोस्ट करून म्हणजे एव्हाना बघायला पाहिजे होते.. आजींचा मुलगा म्हणाला फोन करु या का त्यापेक्षा.. दुसरा मुलगा म्हणाला थांब अजून थोडयावेळाने करू वाट पाहून.. तोपर्यंत सगळ्यांची जेवणे आटोपतील.. उगाच कुणाला उपवास नको आईमुळे.. नातू म्हणाला अग उजवीकडे तो गोल असतो ना व्हाट्सअँप खिडकीला तो चेक कर ना म्हणजे सीन बाय किती जणांनी हे कळेल.. मग त्यावर भरपूर चर्चा झाली.. मोबाईलमधील सामाईक खिडकीऐवजी वैयक्तिक खिडकी उघडली गेली..

प्रतिक्रिया विचारपूर्वक दिली जात होती.. अग सुधामावशीच्या सुनेने पाहिले आहे म्हणजे आता निधनवृत्त मावशींना कळले असेल का..?आणि समजा कळले तर त्या नक्कीच आकांत करतील.. त्यांचेही वय झाले त्यामुळे बाहेरगावाहून निघाताही येणार नाही.. दोघी बहिणींची अगदी घट्ट माया होती आणि मैत्री पण.. इतक्या वर्षांचा सहवास अचानक खंडित होणार तर वाईट वाटणारच.. क्षणभर सगळेच चिंतेत पडले .. पण स्वीकारावे तर लागणारच होते.. मी नेलेला चहा सर्वांनी घेतला.. मग जेवणाचे काय असंही शेजारी विचारत होते.. जेवणाचे डबे आले.. कुणी ओठातून तर कुणी पोटातून विचारत होते काही जेवण पाठवू का वगैरे.. पिठल्याचा दरवळ भुकेची जाणीव देत गेला मग अंगतपंगत बसली.. 'काय करणार नको वाटते आहे जेवण पण चार घास पोटात ढकलावे लागतीलच.. 'असे एकमेकांना समजवत जेवण पार पडले.. त्यातही एकीने पिठल्यात हिरवी मिरची चांगली लागते की तिखट ह्यावर दबक्या आवाजात चर्चा केली.. सगळे एकत्र असले की दोन घास जास्तच जातात म्हणे.. कसं असते ना मागे राहणाऱ्या व्यक्तींचे रुटीन चालूच ठेवावे लागते.. मनात दुःखाने गर्दी केली तरी वास्तवात उभे रहावेच लागते.. मी पुन्हा विचारचक्रात हरवून गेले.. माणसाला आधी स्वतःच्या जीवाची काळजी असते नाही का?.. त्यात चूक काय आणि बरोबर काय कोण ठरवणार?.. जाणारा तर

गेला पण जे मागे राहिले त्यांना काळजी घ्यावी लागते.कधी कधी जवळच्या नात्यात पण दांभिकता जाणवत जाते..  आत एक अन बाहेर एक अशी भिन्नता असते.. काही तास आपण शांत बसून विचार नाही करू शकत का..?त्या व्यक्तीसाठी आपण नंतर वेळ देणार नसतोच.. निदान अशा वेळेस तरी दिवंगतांच्या आठवणी जागवल्या पाहिजे पण त्यातही उरकणे अपरिहार्यपणे येते.तितक्यात सुधामावशी दारात अवतरल्या..  त्यांना शोक आवरत नव्हता.. इतक्या वर्षांनी बहिणीची साथ सुटली होती.. भावना अनावर झाल्या होत्या.. नंतर त्या जवळजवळ कडाडल्याच भाच्यांवर..  अरे कळवले का नाही आधीच .. तिला धुगधुगी होती तेव्हाच आले असते ना.. भाचा म्हणाला.. 'मावशी शांत हो.. तुझ्या तब्बेतीचा विचार कर.. आणि आम्ही कळवले होते व्हाट्सएपला.. 'त्यावर मावशी म्हणाल्या.. 'चुलीत घाल तुझे व्हाट्सएप.. एक फोन करायला काय झाले होते रे..?सगळीकडे असे शॉर्टकट काय कामाचे रे बाळा.. इतकं वरवरचं नातं होतं का आमचं.. 'मावशी बऱ्याच वेळ बोलत राहिल्या.. सगळेच निरुत्तर होते आणि काहीसे हतबल पण.. वैचारिक वाद घालण्याची ती वेळ नक्कीच नव्हती पण त्या निमित्ताने जगण्यातील वास्तव समोर येत होते.सोशल विवेकबुद्धी वापरणे किती गरजेचे आहे तेही लक्षात घेतले पाहिजे.. आभासी जग आणि वास्तव जग आपण जेव्हा जोडू पाहतो तेव्हा

अशी काही मने दुखावली जातात.. वेळ वाचवणारी ही स्मार्ट माध्यमे कधीकधी नातेसंबंधांना जोडून ठेवू शकत नाही.. दुःख आभासी भिंतींवर थापले की झाले आपले इतिकर्तव्य हे मान्य करायला आजींच्या पिढीला जड जात हो ते.. अशी वार्ता आली ग्रुपला की मन थरथरते.. काय प्रत्युत्तर द्यावे कळत नाही.. आपण तिथेच आदरांजली वाहतोय ही अपराधीपणाची भावना जोडीला असतेच.. पण आपणही प्रवाहात सामील होत जातो.. आपली प्रत्यक्ष उपस्थिती खरे तर गरजेची असते.. कधी कधी असेही वाटते की कुठलीही व्यक्ती हयात असतांना आपण आपला वेळ द्यावा.. आणि ती व्यक्ती जर आपला वेळ मागत असेल तर ती नक्कीच द्यावा.. आपल्यालाही कधी वेळेचे गणित जमते तर कधी नाही जमत तोच अशी नसण्याची वार्ता येऊन धडकते.. विचाराधीन होत जातो..

दुःखाच्या अनेक जातकुळी असतात.. ज्याचे त्याला ज्ञात असते.. आपण त्या क्षणी किती वेळ देतो हे महत्वाचे ठरते.. समाजसेवेच्या गप्पा करणारे अशा वेळेस फिरकत नाही.. किंवा ती तीव्रता कमी झाल्यावर मग औपचारिकता म्हणून फिरकतात.. त्यांच्या समाजसेवेअंतर्गत ही सेवा बसत नाही.. माझी एक सखी स्वतःहून समन्वयकाचे काम बघते.. अशा घरी जेवणाची व्यवस्था

बघते.. त्यामागे अन्न वाया जाऊ नये आणि त्या कुटुंबाला खरोखरच ज्यांना काही द्यावेसे वाटते आहे त्यांच्यासाठी मार्ग शोधून देते.. अगदी स्वतःहून तिने ती जबाबदारी स्वीकारली पण त्यातही तिला कटू अनुभव आले.. बोलबच्चन लोक तिला टाळू लागले.. तर काही जणींनी तिच्याकडून खूप अपेक्षा केल्या.. प्रत्येक वेळी तिला जमेलच हे काम करणे असे नाही.आता ती थोडी सजग झाली आहे.. काहीच न करणाऱ्या लोकांना जगाकडून मात्र अपेक्षांचा डोंगर असतो.. आता ती फक्त आत्मिक समाधानासाठी अशा जबाबदाऱ्या घेते.. जगण्याचा अनुभव असतो तो आणि तो आपल्याला सदैव आतल्या कप्प्यात लपवून ठेवायचा असतो.. .आवडून जातात पुढील ओळी..

'जब हसता हू तो हसने दो

जब रोता हू तो रोने दो


कभी कभी तो रोता हू..

कभी कभी तो रोने दो.. '

कुणासाठी दोन अश्रू ओघळले तर ओघळू द्या.. त्या व्यक्तीसाठी निदान इतके तरी करावे.

# 37

# तू खिच मेरी फोटो..



'काय ग केव्हा पासून मोबाईल मध्ये डोकं घालून बसली आहेस.. वेळ आहे तर जरा बोल की माझ्याशी.. '

'काही नाही ग गॅलरी साफ करतेय.. '

'मोबाईल मधली का..?'.. .

'हो हो.. .खूप भाऊगर्दी झाली आहे फोटोंची.. पाहिजे ते फोटो ठेवायचे बाकीचे उडवायचे हेही एक काम असतेच.. '

आताही दोघी मैत्रिणींचे त्यावर एकमत झाले आणि त्या खळाळून हसल्या.. रिकामा वेळ मिळाला आहे तर गॅलरी सफाई अभियानात त्या गढून गेल्या.

घराची गॅलरी स्वच्छ केली की गॅलरी आनंदाने हसत असते तशी ही गॅलरी पण अधून मधून स्वच्छ करावी लागते नाहीतर

मोबाईलचा जीव घुसमटायला लागतो.. टांगणीला लागतो म्हणजेच काय तर मोबाईल ह्यांग होतो.. मजेचा भाग सोडून देऊ या पण गॅलरीची काळजी नक्कीच घ्यावी लागते.. तिथले फोटो बाजूला फेकतांना निर्जीव मोबाईल आपल्याला विचारत राहतो.. नक्की ना तरच ओके म्हणा.. म्हणजे काय तर तोही साशंक होतो.. प्रत्यक्ष जीवनात मात्र काही नाती कुठल्याही क्षणी पुर्वसूचनेविना तुटतात.. थोडी तरी कल्पना द्यायला हवी होती म्हणजे मानसिक पातळीवर स्वीकारणे सोपे झाले असते.. असो..

गॅझेट्सचा जमाना आणि जगू या गॅझेट्ससंगे असे सगळे असतांना प्रत्येकाला सतर्क राहणे गरजेचे ठरले आहे.. गॅझेट्सशिवाय आपले जीवन ही संकल्पना स्वीकारायला वेळ लागत आहे.हल्ली अगदी सहज आपल्या आजूबाजूला नजर फिरवली की लक्षात येते की प्रत्येकजण जगण्याचा उत्सव साजरा करण्यात गुंतून गेला आहे.. प्रत्येक क्षण भरभरून जगायला प्रत्येकालाच आवडते.. जीवनात भेडसावणारी असुरक्षितता आणि त्यातून येणारी ही जीवन असोशीने जगण्याची भावना.. .आणि काहीशी स्पर्धा देखील आहेच.. जणू काही जीवन जगण्याची घाई प्रत्येकालाच झाली आहे.. 'जो भी है बस यही एक पल है.. ' हे वास्तव जेव्हा आपण स्वीकारतो तेव्हा हा प्रत्येक पळ पकडून

ठेवण्याचा प्रयत्न करू लागतो.. आणि हातात मोबाईलरुपी कॅमेरा असतोच मग आपण ते सुंदर क्षण कॅमेरात बांधून ठेवण्याचा अट्टाहास करत असतो.. तो क्षण निसटता कामा नये असे वाटत राहते..

परवा मी एका नितांतसुंदर गाण्याच्या कार्यक्रमाला हजेरी दिली.. आयुष्यातील हे अनमोल क्षण असतात जेव्हा आपल्या आवडत्या छंदांना आपण वेळ देऊ शकतो.. गाण्यात मन गुंतल्याने मिळणारा निखळ आनंद अवर्णनीयच असतो.. गाण्यामुळे आपली समाधी लागते आणि स्वसंवाद वाढीला लागतो.सहज आजूबाजूला नजर टाकली आणि मला हसू आले.. काहीजण समोर दिसणारा थेट कार्यक्रम प्रत्यक्ष न बघता मोबाईलच्या खिडकीतून पाहत होते.. म्हणजेच काय तर कार्यक्रमाचे व्हिडिओ रेकॉर्डिंग करण्यात दंग होते.. असे खूपसे मोबाईल उंचावलेले होते.. सहजच कानावर एक संवाद पडला.. 'तू यायचे होते रे आजचे हे गाणे ऐकायला.. खूप आवडले असते तुला.. .अरे हो हो तुला व्हिडिओ रेकॉर्डिंग पाठवत आहे मी.. बघ लगेच.. ' एकजण 'फेसबुक लाइव्ह'वर होते.. शरीराने आता त्या क्षणी दूर असलेल्या काळजातील आप्तस्नेहीजनांसोबत आनंद वाटून घ्यायचा होता.. खरंतर त्यात गैर असे काहीच नव्हते पण तरीही माझ्या मेंदूत टकटक

झाली.. हे सगळे शेअर करण्याच्या नादात प्रत्यक्षदर्शी असण्याचा आनंद कुठेतरी गढूळ झाला होता नाही का.?.शेजारचे वयस्कर गृहस्थ कुरकुरले.. 'अहो मोबाईलचा प्रकाश कमी करा.. अंधारात डोळ्यांना त्रास होतोय माझ्या.. '

तुम्ही जेव्हा पूर्णतः शंभर टक्के उपस्थित असतात तेव्हाच परिपूर्ण आनंद मिळत असतो.. मोबाईलरुपी अवधानाने हा आनंद नक्कीच कमी झाला होता कारण हातात मोबाईलचे लोढणे होते आणि आता हाही प्रश्न आहे की तुम्ही किती किती उत्सव साजरे करणार.?.जगाला प्रत्येक गोष्ट सांगतच राहणार आणि दाखवतच राहणार का हाही एक प्रश्नच आहे.जगाकडे पण खूप काही सांगण्यासारखे असू शकते.

'अरे बेटा.. अरे बच्चू.. ए चिऊताई.. ए गुडिया.. ओ भाईसाब.. ओ भैया.. एक्सकुज मी प्लीज.. वन मिनिट प्लीज.. एकच मिनिट.. एक मिनिट थांबा ना.. 'असे लाडिक किंवा विनवणी पर बोलणे कानावर पडले की नक्की समजावे कुणीतरी कुणाला तरी मोबाईलमध्ये फोटो काढायला भाग पाडत आहे.. सगळ्याजणी निमित्ताने एकत्र आल्या की फोटोसेशन झालेच पाहिजे अन्यथा अगदीच चुकल्यासारखे वाटत जाते.. फोटो तर काढलेच गेले पाहिजे.. फोटो काढतांना भराभर भारमभार भरमसाठ फोटो

काढणार.. कुठलाही सामाजिक कार्यक्रम झाला की फोटोंची देवाणघेवाण होत असते.. खास त्या कार्यक्रमाच्या नावाने ग्रुप बनवला जातो..

अहो आपल्याला कुठे खर्च येतोय फोटो काढायचा आणि आपल्याला कुठे प्रिंट करायचा आहे फोटो म्हणत जो तो फोटो काढत बसला आहे.. मग प्रत्येकीच्या मोबाईलवर हे फोटो धाडधाड येतात.. पुढे फॉरवर्डही होतात.. प्रत्येक जण आपापला फोटो बघून घेतो.. बाकीच्यांचे अभावानेच पाहिले जातात.. रेडी असे न सांगितल्याने कुणाचे डोळे बंद तर कुणाचे वेडेवाकडे मजेशीर हावभाव.. आपला छान आलेला फोटो तातडीने सोशल मीडियावर पोस्ट देखील होतो मग मैत्रिणी म्हणतात काय ग फक्त स्वतःचाच फोटो पाहिला.. आम्हाला सांगायचे होते ना पोस्ट करण्यापूर्वी इत्यादी इत्यादी.. खरंतर फोटो काढण्याच्या पूर्वी आणि पोस्ट करण्यापूर्वी औपचारिकता म्हणून परवानगी घेतलीच पाहिजे नाहीतर उगाचच 'आ बैल मुझे मार.. ' असे नकळत होवून जाते.. आपले वेगवेगळे समूह असतात.. त्यात आपले काही मैत्र असतात तर काही नसतात कारण अभावानेच सगळ्यांचे सगळ्यांशी जमत असते.. त्यातून नकळत मने दुखावली जातात.. जगमित्र असलेल्या व्यक्तीची फार मोठी पंचाईत होते.. फोटो प्रकाशित

झाल्यावर नाराजी ओढवली जाते.. पूर्वी गडकिल्ल्यांना टेहळणी बुरुज असायचे आता मात्र असे आभासी टेहेळणी बुरुज असतात जे एकमेकांवर लक्ष ठेवून असतात.. स्वतःचे झाकून ठेवायचे आणि दुसऱ्याच्या आयुष्यात डोकावून पहायचे प्रचंड स्वारस्य त्यांना असते.. दबक्या आवजात चर्चा करतात आणि आम्ही त्या गावचे नाहीच असे भासवत राहतात.. व्यक्ती तितक्या प्रकृती हेच खरे असते.

फोटो म्हणजे सुखद आठवण असते.. हो म्हणजे मी सुद्धा अपवाद नाही.. मलाही असे वाटते की आनंदाचा हा क्षण बंदिस्त करावा.. पुन्हा कधीतरी केव्हातरी निवांत झाल्यावर आपलीच गॅलरी उघडून बसावे आणि जुन्या आठवणींना उजाळा द्यावा.. दहा-बारा वर्षांपूर्वी जरा प्रमाणात असे हे फोटो आकर्षण होते .. पूर्वी तर आठवणींच्या कातर क्षणी हळूच संदुकीतून अल्बम निघत असे.. हळूच डोळेही पुसले जात असत.. 'तस्वीर तेरी दिल मे जिस दिन से उतारी है.. :'प्रतिमा उरी धरुनी मी प्रीतिगीत गावे.. 'अशी गाणी चित्रित झाली आहेत.. आता खूप काही हरवले आहे आपण असंही वाटत जाते.

आताच्या स्मार्ट फोनच्या युगातील आधुनिक तंत्रज्ञानामुळे फोटोच्या दर्जात खुपसा फरक पडला आहे.. फोटो काढण्याचे

आणि काढून घेण्याचे वेड प्रत्येकाला असतेच असते.. सहजपणे एक भाबडा प्रश्न मनात येतो की इतके सारे फोटो जातात तरी कुठे..?आणि पुढे काय होत असेल इतक्या साऱ्या फोटोंचे.. वेळेवर मिळतात का..?काही सुंदर फोटो व्हाट्सएपच्या डी. पी. ला विराजमान होतात.. स्टेटसला त्यांना स्थान मिळते..  काही फोटो खूप सुंदर असतात पण ते इच्छा असूनही पोस्ट करता येत नाही.. सुख आपल्याजवळच ठेवावे लागते.सेल्फी काढण्याचे वेड तरुणांना सेल्फायटीससारख्या आजाराकडे घेऊन जात आहे.. स्वप्रतिमा उदात्तीकरण करण्याच्या नादात स्वसंवाद मात्र हरवत चालला आहे .. माझी एक संवेदनशील सखी आम्ही कुठे ट्रिपला गेलो की स्वतःचे फोटो काढून घेण्यास उदासीन असते..  तिला त्या ठिकाणचे सृष्टीसोंदर्य जास्तीत जास्त डोळयात साठवून ठेवायचे असते.. असा एखाददुसरा अपवाद विरळाच म्हणायचा.. जगण्याचा प्रत्येक क्षणाचे अपडेट्स देण्याचा नादात खरोखरच त्या क्षणाचे निर्माल्य होवून जाते.. परवा असाच एक विनोद वाचला की एकमेकांच्या फारही गळयात गळे घालून फोटो काढू नका.. नाते तुटल्यावर त्या फोटोतून त्या व्यक्तीला क्रॉप करतांना अवघड होऊन बसेल.. आज जे सोबत ते कदाचित 'कल हो ना हो.. ' असे होऊ शकते.. पण असा निराशाजनक विचार हवाच कशाला.. आपल्या सोबत जे आहे ते प्राणापलीकडे जपायचे असते हेच

खरे..!प्रत्यक्षाहुन प्रतिमा उत्कट म्हणून प्रतिमेच्या प्रेमात आकंठ बुडून चालणार नाही.. दिसण्यापेक्षाही असणे महत्त्वाचे असतेच असते.. .


मै वो नही जो मै दिखाता हू..

मै वो नहीं जो आप समझते हो..

मै वो हू जो सदा खुश रहना चाहता हू.. ..

## 38

## काजव्याचे झाड..



मी त्या रात्री रानामध्ये काजव्याचे झाड पाहिले.. .रात्रीचा पहिला प्रहर आणि आजूबाजूला किर्र अंधार होता.. क्षणभर मनाला भीती स्पर्शून गेली.. अंधारात पाचोळ्यावर पाऊल पडताच आवाज व्हायचा मग जास्तच असुरक्षित वाटू लागायचे.. 'अजिबात आवाज करू नका.. मोठ्याने बोलू नका.. मोबाइलचा प्रकाश झाडावर टाकू नका.. ' इत्यादी इत्यादी सूचना पर्यावरणप्रेमींकडून येत होत्या.. आणि अचानक ते अंगाखांद्यावर नखशिखांत काजवे ल्यायलेले झाड दृष्टीपथात आले . ते नयनरम्य दृश्य पाहून आम्हा सर्वांचे डोळे अगदी दिपून गेले होते.. .दाट काळोखात तो चमचमाट अवर्णनीयच होता.. क्षणात पूर्ण अंधार आणि मग उजेडच उजेड.. मनात आले की झाडाकडे अशी काय जादू असावी की त्या झाडावरच काजव्यांनी वस्ती करावी आणि झाडाला श्रीमंत करून टाकावे.. .सगळ्या झाडांच्या वाटेला तो लखलखाट नव्हता.. काजव्यांचा तो प्रकाशोत्सव पाहताच मन

हरखून गेले.. निसर्गाकडे ही किमया कशी काय असावी असा भाबडा प्रश्न मनाला पडला.. जैविक विविधतेने नटलेला आपला देश खरोखरच श्रीमंत आहे जिथे झाडाला असे हिरे लगडलेले असतात.. 'मनमंदिरा तेजाने उजळून घेई साधका.. संवेदना सहवेदना.. '.. कट्यार काळजात घुसली चित्रपटातील गीतात असेच काजव्याचे झाड चित्रित केले आहे.. खरंच केवढा हा लखलखाट.. केवढी ही प्रकाशाची श्रीमंती.. निसर्गापुढे आपण नक्कीच थिटे आहोत ही जाणीव मनाला झाली आणि मन आतून आतून प्रकाशमय झाले.. .रानमाळावर काळाकभिन्न अंधार आणि अंधाराला छेद देणारे आणि प्रकाशाचे गीत गाणारे हे काजवे म्हणजे निसर्गाचे एक आश्चर्य म्हणावे लागेल.. काजव्यांच्या प्रणयसाधनेचा तो काळ असतो.. वर्षातून पाऊस पडण्याच्या आधीचा प्रजोत्पादनाचा तो काळ आणि ठराविक झाडावरच त्यांची वस्ती असते.. असे वाटते जणू काही झाडाला विद्युत रोषणाई केली आहे.. .झाड दिवाळी साजरी करत आहे असे वाटले.. अजूनही डोळ्यासमोर ते काजव्याचे झाड येत आहे .. डोळे कसे निवून टाकले काजव्यांनी.. त्यासाठी काळोखात रानवाटा तुडवल्या पाहिजे आणि हा निसर्गाचा उत्सव अनुभवला पाहिजे.. खास काजवा महोत्सवाचे आयोजन त्यानिमित्ताने होत असते.. पर्यटनाची संधी त्यानिमित्ताने चालून येते.. पण काजव्यांचा एकांत

भंग करण्याचा अधिकार आपल्याला मुळीच नाही हेही मनाला कुरतडत जाते.. माणूस कधीकधी स्वतः एकांतप्रिय असतो पण तो उत्साहाच्या भरात काजव्यांचा एकांतभंग करत जातो.'बदन पे सितारे लपेटे हुए.. ओ जाने तमन्ना किधर जा रहे हो.. ' अशा ओळी काजवे पाहून आठवल्या.. 'लखलख चंदेरी तेजाची न्यारी दुनिया.. '.. 'काजवा किर्र.. रानात सुरात गाती.. 'अशी गाणी आठवली.. काळ्या रंगाची चंद्रकळा डोळ्यासमोर तरळली.. डोळ्यासमोर काजवे चमकले असा एक वाकप्रचार आहे.. एखादा उनाड मुलगा शिक्षकांच्या हातची कानफटात खातो तेव्हा त्याच्या डोळ्यासमोर काजवे चमकून जातात.. अचानक मार पडलेला असतो त्यामुळे असा शब्दप्रयोग करत असावेत..

माणसाला नेहमीच प्रकाशाची ओढ असते.. अंधारातून प्रकाशाकडे त्याची वाटचाल असते.. .खरतर अंधार कुठेच नसतो.. असतो तो प्रकाशाचा अभाव.. म्हणूनच प्रकाशाचा प्रभाव आपल्याला भावत जातो.. मग ती देवघरातील मंद ठेवणारी समई असो.. की लुकलूकणारी पणती असो.. किंवा आकाशातील चंद्र-चांदणी असो आपण आतून प्रकाशमान होत जातो.. प्रकाशात अचाट सामर्थ्य असते.. त्याच्याठायी भेदभाव मुळीच नसतो.अंधकाराला छेद देणाऱ्या प्रकाशाला कुठलाही धर्म अथवा

जात नसते.. केवळ समानतेच्या भावनेने विश्वाचा चराचर प्रकाशमय होत असतो.. तेजोमय लोहगोल तेजस्वी सूर्याला तर आपण नमन करतोच.. ज्योतीने सूर्याची आरती कधीकधी होत असतेच.. अगदी तसेच हे अल्पजीवी काजवे मनात घर करत जातात..

असे वाटले की आपल्या प्रत्येकामध्ये असे काजव्याचे झाड असावे.. अगदी नाताळ सणाला ख्रिसमस ट्री सजवतात तसे हे झाड आपण जाणीवपूर्वक सजवले पाहिजे. जसे की आनंद झाल्यावर मन अगदी समाधानाने भरून येते.. सुख मग ओसंडून वाहत असते.. सुखाचे उधाण आले की हर्षलहरींनी आपण उल्हासित होत असतो.. आनंदाने सजलेला चेहरा नितांतसुंदर भासत असतो.. म्हणजेच काय तर आपल्यातले ते झाड बहरून आलेले असते.. निसर्ग आणि मानव असे खूपसे साधर्म्य तेव्हा दिसून येते.. .

निसर्ग मात्र एकांतात काजवामहोत्सवाचा सोहळा मनवत असतो.. निसर्ग आपल्याला देतच जातो.. पण देतांना त्याची नोंद कुठेच करत नाही की काय दिले ह्याचा हिशोबही ठेवत नाही.. माणूस मात्र आपल्या आनंदाच्या यशसोहळ्यात सर्वांना सहभागी करून घेतो.. आनंद वाटत जातो.. अन्यथा त्याला वाटते की जंगल में मोर नाचा किसने देखा..? मग तो उन्मादाने आनंद दर्शवत जातो..

निखळ आनंद परत परत उगवून येतो.. तो एक आनंदयात्री होऊन जातो.. सहज मनात आले की माणसातले काजव्यांचे झाड ही केवळ एक संकल्पना आहे.. कारण आनंदी राहणे ही त्याची प्रसन्न मानसिकता असते.. जगण्यासाठी असंख्य पर्याय उपलब्द असतांना आनंदी राहण्याचा पर्याय निवडायला काहीच हरकत नसते.. मनात सकारात्मकता असली की आनंदाचे कण वेचता येतात.. सुख अगदी हाकेच्या अंतरावर असते पण त्याच्या हाकेला ओ देणे आपल्याच हातात असते नाहीतर ते हिरमुसून मागच्या पावली परत जाते.. आनंद नेहमी छोट्या छोट्या गोष्टीत शोधावा लागतो.. प्रत्येक चांगल्या गोष्टीत काही ना काही खोड शोधणारी माणसे कधीच आनंदी राहू शकत नाही.. त्यांच्यातला झाडाला आतून अहंकाराची कीड लागलेली असते.. त्यांना जगाचे आनंदी असणे खूपत जाते.. आनंदीवृत्ती जाणीवपूर्वकच जपायची असते.. एकदा का त्या वृत्तीची सवय झाली की झोपडीत देखील महालाचे स्वर्गसुख अवतरत जाते.. प्रत्येकाच्या आनंदाची परिभाषा वेगवेगळी असू शकते.. काहींना आपल्या छंदातून आनंदाची परम अनुभूती मिळत असते.. काहींना वाचनातून आनंद मिळत असतो तर काहींना लिखाणातून जगण्याचा सूर गवसत असतो.. त्यातूनच ते स्वतःला अद्ययावत ठेवत असतात.. नव्या युगाला सामोरे जात असतांना स्वतःला नेहमीच काळाच्या कसोटीवर सिद्ध करत

गेल्यास नैराश्य येत नाही तर आनंदाच्या वाटा आपसूक गवसत जातात.. बागकाम करणारी माझी सखी प्रत्येक झाडाशी गुजगोष्टी करतांना आनंदी होत जाते.. घरातल्या पाळीव प्राण्यांवर अपत्यवत प्रेम करणारी मंडळी आनंदी असतात.. आपला आनंद मात्र दुसऱ्या कुणाच्या सुखदुःखाशी जोडत गेलो तर आनंद गवसेलच असे छातीठोकपणे सांगता येत नाही.. खरंय कसे जगायचे हा आपलाच चॉईस आहे मग आनंदाचे झाड आपल्यात असलेच पाहिजे.. नेहमीच पुढे जाण्याची तसेच सक्रिय राहण्याची इच्छा मात्र असली पाहिजे.. आणि हो थोडे मागे वळून आत्मपरीक्षण पण करता आले पाहिजे.. वेळेचा उत्पादक वापर आनंदाच्या दिशेने नेत असतो.. चला तर मग बाहेरून कुणी कितीही उपदेश केला तरी आपल्या आतून आतून आनंद उगवून आला पाहिजे त्यासाठी आत्मगुरु बनले पाहिजे.. आपले आयुष्यही काजव्यासारखेच आहे.. जगू तेव्हा लखलखाट आणि नसू तेव्हा सारेच निष्प्रभ होऊन जाणार आहे.. म्हणूनच जगू या आनंदे कारण मावळण्यापूर्वी लखलखण्याचा विचार अजून बाकी आहे.

# 39

# काळजाला हवी रेंज..

कामानिमित्त एका ऑफिसमध्ये गेले होते.. विलंब लागत होता मग नंबर यायची वाट पाहत बसले.. बरे की वेटींगरूमला बसायची सोय होती.. वेळ वाया जातो असे म्हणून चालतच नाही.. खूप उद्वेग चांगला नसतोच.. समोरचा माणूस थंड आणि आपला उदवेग म्हणजे आपलाच मेंदू ग्रासणार त्यापेक्षा 'आलिया भोगासी.. असावे सादर' म्हणत वाट बघत रहाणे शहाणपणाचे ठरते.. आपली कामे काय मोबाईलवरून होतातच ना.. सकाळपासून डोक्यात आलेले असते की चला अमुकतमुकशी अभिनंदनपर दोन शब्द बोलावे पण गडबडीत वेळ नसतो.. मग व्हाट्सएपच्या माध्यमातून संदेश देतो आपण ठोकून.. पण तरीही शब्दांची तहान असतेच.. कुणाला बरे नसते तर कुणाच्या तब्बेतीची विचारपूस करायची असते.. कुणाचे कुणी जवळचे हरपलेले असते आणि आपण सांत्वनपर बोललेलो नसतो.. आपल्या फोनची वाट पाहणारेही असतातच ना.. मनात दाटलेले जवळच्या मैत्रिणीकडे मोकळे करायचे असते.. किती वेळ साचवून ठेवणार..?दरवेळेस वेळ नाही म्हणून दुर्लक्ष करणे अयोग्यच नाही का..?नाते आपल्यालाच

टिकवायचे असते कारण त्यात आपल्या मनाची गुंतवणूक असते.. आपली माणसे असतात ही सगळी.. जे आपल्याला समजून घेतात त्यांना आपण गृहित वगैरे धरायला लागतो.. पण असे नकोच बरं का..!त्यासाठी तरी वेळेत संवाद साधलेला बरा असतो..

शहरे लांबलचक विस्तारलेली त्यामुळे एकाच शहरात प्रत्यक्ष भेट होत नाही मग दुधाची तहान ताकावर म्हणून फोनभेट घेण्याचा अट्टाहास असतो.. गावातल्या माहेराशी बोलायचे असते तेही राहून गेलेले असते.. आई म्हणते 'बाई तू इतकी तुझ्या व्यापात असते ना की केव्हा फोन करावा ते आम्हाला कळत नाही तेव्हा तूच फोन करत जा कसं.. '.. आणि काय गंमत की मी अगदी हयाच भाषेत बाहेरगावी शिकणाऱ्या मुलीशी बोलत असते.. आई जशी आम्हा भावंडांच्या फोनची वाट पाहत असते अगदी तशीच वाट मी पाहत असते.. मग माझे मलाच हसू येते.. काहीच बदलले नाही का.. हो म्हणजे बदल तर खूप झाला.. माध्यमक्रांती झाली आहे.. डिजिटल माध्यमांमुळे चालतंबोलतं आपलं माणूस आपल्याला स्क्रीनवर दिसते आहे की.. अजून काय हवे?.. फार मोठा शोध आहे हा मानवाने लावलेला.. दूर राहूनही ह्या माध्यमातून नाते जपता येते.. जेष्ठ नागरिकांना हे माध्यम शिकण्याची गरज भासू लागली.. जेष्ठ म्हणजे पंचात्तर वर्षांच्या वर असलेले बाकी साठीचे नवजेष्ठ तर

अगदी तरुणाईला थक्क व्हायला होईल इतका वापर ह्या नवमाध्यमाचा करत असतात.. करेना का फक्त प्रत्येकाने आपली सोशल विवेकबुद्धी जागृत ठेवली पाहिजे हे महत्वाचे आहे.आपण आपले प्रकटीकरण करण्याच्या नादात कुणाची स्पेस तर हिरावून घेत नाही ह्याचा दहा वेळेस विचार करावा.. कारण एखाद्याकडे सांगण्यासारख्या अनेक गोष्टी असतात तर एखाद्याचे आयुष्य संथ शांत असते अर्थात ते त्यानेच निवडलेले असते.. मग त्याला उगाचच क्राऊड होत जातो.. म्हणून अगदी आपल्या आतल्या वर्तुळाला आपण हक्काने त्रास द्यावा इतपत ठिक आहे.तिथेही दखल नाही घेतली गेली तर गप्प बसावे.. अर्थात ही माध्यमे आहेत म्हणून हा सगळा पसारा आहे.. पूर्वीही नात्याचा पसारा होताच फक्त माध्यमांची ढगफुटी नव्हती.

सहज आजूबाजूला पाहिले तर काय प्रत्येक जण आपली मोबाईलची खिडकी उघडून बसला होता.. स्वतःवरून जग ओळखावे हेच खरे..!उगाचच आता फार अपराधी वाटायला नको म्हणजे.. जो तो आपापल्या प्राधान्य क्रमात अडकलेला असतो आणि दिवसाचे चोवीस तास अपुरे भासतात.. मल्टीटास्किंग जमाना मग सारी अवधाने आपणच लावून घेतली ना..!बहुआयामी, अष्टपैलू उत्साही व्यक्तिमत्व असे संबोधले

जाणारे मग फिरतच राहतात अक्षाभोवती.. आणि मग फिरता फिरता स्व-शोध घ्यायचा असतो.सगळा हा आपणच आखून घेतलेला चक्रव्यूह आहे असे वाटायला लागते.. इथेही प्रत्येकजण मोबाईलवर व्यस्त होता.. कितीही ऐकायचे नाही म्हंटले तरी तिथले संवाद कानावर पडत होतेच.. मानवी नातेसंबंध अशा रितीने उमगत होते.. त्यात फारसं जगावेगळं असं काहीच नव्हते.. कुणी फोनवरूनच पलीकडच्या माणसावर आरडाओरड करत होते तर कुणी फोनवरून मार्केटिंग साधत होते.. एक वृद्धा आपल्या घरातील उखाळ्यापाखाळ्या सांगत सुटली होती.. समोरच्या व्यक्तीला कमी ऐकू येत असावे म्हणून ह्यांचाच आवाज वाढला होता.. त्यामुळे सगळे त्रासिक नजरेने त्यांच्याकडे पहात होते.. माणसे वाचणारी मी प्रत्येकाच्या संभाषणावर एकेक लेख मनातल्या मनात लिहित होते.. कधीतरी ती प्रिंट मेंदूतून नक्कीच बाहेर येणार होती.. माणसे कशी ना इथून तिथून सारखीच असतात.. भावनांनी ओथंबलेली तर काही संसाराच्या दाहाने करपलेली.. मायेच्या पाशात अडकलेली.. आंधळ्या प्रेमामुळे निर्णय न घेऊ शकणारी.. आयुष्यात वाट चुकलेली.. वाट हरवलेली.. काहीशी स्वकेंद्रित झालेली.. स्वतःच्याच विश्वात हरवलेली.. आणि हो मी ही त्यांच्यापैकीच एक होते ना..!सहज विचार आला आपण अंगावरील शाल किंवा कोट वगैरे काही वेळासाठी काढून ठेवतो

आणि वाटल्यास परत परिधान करतो तसे ह्या व्यापाचे हवे होते.. पण तसे कसे होणार.. हे सगळं काही माणसाच्या जन्मापासूनच त्याला चिकटून आलेले आहे.. नात्यांच्या एककेंद्री वर्तुळात आपण स्वतःला बांधून ठेवले आहे.. त्यामुळे घरापासून दूर असलो तरी विचार सोबत असणारच.. जगाच्या पाठीवर कुठेही गेलो तरी मनासोबत हे विचारांचे गाठोडे असणारच असणार.

मनात विचार आला की मोबाईल क्रांती येण्यापूर्वीचे जग कसे असेल ना..?म्हणजे ही लग्न झालेली मुलगी आता सकाळचे घरातले भांडण आईला लगेच सांगते आहे आणि आईचा जीव किती कळवळतो आहे.. आई लगेच सल्ले पण देत आहे पण अगदी काही दशकांपूर्वीच मोबाईलचे जाळे नसल्याने फार तर पत्र लिहिले जात असेल आणि आठदहा दिवसांनी ते पत्र माहेराच्या हातात येईपर्यंत पेल्यातले वादळ शमले देखील असेल.. किंवा तिला कामामुळे पत्र लिहायला जमलेच नसेल.. एखादया वेळेस ते पत्र कुठे गहाळ ही झाले असेल.. आई भेटल्यावर फारतर तिने मनातले शल्य बोलून दाखवले असेल नाही का..?अशा कितीतरी गोष्टी त्वरित सांगायच्या राहून गेल्या असतील.. आता मात्र तसे होत नाही.. घरात टाचणी पडली तरी त्याचा नाद चार घरात होत असतो.. इथे प्रत्येकालाच काही ना काही लगेच पुढे पाठवायची

घाई झाली असते.. प्रतिक्रिया देण्याचा उतावीळ स्वभाव कितपत योग्य आहे हा विचार नक्कीच झाला पाहिजे.. कुठलाही विचार रूजण्यास पुरेसा वेळ दिला जात नाही तोपर्यंत तो उखडला तर जात नाही ना हे लक्षात घेतले पाहिजे.. फुकट मिळणारा टॉक टाइम तसे पाहिले तर महागात पडत असतो जेव्हा त्याचा अनावश्यक वापर घडत असतो.

'माझ्या मामाचे पत्र हरवले' असा खेळ बालपणी खेळायचो पण ते पत्र आता खऱ्या अर्थाने हरवले आहे.. पत्र कितीवेळा वाचले तरी समाधान व्हायचे नाही.. जणू काही पत्रातून ती व्यक्ती आपल्याला भेटत असायची.. मी अगदी दुसरीत होते तेव्हा आजोबांना पत्र लिहिले होते त्यातूनच माझ्यातील लेखिकेचा जन्म झाला असावा.. माझ्या नातेवाईकांना पत्र लिहायचे तेव्हा ते म्हणायचे अगदी इतिवृत्तांत असतो तुझे पत्र म्हणजे.. अगदी कालपरवाच मी काही पत्रे लिहिली.. माझ्या सारख्या लिहिणाऱ्या मंडळींना मी त्यांच्या पुस्तकावरील अभिप्राय पत्राने दिला आहे.. व्हाट्सएपच्या माध्यमातून खरंतर सांगू शकत होते पण ते मी टाळले आणि पत्रातील शब्दरूपी भेट देण्याचे ठरविले.. किती वर्षांनी कदाचित त्यांच्याकडे असे पत्र आले असेल.. हा पत्रानंद आणि पत्रप्रपंच आता काळाच्या उदरात गुडूप होऊ नये असे उगाचच

मला वाटत राहते.. हल्ली पोस्टमन आले तरी त्यात फारसं काही वाचनीय पोस्ट येतच नाही.. कामाचे कागद तेवढे येतात.. व्यक्त होण्यासाठी माध्यमांची साथ असतांना हा पत्र प्रपंच अव्यावहारिक वाटू शकतो.काळाचे घड्याळ मागे पण फिरवायचे नाही पण सांगायचा मुद्दा हाच आहे की माध्यमे हाताशी असली तरी आपण व्यक्त होतांना दहा वेळा तरी विचार केला पाहिजे.. कधीतरी उगाचच तिसऱ्या व्यक्तीबद्दल आपण बोलत सुटतो तेव्हा त्या व्यक्तीची काळजी असेल तर ठीक पण अर्थहीन बोलणे टाळलेच पाहिजे.. स्पर्धेच्या युगात नेटवर्क भले फुकट मिळत असेल पण त्यामागे आपण फार मोठी किंमत मोजत असतो जेव्हा त्यात आपला वेळ निष्कारण वाया जात असतो..  ही देखील एक प्रकारची सामाजिक हानीच आहे.

मध्यंतरी बच्चू माझा हिमालयात ट्रेकिंगला गेला होता.. त्याने सांगितलेच होते की तिसऱ्या दिवसानंतर त्याला सोळा हजार फुट उंचीवर नेटवर्क मिळणार नाही आणि तो संपर्क साधू शकणार नाही.. दोन दिवस मी मनाला समजावत राहिले पण नंतर उगाचच अस्वस्थ होत गेले.. कशातच लक्ष लागत नव्हते.. असे पाच दिवस संभाषणाशिवाय गेले आणि त्यानंतर त्याचा फोन आला.. मी एकदम म्हणाले 'पुन्हा असे लांब जिथे रेंज नसेल तिथे जायचेच

नाही तू.. 'तो मला समजावत होता.. मला कळतही होते पण रोजचे बोलणे हुकतेय हे स्वीकारता येत नव्हते.. तेव्हाही हाच विचार आला की मोबाईलचा शोध नसताच तर अपेक्षा केलीच नसती मी.. असो.. फायदे नक्कीच आहेत आणि मुख्य म्हणजे आता तो जगण्याचा एक सवयीचा भाग झाला आहे.. मूलभूत गरजांमध्ये ही एक गरज झाली आहे ते नाकारता येत नाही.. फक्त खटकतो तो त्याला जोडून येणारा मानवी स्वभावातील दांभिकपणा तो सोडता आला पाहिजे.एक मात्र खरे की इथे प्रत्येकाच्या काळजाला रेंज हवी नाहीतर जगणेच पाषाणवत होत जाईल.. गॅझेटस म्हणजे आपल्या जगण्याचा एक हिस्सा आहे हेही मान्य आहे.. उपयुक्तता नक्कीच आहे पण अतिवापरामुळे जगणे असे अंगावर आदळत आहे.. जगण्यातील शांत निवांतपणा तर कधीच हरवला आहे पण तरीही जगणे सुकर होत आहे हे मान्य करावेच लागणार आहे.

# 40

# माहेर माहेर.. मनाला मोहर..



गौरीगणपती आले की अगदी घरअंगण सजते आणि सगळीकडे उत्साह दाटून आलेला असतो.. आपली ही सणपरंपरा आहे जी साजरी करत असतांना घरातील सगळे सदस्य एकत्र येत असतात.. अशा आनंदमयी काळात सासरी नांदत असलेल्या मुलीला देखील स्वतःच्या घरातील गौरीगणपती साजरे करत असतांना माहेरघर आठवत जाते.. बालपणापासूनच्या त्या सणाच्या आठवणी जागृत होतात.. मनाला पंख लावीत ती माहेरच्या अंगणात फेरफटका मारून येते.. मातृस्वरूप गौराईचे ते मुग्ध रूप आठवते.. 'रुणूझुनूत्या पाखरा जा रे माझ्या माहेरा.. आली गौराई अंगणी तिला लिंबलोण करा.. ' डोळ्यासमोर गौराईचे स्वागत करणारी आई येते.. त्यांचे आगमन होताच घराला कसे चैतन्य येते आणि तिसऱ्या दिवशी घरातून निघायचे म्हंटल्यावर त्यांचा चेहरा कोमेजून जातो.. अपार

श्रद्धा तर असतेच त्यामागे आणि स्त्री भावविश्वाचे विभ्रम देखील असतात.. ती स्वतःला त्या गौराईमध्ये बघत असते.. तिच्याशी एकरूप होऊन जाते त्यामुळे तिला गौराईचे भाव जाणून घेता येतात.. माहेरापासून अंतराने दूर असलेली ती मनाने तिथेच आसपास असते.. तिचेही अगदी असेच होत असते माहेराहून निघतांना जेव्हा वाट पावलांत अडखळत असते.

आज श्रद्धाचे मन देखील माहेरच्या गौराईत गुंतले होते.आज तिला माहेरी सवाष्ण म्हणून जेवायला बोलावले तर तिची ही धांदल उडाली होती.. 'अरे वा.. मजा आहे राणी सरकारांची.. माहेरी जायला मिळणार आहे एका व्यक्तीला.. 'नवरोबा तिची थट्टा करत होता आणि ती मात्र अखंडपणे स्वयंपाकघरात व्यस्त होती.. गावात माहेर मग घरातले सगळे स्वयंपाकपाणी आटोपून घ्यायचे आणि दमूनभागून जायचे माहेरी.. दोन तास नाही होत तोच स्वारी म्हणणार चला चला राणी आपुल्या घरी.. मग ही खूप गप्पा राहून गेलेल्या असतांना किंवा रंगात आलेल्या असतांना मुकाट्याने तिथून निघणार आणि घरी परतली की स्वयंपाकघरातील राणी सज्ज होणार.. आता हे तर नेहमीचंच आहे त्यात तक्रार म्हंटली तर काहीच नाही.. उलट तुझं बरे आहे बाई.. भेटता तरी येते माहेराला असे कुत्सित टोमणे ऐकणार पण तिला माहिती आहे सासरच्या

माणसांचा मनाचा मोठेपणा.. हरकत नाही तू जा माहेरी असे जेव्हा तिला तिच्या पन्नाशीच्या टप्प्यावर ऐकवले जाते तेव्हा तिचे मन पेटून उठते.. मनातल्या मनात ती म्हणते अहो हरकत कशाला हवी तुमची..?ते माझे जन्मापासून असलेले घर आहे जिथे माझी पाळेमुळे रुजली आहेत आणि बहरली आहेत.. माहेराने मला घडवले आहे.. माझा अभिमान आहेत माझी माणसे.. त्यांना भेटायला परवानगी देताय म्हणजे मोठी कृपा करताय जसे काही.. तिच्या आधीच्या पिढीतील स्त्रियांना किती सासुरवास होता आणि त्यामानाने तुला किती सुख आहे असे तिला ऐकवण्यात येते.. तिला वाटते की काळाच्या कसोटीवर हे लोक स्वतःचे विचार का नाही तासून घेत..?माझ्या प्रत्येक अडचणीत आधी धावत येते ते माझे माहेर.. तिकडे जायला परवानगी हवीच हवी अशी अपेक्षा करत तुम्ही कुठल्या युगात वावरत आहात..?पण वरकरणी ती हसून सगळे साजरे करते कारण बंड करण्यात तिला बळ नसते किंवा तिला आपली ऊर्जा अकारण खर्च करायची नसते.. आणि मानसिकता बदलताही येत नाही हे तिला ठाऊक आहे.. ती अगदी नवीन युगातील आत्मनिर्भर स्वयंसिद्धा असली तरी तिला आपल्या माणसांना दुखवता येत नाही.. जशी पुढच्या पिढीतील आताची मुलगी लग्नानंतर आपल्या हक्कांसाठी जागरूक असते आणि आधीपासून स्पष्ट स्पष्ट सांगत जाते तेव्हा तिचे हिला कौतुकही

वाटते.. उगाच विचारांचे पसारे नसतात तिच्याकडे.. माझे जन्मदाते आहेत आणि त्यांना मी वेळ देणार आहे.. प्रसंगी त्यांना गरज असल्यास आर्थिक आधार पण देणार आहे.. त्यांनी जर मला मुलगा म्हणून वाढवले तर आता जबाबदारी घेतांना मी का अशी भूमिका घ्यावी?मी आता त्यांची काठी बनलेच पाहिजे.. त्यांच्या माहेराबद्दल कल्पना स्पष्ट असतात.. तेही मनाला भावते कारण जगात असेही असते जी स्त्री आपल्या हक्कांसाठी जागरूक नसते तिचे हक्क डावलले देखील जातात.. जो जीवनसाथी आयुष्यभर आपल्या माणसांसोबत राहत असतो आणि ज्याच्या आयुष्यात त्याचे राहायचे घर तेच राहते त्याला वाटत राहते की हिला हिचे माहेर इतके प्रिय का..?थोडे तिच्या भूमिकेत गेल्यावर तिची ओढ का ते लक्षात येते.. अर्थात घरोघरी वेगवेगळी कहाणी असू शकते.. काही सख्यांचे सासर अगदी माहेरासमान असते.. ती जेव्हा घरून काम करत असते तेव्हा सासूबाई चहाचा कप हातात देतात तेव्हा तिला कधीकधी ओशाळल्यागत वाटते जे आईच्या हातातून कप घेतांना वाटत नाही.. सध्याच्या मल्टिटास्किंग युगात तिच्या आयुष्यात तिनेच मांडलेले इतके काही पसारे आहेत की त्यातून तिलाच मान वर काढायला फुरसत नसते.. बाहेरगावी राहणाऱ्या मुलींप्रमाणेच ती फोनवर माहेरची चौकशी करून घेते.. मनात

रक्ताच्या माणसांची ओढ असतेच असते पण कर्तव्ये प्राधान्यक्रमाने पाहावी लागतात..

'कसं कुणाला सांगू ग बाई

मला माहेरी करमत नाही.' माझी खूप कामे पडली आहेत असेही ती म्हणते.. ती सासरी इतकी काही रुजलेली असते की तिला सदैव तिकडचीच काळजी असते.. आपण दोन दिवस नसलो तर घराचे कसे होईल असे काहीसे तिच्या मनात येते.. मग ती स्वतःहूनच आपले माहेरपण नाकारत जाते.. तसे तिला बंधन नसते आणि मन समाधानी देखील असते.. माहेर देखील व्यस्त असतेच.. येतेस का ये बाई.. जातेस का जा बाई तुझ्या तुझ्या घरी असे त्यांच्या वागण्यातून जाणवत राहते.. ती अनेकदा कळतनकळत दुखावली देखील जाते.. तिच्या मनाची भूक फारशी कुणाच्या लक्षात येत नाही कारण ती दोन्हीकडे फारशी डिमांडिंग नसते.. मग सक्षम समृद्ध ती माहेराने काय काय सुख दिले ते आठवत जाते.. तिला वाटत असते की आईने माझ्यासाठी माझा आवडता पदार्थ रांधण्यात दमू नये आणि शेजारी येवून बसावे.. सुखदुःखाचे खूप आतले आतले तिच्याशी बोलावे जे ती कुणाजवळ विश्वासाने बोलू शकत नाही.. आपल्या माणसांनी पाठीवर हात ठेवत म्हणावे की तू

लढत रहा आणि आम्ही आहोतच सावलीप्रमाणे सोबत अशी तिची अपेक्षा असते..


किती गंमत असते ना.. कितीही समानतेच्या गप्पा मारल्या तरीही काही गोष्टी नाहीच बदलत कधीही.. समाजाची मानसिकता ही नेहमीच पुरुषांच्या बाजूला झुकणारी असते.. जी स्त्री बंड करते तिला संगममताने बदनाम केले जाते.. तो एक वेगळाच विषय आहे.. पोटच्या मुलीचे माहेरपण तिला मान्य असते.

कुठल्याही वयाची स्त्री असो तिला माहेर म्हंटले की तिच्या मनाला कसा मोहर येतो.. माझ्या माहेरी अशी पद्धत होती.. माझ्या माहेरी अशा पद्धतीने गौरीगणपती असायचे आणि नैवैद्याची भाजी अशा पद्धतीने केली जायची असे त्या ऐशी वर्षाच्या आजी सांगतात तेव्हा तिला खूप कौतूक वाटते.. खरंच माहेराची ओढ ही अनादी काळापासूनच असावी असे वाटत जाते.. असे म्हणतात माहेरचा कुत्रा जरी दाराशी आला तरी तिला त्याच्याबद्दल प्रेम दाटून येते.. कुणी त्या गावचे भेटले की ती त्याच्याशी लगेच माहेरचे नाते लावून मोकळी होते.. इतका भाबडेपणा कुठून येत असावा असा प्रश्न पडतो.माहेरच्या वाटेवर फुले अंथरली आहेत असे वाटते.. मला कितीही काहीही म्हणा पण माझ्या माहेराबद्दल अवाक्षर बोललेलं मला चालणार नाही असे ठणकावून सांगते..

अगदी काही कारणाने माहेरी गैरसमज झालेला असला तरी ती माहेराचीच बाजू घेते.. हीच तर रक्ताच्या नात्यातली ओढ असावी नाही का..?माहेर म्हणताच जिव्हाळा निर्माण होतो पण आता माहेरपण कालानुरूप बदलत आहे हे आपण लक्षात घेतले पाहिजे.. आतातर लेक सासरी गेल्यापासून तीच लेकीचे माहेर बनली आहे.. आजच्या लेकीकडे मात्र इच्छा असूनही माहेरी रेंगाळायला वेळ नाही मग तिच्यातील आई हिरमुसते.. सगळे सणवार लेकीशिवाय सुनेसुने वाटू लागतात.. श्रावण साक्षात तिच्या डोळ्यात अवतरतो आणि ती श्रावणातल्या ढगागत मनात झुरत जाते.. बहिणाबाईंनी म्हंटलेच आहे आपल्या कवितेत.. 'लेकीच्या माहेरा साठी माय सासरी नांदते.. '

# 41

# ये रे घना ये रे घना.. .



ग्रीष्माच्या दाहकतेने तप्त झालेल्या धरतीला वर्षाऋतूची चाहूल लागते आणि धरतीला हिरवेकंच वस्त्र नेसवले जाते.. हिरवाईचे लेणे लेऊन वर्षासरींनी चराचरात आनंद, हर्षोल्लास भरून राहतो.. आजवर पावसासाठी तहानलेल्या अन देहावर तडा गेलेल्या धरतीवर धुव्वाधार मुसळधार जलधारा कोसळतात.थेंबाथेंबातून धरतीवर बरसणारा काळा ढग आपल्या जवळचे जलघट आपल्याला देवून अवघे जीवन चैतन्यमयी करून टाकतो.. मग त्यातून सृजनाला जाग येते.. .कवी आणि लेखकांच्या प्रतिभेलाही घुमारे फुटू लागतात.. आणि त्यांच्या साहित्यातून पाऊस आपल्याला भेटत जातो.. पुनश्च पावसात भिजल्याची अनुभूती देवून जातो..

तर सा हा पाऊस.. खरच.. पावसात भिजला नाही असा माणूस नाही आणि माणसात रुजला नाही असा पाऊसही नाही ..

.पाऊस मनात रुजला की ओठावर आपोआप पाऊसगाणी येतात.. तनाबरोबर मनालाही चिंब भिजवून टाकतात.. पाऊस आभाळात दाटतो तसा मनातही दाटतो.. ही पावसातील सहजतेने ओठावर आलेली गाणी मनातल्या हळव्या आठवणी जाग्या करतात.. त्याचा पाऊस तसा तिचाही पाऊस.. .पावसात एकत्र भिजतात तेव्हा त्यांचा पाऊस मग तो दोघांचाही असतो.. शालेय जीवनापासून त्याला ‘ये रे ये रे पावसा’ म्हणून ज्याला आळवलेले असते तोच पाऊस वयाच्या अल्लड वळणावर अवचित येऊन भेटतो..

पावसात दोघे पहिल्यांदा एकमेकांना भेटलेले असतात.. "बरसात में हमसे मिले तुम हो सजन तुम से मिले हम .. .बरसातमे".. .त्याच्या ओठावर शब्द असतात.. ’जिंदगीभर नही भूलेंगे वो बरसात की रात.. .एक अंजान हसिनासे मुलाकात की रात’ .. किंवा ‘एक लडकी भीगी भागी सी.. ’.. .मनातील रिमझिम गाण्यात कधी शब्दबद्ध होते ते प्रेमीजनांना कळतच नाही.. ’रिमझिम के तराने लेके आई बरसात.. याद आ रही है मुझको पहली मुलाकात.. ’.. .मध्येच हरवलेले बालपण आठवते.. ’ वो बारीश का पानी.. वो कागज की कश्ती.. ’

त्या पावसात त्याने तिला आपला रेनकोट काढून दिला असेल किंवा तिनेही आपली रंगबिरंगी छत्री त्याच्यासाठी उघडली

असेल.. .'एक अकेले छत्री में आधे आधे भीग रहे थे.. '.अगदी तसेच दोघे आडोश्याला थांबले असतील आणि दोघांच्या दरम्यान पाऊसही विसावला असेल मग खूप अर्थपूर्ण भासल्या असतील पुढील गाण्याच्या ओळी.. 'रिमझिम गिरे सावन.. सुलग सुलग जाये मन.. भीगे आज इस मोसममें लगी कैसी ये लगन.. .' असा हा आभाळातील ओलावा मनातही झिरपत जातो.. मन आठवणीने व्यापून जाते.. खिडकीतून दूर एकप्रकारचे गूढ तृप्ततेचे सावळेपण पांघरलेली सायंकाळची सृष्टी दिसते.. मन अधिकच कातर होते.. आत्ममग्न राहावेसे वाटते.. मनाच्या पृष्ठभागातून स्वरलहरी धावत ओठापर्यंत येतात.. अशा घनव्याकूळ सायंवेळी कशातच मन लागत नाही.. मनाला एक प्रकारची अस्वस्थता येत जाते.. मनातल्या प्रियकराचे असे दूर दूर राहणे विरहिणीला व्याकूळ करत जाते.. साऱ्या आयुष्याची अतृप्तता काळजाला छेदून जाते.. मग त्यातून नितांतसुंदर चिरतरुण गाणे जन्मास येते.. 'ओ सजना .. बरखा बहार आई.. रसकी फुहार लाई.. आखियोमें प्यार लाई.. '.. .ह्या गाण्यातील ओळ आणि ओळ तिचे भावविश्व उलगडून दाखविते.. 'सावली सलोनी घटा.. ' सर्वदूर दाटून येते.. जेव्हा काळया ढगाच्या घागरी नभात लोंबकळू लागतात तेव्हा ती आर्तपणे गाते.. 'कारे कारे बादरा कारे कारे बादरा हमरे अटरिया ना शोर मचा.. 'ती विरहिणी रात्र रात्र जागी असते.. पावसाला विनवत

असते.. ’जा रे जा रे ओ कारी बदरिया मत बरसो रे मेरे आंगनवा.. परदेस गये है सावरिया.. ’.. .तिला शीतल श्रावणही दाह वाटू लागतो.. ’अब के सजन सावनमें.. आग लगी तन बदनमे.. ’.. किंवा ‘मेघा रे मेघा रे मत परदेस जा रे आज तू प्रेम का संदेश पहुंचा रे.. ’.. .तसाच ‘पानी पानी रे’ ह्या गाण्यातून तिचे आणि पावसाचे नाते घट्ट होऊन जाते.. मग सुमधुर गाणे ओठावर येते.. ’रिमझिम रिमझिम रुमझुम रुमझुम.. भीगे भीगे ऋत में तुम और हम तुम.. गाते रहे.. ’.. जुन्या चित्रपटात देखील नायक नायिका ह्यांना पाऊस हमखास एकदा तरी भिजवतो.. एका छत्रीतले राजकपूर नर्गिस आठवतात.. ’प्यार हुआ इकरार हुआ है.. प्यार से फिर क्यू डरता है दिल.. ’.. ’काली घटा छाये मोरा जिया ललचाये.. ऐसे में तू बोल कहा.. ’.. सदर गाण्यातील आर्तता नकळत आपल्या मनरूपी फांदीवर घरटे बांधत जाते.. .. श्रावण म्हणजे तर उत्सव हिरवाईचा.. आवेगी पाऊस आणि त्यात वाहणारे बेधुंद वारे.. ते वादळ गाण्यात उमटते.. ’सावन का महिना पवन करे शोर.. जियरारे झुमे ऐसे जैसे मनवा नाचे मोर.. ’.. असा हा घुसमुसळेपणा करणारा पाऊस गाण्यच्या शब्दांतून आपल्याला चिंब भिजवतो.. रसिकांना निर्भेळ आनंदाची वारी घडवून आणत असतो..

रक्तात वादळ घुमविणारा, स्पर्श, गंध, संगीत ह्या साऱ्या लव्याजम्यासह धरतीवर दाखल होणारा हा पाऊस आपला

सखासोबती बनतो.. आपण त्याला कडकडून भेटतो कारण आपल्याला लाभलेले असते एक संवेदनशील सर्जनशील मन.. .. भेगाळलेल्या मनाची तहानलेली जमीन.. अशा रीतीने पाऊस आपल्या मनाशी लागेबांधे गुंफतो.. .. 'मेरे नयना सावन भादो.. फिर भी मेरा मन प्यासा' कधी तर तो अगदीच मदमस्त होतो.. खुळावल्यागत वागतो.. सुमनच्या स्वरातील गीत त्याचे शराबीपण टिपत जाते.. 'शराबी शराबी.. ये सावन का मौसम.. '

मराठी भावगीतातील पाऊसही मनावर मोरपीस फिरवून जातो.. मोर म्हणजे जणू काही मानवी मनाच्या भावविभोराचे प्रतिक होय.. आकाशात काळा काळा कापूस पिंजला की एखाद्या अभिसारकेप्रमाणे तो सजतो धजतो आणि पावसाच्या स्वागतासाठी सज्ज होतो.. नृत्य करू लागतो.. त्यातून गीत जन्मास येते.. 'नाच रे मोरा आंब्याच्या वनात नाच रे मोरा नाच.. '.. ये रे ये रे पावसा रुसलास का माझ्याशी गट्टी फु केलीस का,, ' म्हणत पावसाला साद घालणारा बालदोस्त आठवतो.. कविश्रेष्ठ बा. भ. बोरकर म्हणतात की श्रावण म्हणजे जणू काही सृष्टीला लागलेला पाचवा महिना होय.. खरच की गर्भवती सृष्टी आणि तिचे गर्भारपणातील अनुपम तेज आपण दरवर्षी श्रावणात अनुभवतो.. कधी आभाळात अवचित अवतरलेले इंद्रधनुष्य तर कधी ऊनसावलीचा नयनमनोहर खेळ.. 'हसरा नाचरा जरासा लाजरा

सुंदर साजिरा श्रावण आला.. .'.. किंवा 'रिमझिम बरसे श्रावणधारा धरतीच्या कलशात.. पियावीन उदास भासे रात .. '.. रिमझिम पाऊस पडे सारखा यमुनेलाही पूर चढे.. पाणीच पाणी चोहीकडे ग बाई गेला मोहन कुणीकडे.. '.. .'दारी पाऊस पडतो.. रानी पारवा घुमतो.. 'हे गीत असो किंवा ओलेचिंब करणारे 'घन घन मला नभी दाटल्या कोसळती धारा.. ' हे नाट्यगीत असो.. त्या स्वरांनी भिजला नाही असा मराठी माणूस शोधूनही सापडणार नाही.. 'ये रे घना ये रे घना न्हाऊ घाल माझ्या मना.. ' हे गाणे ऐकले की वाट पावलात अडखळते.. नभ उतरू आलं मन झिम्माड झाल.. '.घन ओथंबून येती बनात राघू भिरती,, ' साऱ्यांनाच पावसाची आंतरिक ओढ असते.. केतकीच्या बनत बेधुंद होऊन नाचणारा मयूर पक्षी पाहता असंख्य भावफुले उमलून तरल भावगीत जन्मास येते.. 'केतकीच्या बनी तिथे नाचला ग मोर.. गहिवरला मेघ नभी सोडला ग धीर.. '.. निसर्गाच्या समृद्धीला दाद देत रानीवनी दाखल होणारा हा ऋतुराज गाण्यातून उलगडला जातो.. 'ऋतुराज आज वनी आला.. '.. किंवा 'आला आला वारा.. संगे पावसाच्या धारा.. पाठवणी कर सया निघाल्या सासुरा.. 'किंवा 'पाऊस आला वारा आला पान लागले नाचू.'.. 'आला पाऊस आला पाऊस मातीच्या वासात ग.मोती गुंफीत मोती गुंफीत मोकळ्या केसात.. .'मराठी गीतांच्या सुमधुर मैफिलीतून तसच चित्रपटातून पाऊस आपल्याला

भेटत असतो.. श्रावणात आपल्या सर्वांच्या सोबतीसाठी तो झुरत असतो.. झुरणं तळमळण ह्यातून एक सुखद वेदना झंकारत असते आणि त्यातूनच मनातले आभाळ डोळ्यातील पाण्याचे आभाळ शोधून काढण्याचे प्रयत्न करू लागते .. शब्द्सरी कोसळू लागतात आणि गीत तयार होते.. . ह्या पावसाची रूपे तरी किती विविध.. कधी आल्हाददायी सुखद सरी तर कधी त्याचे रौद्र रूप.. 'असा बेभान हा वारा.. नदीला पूर आलेला.. कशी येऊ कशी येऊ?'. असे एक ना अनेक अशी असंख्य पाऊसगीते पावसामुळे तर अमर झाली आहेत.. सहजतेने ओठावर विसावली आहे.. प्रख्यात संगीतकारांच्या संगीतातून.. स्वर्गीय आवाजाची देणगी लाभलेल्या गायकांच्या गळयातून अवतरलेली आहेत.. .साऱ्या पाऊसगाण्यांना माझा दिल से सलाम.. अथांग सागर आहे हा गाण्यांचा.. सागरातील एक घागर असा हा लेखाजोगा आहे.. पावसाळ्यातील कुंद दुपारी एकदा आम्ही निसर्गभ्रमणास गेलो होतो त्यादिवशीच्या हरितमहोत्सवी ही सारी गाणी आपोआप आठवली.. आणि गुणगुणावीशी वाटली.. .कागदावर व्यक्त झाली अगदी पावसागत!

## 42

## मनाच्या उंबरठ्यावर.. ..



लग्न झाले आणि तिने उंबरठ्यावरील माप ओलांडून घरात प्रवेश केला.. एक उंबरठा ओलांडला आणि तिचे अवघे आयुष्य बदलून गेले.. माहेरचे पाश तिने तिथेच सोडून दिले.. माहेरच्या रूढी परंपरा ओठापर्यंत येवू दिल्या नाही मग ती लाडकी सून बनली.. .माहेरी आप्तजन कौतुकाने एकमेकांना सांगत होते नशीब काढले हो मुलीने अगदी तिला साजेशे हवे तसे घर मिळाले.. सासरी तिच्या सुबक बंगला होता आणि बंगल्याला सागवानी लाकडाचा भक्कम उंबरठा होता.. ती लग्नाआधी जेव्हा घर पाहायला आली होती तेव्हाच ह्या उंबरठ्याने तिच्या मनात घर बांधले होते मग तिनेही मनोमन ठरवून टाकले ह्या उंबरठ्याची मानमर्यादा आपण मन:पूर्वक जपायची.. त्याला छान सजवायचे.. .त्याला कधीच अन्तर द्यायचे नाही.. बाहेर सुबक रांगोळी काढायला ती कधीच चुकली नाही.. अगदीच वेळ मिळेनासा

झाला तेव्हा छानसे रांगोळीचे स्टीकर चिकटवून मोकळी झाली.. उंबरठा ओलांडतांनाचा लग्नाच्या अल्बममधील फोटो तिला खूप आवडतो..

खरच किती महत्वाचा आहे उंबरठा आपल्या जीवनात.. उंबरठा म्हणजे घराचे प्रवेशद्वार.. पूर्वी गाव मोजण्याचे तेच परिमाण होते.. अहो अवघे शंभर उंबऱ्याचे आमचे गाव म्हणजे छोटेसे आमचे गाव असे खेड्यातील लोक सांगायचे.. मग खेडे विस्तारू लागली.. उंबऱ्याची संख्या वाढली.. म्हणजेच घरांची संख्या वाढली.. इकडे शहरीकरणही झपाट्याने झाले.. सिमेंटची संस्कृती मूळ धरू लागली तसे बैठी घरे जावून तिथे गगनचुंबी इमारती आल्या.. सदनिका म्हणजे छोटी खुराडी त्यांना उंबरठा नाही.. प्रशस्त बंगले पण त्यांनाही उंबरठा असेलच अस नाही..?उंबरठा पाहिजेच ना घराला.. गावाला जशी वेस असते .. सीमा असते तशी घराची सीमा म्हणजे उंबरठा होय.. आपल्या आपल्या सीमारेषेत आपण कसे आश्वस्त असतो नाही का..?आपले हक्काचे निधान असते.. वाईट दृष्ट शक्तीपासून घराचे संरक्षण होते.. उंबरठ्याच्या आत उबदार जीवन असते.. मायेची शीतल छाया असते.. बाहेरच्या दाहक उन्हाची दाहकता फारशी जाणवत नाही.. म्हणून तर वयात आलेल्या नातीला आजी सांगत असते सायंकाळी

सातच्या आत उंबरठ्याच्या आत असले पाहिजे.. आजची मुलींची वाढती असुरक्षितता पाहता उंबरठ्याचे महत्व अधिकच अधोरेखित होते.. उंबरठा म्हणजेच संयम.. आणि उंबरठा म्हणजेच मानमर्यादा होय.. मान्य आहे की तिने यशाची फार मोठी क्षितिजे पादाक्रांत केळी आहेत.. गगनाला गवसणी घातली आहे ज्या साठी तिला घराचा उंबरठा सोडावा लागला पण मनात मात्र नेहमीच उंबरठा ठाण मांडून बसला होता.. कितीही जरी ती शिकून प्रगत झाली तरी घराच्या उंबरठ्याला तिच्या अस्तित्वाची गरज असतेच असते.. तिच्याशिवाय घर हे घर वाटत नाही.. चार भिंतीत पण तिचे जग असतेच ना जिथे तिचे भावविश्व उमलले असते.. तिची पाळेमुळे खोलवर रोवलेली असतात.. काही निमित्ताने ती घराबाहेर जरी असली तरी पाय तिचे उंबरठ्याकडे धाव घेत असतात.. .

लहानपणी आई उंबरठ्यावर बसू द्यायची नाही.. गमतीने म्हणायची हो ग बाई तुला देणे लागतोच आम्ही म्हणजे काय ग घेणेकरी बनून बसली आहेस असा त्याचा अर्थ व्हायचा.. .अर्थ कळण्याचे ते वय नव्हतेच पण नेमके तिथेच बसायला आवडायचे.. मनात वडीलधार्यांचा धाक असायचा.. एकदा लहान भावाला नेमकी उंबरठ्यावर शिंक आली मग आजी म्हणाली तांब्यातील पाणी शिंपड बाई आता उंबरठ्यावर.. .का असे विचारायचे

नसायचेच.. मुलगी सासरहून माहेरी आली की आई तिला उंबरठ्यावर थांबवायची.. भाकर-तुकडा ओवाळून टाकायची.. पहिलटकरीण बाळाला घेवून आली की सासू भाकर_तुकडा ओवाळायची.. दसऱ्याच्या दिवशी सिमोल्लघन करून लुटलेले सोने घरात आणण्यापूर्वी उंबरठ्यात औक्षण व्हायचे.. जणू काही बाहेरचे त्रासदायक लहरी घरात नको असा त्यामागे मतितार्थ असायचा.. म्हणून तर आपण नकळत तो ओलांडतांना नत होतो.. रायगडावरील शिवमंदिर दाखवत असतांना गाईड सांगत होता की शिवाजीमहाराजांनी हेतुपूर्वक उंबरठे उंच आणि दाराची चौकट कमी उंचीची ठेवली होती.. यदाकदाचित शत्रू आत आलाच तर तो मन झुकवून म्हणजे शिवलिंगाला नमन करून मगच आत येईल.. किती उदात्त भाव दडले आहे.. नम्र अन शालीन होवून संस्कृती त्या निमित्ताने आपण जपत असतो.. भारतीय संस्कृतीचे द्योतक म्हणजे उंबरठा होय.. अशा किती किती सुखद क्षणाचा साक्षीदार हा उंबरठा असतो.. घर आणि बाहेरचे जग ह्यांना जोडणारा तो एक दुवा असतो.. उंबरठा चित्रपटात ती आपल्या महत्वाकांक्षी स्वभावापायी सुखाचा उंबरठा सोडते आणि परतते तेव्हा तो उंबरठा तिला पारखा झालेला असतो.. तिचा सुखी संसार उध्वस्त झालेला असतो.. त्या कथानकामुळे खूप अंतर्मुख व्हायला होते.. खरच किती जिवाभावाचा आहे हा उंबरठा एका स्त्रीच्या आयुष्यात..

उंबरठशब्द उच्चारताच हे सारे विचार मनाच्या उंबरठयावर एकच गर्दी करून गेले.. मी आणि माझा उंबरठा.. .आहेच एक आखीवरेखीव चौकटीतले जग.. चौकटीतला उंबरठा चौकट पाळायला सांगतो..

# 43

# भय इथले संपत नाही.. .



लहानपणापासून गणपतीवर माझी अपार श्रद्धा त्यामुळे मोठेपणीदेखील त्या श्रद्धेत अंतर आले नाही.. लहानसहान गोष्टी बाप्पाला सांगितल्या की मोकळे वाटते त्यामुळे संधी मिळेल तेव्हा आणि जमेल तसे मी नेहमीच गणपतीच्या दर्शनाला जात असते.. .त्याला भेटण्याची एक प्रकारची भावनिक आस माझ्या मनात सदैव जागृत असते.. ह्या माझ्या श्रद्धेच्या गावाने खूप वेळा तो माझ्या बरोबर असल्याची प्रचीती दिलेली आहे .. मग त्याच्यापाशी फार काही मागणे उरतच नाही कारणतो अंतर्यामी आहे ना..

यंदा दिवाळीच्या सुटीत दोन दिवसासाठी माझी आठ वर्षाची भाची जुई माझ्याकडे राहायला आली होती.. तिला आत्तुकडे खूप आवडते आणि मला पण तिच्याशी बालगप्पा करायला मनापासून आवडते.. जणू काही माझ्या मोठ्या झालेल्या मुलांचे बालपण मी तिच्यात अनुभवत असते.. जुई नावाला साजेशी अल्लड आणि

निर्व्याज.. काय आणि कसे पण तिच्या आणि माझ्या आवडी-निवडीमध्ये खुपसे साम्य आहे.. तिला पण वाचन आवडते .. गाणे आवडते.. खूपशी संवेदनशील आहे.. जरा कुणी रागवून बोलले की लगेच हिरमुसते आणि डोळे भरून येतात.. मुलींनी अस नको राहायला ना जरा खंबीर असले पाहिजे असे मला आताशी वाटू लागले आहे.. शाळेत तर जुई म्हणजे लाडकी विद्यार्थिनी आहे.. अशा ह्या जुईला बोटाशी धरून मी नवश्या गणपतीला घेवून गेले.. नवश्या आणि मी एकाच गल्लीत राहतो.. घरापासून अवघे पाऊण किलोमीटरचे अंतर.. म्हणून तर नवीन घर आनंद्वल्लीमध्येच घेतले होते.. मानवनिर्मित आधुनिक मंदिरांपेक्षा अशी ऐतिहासिक पार्श्वभूमी लाभलेली मंदिरे मला नेहमीच अधिक भावतात.. त्या वस्तूची स्पंदने जाणवत राहतात आणि एकदम श्रांत वाटायला लागते..

नवश्याच्या मंदिरातून बाहेर आलो तर तिथे नेहमीप्रमाणेहजरत पीर सैयद सांझेशाह शहीद ह्यांचा दर्गा लागला.. जुईने हात जोडले.. ती क्षणभर थांबली तिथे आणि मला म्हणाली आत्तु हे पण मंदिर आहे का ग.. तिला एकदम काय उत्तर द्यावे मला कळले नाही आणि मी पण उजवा हात हुंदयाला लावून नमस्कार केला जो मी नेहमीच तिथून जात असतांना करत असते त्यासाठी

मला मुस्लीम असण्याची काही गरज भासत नाही.. खरतर ही सारी इतकी उस्फुर्त प्रतिक्रिया होती की त्यावर विचार करायलाही सवड नव्हती.. मी म्हणाले हो ग हे त्यांचे मंदिर आहे.. त्यांचे म्हणजे कुणाचे ग.. आता काय सांगावे प्रश्न पडला.. ज्या निष्पाप मनात हिंदूमुस्लीम असा कुठलाच भेदभाव नाही तो भेद मला नव्याने उत्पन्न करून द्यावासा वाटला नाही.. मी म्हणाले आपला बाप्पा आणि त्यांचा बाप्पा एकमेकांचे मित्र आहेत म्हणून तर ते वर्षानुवर्षे एकत्र राहत आहे.. त्यावर जुई खुदकन हसली आणि तो विषय तिथे मी संपविला.. त्या दर्ग्याजवळ प्रसन्न नक्कीच वाटते.. विशेषतः तिथला तो ठराविक धुपाचा सुवास मला जातायेता मनाला खुप भावतो.. जगण्याचा वेग इतका अमर्याद आहे की भेदभावाच्या गोष्टी मनात येवू द्यायला पण सवड नाही.. जुई च्या प्रश्नामुळे मी मात्र खरोखरच विचारात पडले.. खरच सामान्य पापभिरू माणसे साध्यासरळ नजरेने जगाकडे पाहत असतात.. जगण्याचे खोचक कंगोरे त्यांना जणू उमजतच नाही..

घरी आले आणि वर्तमानपत्रातील त्या बातमीने अक्षरशः हादरले.. धरतीवरील स्वर्ग समजले जाणारे फ्रान्समधील paris भ्याड दशहतवादी हल्ल्यामुळे छीन्नविछीन्न झाले होते.. त्यात १२९ निरपराध लोकांचा नाहक बळी गेला होता.. बळी गेलेल्या

लोकांना क्षणात होत्याचे नव्हते केले गेले होते.. त्यात अशी अनेक बालके होती ज्यांना धर्म काय आणि जात काय ह्याचे अद्याप आकलनही झालेले नव्हते.. आतंकवाद काय असतो हेही त्यांना ठावूक नाही अशा चिमुरड्या लेकरांना दशहतद्यांनी संपविले होते.. किती दुर्दैवी घटना होती ती की त्यामुळे जाणवले की आपले हे जग आता अजिबात राहण्यासाठी सुरक्षित राहिलेले नाही.. आज ही इथे कुढ्या मनाचची जमात आहे.. जी हिंसेच्या बळावर जगाला जिंकू पाहत आहे.. दशहतवादाची पाळेमुळे खोलवर दडलेली आहेत त्याची व्याप्ती जाणून घेणे सामान्य माणसाच्या विचारशक्तीपलिकडले आहे.. का असे लोक आत्मघातकी होवून जीवावर उठत असावी तेच कळत नाही.. खूप बाळबोध प्रश्न आहे ना हा.. पण नंतर आलेले पेपरमधील फोटो पाहून मनाला खूप यातना झाल्या.. चौकाचौकात छोटी छोटी मुले हातात मेणबत्ती पेटवून आणि शांतता फेरी काढून दिवंगतांना श्रद्धांजली वाहत होते.. आता तिथली जनता साध्या फटाक्याच्या आवाजाने देखील सैरभैर धावत सुटते.. .विश्वशांतीसाठी प्रार्थना करण्यापलीकडे आपण काहीही करू शकत नाही.. ही हतबलता तसेच दुर्बलता त्याहून वेदनादायी ठरते.. हे सुंदर जग आता राहण्यालायक उरले नाही अशी खंत आहे.. भर दिवाळीच्या सणाला घडलेली ही घटना दिवाळीचा आनंद गढुळ करून गेली.. कितीतरी वेळ मनात जुईचा

प्रश्न घोळत होता.. कुठला आणि कोणाचा बाप्पा ग हा..? नुसत्याच सहिष्णुततेच्या गप्पा करून आता कुठल्याच देशाला चालणार नाही.. .दशहतवादाचा समूळ नायनाट होईल तो खरा विश्वासाठी सुदिन असेल..

# 44
# मनी वसे ते चित्र दिसे..

माझी मानसवारी



परवाच बाप्पाची चतुर्थी झाली आणि जाणवले की एरवी गजबजणारी ही बाप्पाची गल्ली अगदीच ओस पडली आहे.. आपल्या सर्वांची ही लाडकी इष्टदेवता ज्यास आपण कार्यसिद्धीसाठी आमंत्रण देत असतो.. लहानपणापासून नकळतपणे मनावर बिंबवलेली श्रद्धा मग वयानुपरत्वे वाढतच गेली.. ती श्रद्धा डोळस होत गेली आणि त्याच्याकडे मी आशेने पाहू लागले.. बाप्पाने देखील त्याच्या अस्तित्वाचा प्रत्यय दिला आहेच.. आता ते सगळे अनुभव मनाच्या कुपीत जपून ठेवले आहेत.. तो आहेच पाठीशी असे म्हणत कर्तव्याला न चुकता कालक्रमण करत जायचे.. विघ्नहर्ता.. दुःखविनाशक असे नाव आहे त्याचे मग श्रद्धेला महापूर येणारच.. भक्तातले देवत्व आपल्याला जपायचे असतेच.. त्याच्या नजरेत आपण कधीच उतरायला नको असे मनापासून वाटते.

हे सगळे हळवे चिंतन मनात उमटण्याचे कारण म्हणजे आताची करोनापर्वातील सार्वत्रिक चिंताजनक परिस्थिती होय.. मार्च महिन्यात चतुर्थी आली त्यानंतर आलेल्या कुठल्याच दिवशी बाप्पाचे मंदिराच्या गाभाऱ्यात जाऊन दर्शन घेता आले नाही.. ही चतुर्थी गेली की पुढच्या चतुर्थीला होईलच दर्शन अशी भाबडी आशा फोल ठरत गेली आणि बघता बघता जुलै उजाडला तरी बाप्पा बंद चौकटीतच आहेत.. घरापासून अवघ्या अर्ध्या किलोमीटर वर पण मंगळवारी अगदी लांबूनही दर्शन घेता येत नाही म्हणून थोडी अस्वस्थता देखील आली आहे.. असे अचानक काय झाले असावे की आपले जगणेच बदलून जावे.. अगदी चालू गाडीला खीळ बसावा असे वाटते.. असे वाटणे म्हणजे त्या काळापुरती उमटलेली प्रतिक्रिया आहे हेही कळते.. हे आपल्याच हितासाठी आहे मग ते स्वीकारले पाहिजेच.. आणि हा काळ निघूनही जाणार आहे हेही समजतेय तरीही सहनशक्तीची परीक्षा आहेच.

लहानपणी अशोकस्तंभावरील ढोल्या गणपतीला साकडे घातले जात असे.. पेपरला जातांना घरातून दहा मिनिटे आधी निघून ह्या विद्येच्या देवतेला नमस्कार असायचा की पेपर सोपा जाऊ दे.. 'देवा मला पास कर.. अरे वेड्या अभ्यास कर.. ' असे मिस्किल

भाव त्याच्या चेहऱ्यावर असायचे.. लग्नानंतर नाशिक हे गाव बदलले नाही मग नवश्या गणपती भावविश्वाचा साक्षीदार झाला.. त्याच्या समवेत कित्येक सुखदुःखे वाटून घेतली आहेत हे तिथून वाहणाऱ्या गोदावरीने देखील पाहिले आहे.. आताही तो मोबाइलच्या होमस्क्रिनला विराजमान आहे.

सध्या योगाभ्यास करत असतांना डोळे बंद केले की एक आभासी चित्र मी जाणीवपूर्वक निर्माण करत असते आणि त्यात रमून जाते.. मी लिफ्टमध्ये आहे.. खाली उतरले आणि नवश्याच्या गल्लीत पोहोचले आहे.. वाटेत नेहमीच्या ओळखीचे लोक भेटत आहेत.. ओळखीची घरे भेटत आहे.. एखाद्या ध्येयाने प्रेरित झाल्यागत मी झपाझप पावले टाकत आहे.. पावलांना त्याच्या दर्शनाची आस आहे.. हे काय मध्येच दुसरे विचार आले हे मनात.. मन एक अजब रसायन असते जिथे सतत नानाविध विचारांचा राबता असतो.. कधी कुठला विचार उसळी मारत आधीच्या विचाराला दाबून टाकेल सांगता येत नाही.. आणि एक सामान्य संसारी व्यक्ती म्हणून तितकी साधना देखील नाही मग आपल्याच विचारांशी झुंज देत राहावी लागते.. हो.. तर बाप्पाची मानसपूजा करायला निघाले आहे ते मनाला बजावते.. मनाला मी पुन्हा लिफ्टमध्ये आणते आणि नव्याने नवश्याचा रस्ता धरते.. पुन्हा

प्रवास त्याच रस्त्यावरून मग ओळखीचे दुकानदार भेटतात.. ताई हारफुले घ्या असे विनवणाऱ्या मावशी दिसतात.. पैसे मागणारे पथारी टाकून बसलेले असतात..  कंदी पेढेवाला भाऊ भेटतो.. चव घ्या म्हणतो पण मी निग्रहाने नाही म्हणते.. पुढे चप्पल काढते आणि मोठ्या घंटजवळ येते.. तिला वाजविण्याची सोय नाहीच मग डाव्या हाताच्या पायऱ्या उतरते.. समोर 'गणनाथाय गजाननाय.. ' हा मंत्र लिहिलेला आहे तो सतत जपते.. शिवलिंग आणि त्यावर अखंड होणारा जलाभिषेख पाहत पुढे जाते.. आता गाभारा येतो.. अरे वा.. सगळीकडे नवसपूर्तीच्या घंटा बांधलेल्या आहेत.. तो नाद मी कानात खोलवर ऐकत जाते.. अष्टविनायक दर्शन घेते आणि मूषकमहाराजांना नमस्कार करून कानात धन्यवाद देते.. कासवाशी लीन होत समोर बघताच ती केशरी बाल मूर्ती डोळ्यात भरते…कितीतरी वेळ ते इवलेसे डोळे संवाद साधत राहतात.. 'याचि देही याचि डोळा' दर्शन घेत खोलवर श्वास घेत खूपशी ऊर्जा मनात भरून घेते.तू आहेसच ना अंतर्ज्ञानी मग काय मागू तुला..?विचारांचे जडत्व बाजूला सारत ताज्या फुलांची प्रसन्न आरास आणि बाप्पा ह्यावर लक्ष केंद्रित करते.. चांदीची समई लख्ख प्रकाशाचा अनुभव देत असते.. बाहेर नारळांची आरास पावसात ओली होतांना दिसत.. थोड्यावेळ पायरीवर विसावते तेव्हा खूप काही दाटून आलेले असते पण भेटीचा आनंद इतका


काही असतो की त्यात सारे काही विसरायला होते.. परतीचा मार्ग धरत घराच्या रस्त्याला लागते.. लिफ्टचे बटण दाबत माझ्या मजल्यावर आणि आता घरात आसनावर स्थानापन्न झालेली माझी मलाच दिसते.. दहा मिनिटांच्या भावसमधीतून जाग येते तेव्हा मन आणि शरीर अगदी हलके झाल्यासारखे वाटते.. क्षणभर कळतच नाही की आता घेतलेली ही बाप्पाची भेट प्रत्यक्ष होती की आभासी..?अतिशय तल्लीन होत भेटीची आस धरल्याने अनुभूती तर प्रत्यक्ष दर्शनाची आली आहे हे मान्य करत जाते..

त्यानिमित्ताने विचार आला की भेटीची आस असणे महत्वाचे आहे.. आता मला असे वाटत नाहीय की खूप दिवस झाले बाप्पा भेटलाच नाही. हा तादात्म्य अनुभव आपल्याला श्रद्धेच्या तीव्रतेनूसार येत असावा त्यामुळे त्या गोष्टीला मोजमाप नक्कीच नाही.. त्यातून एक मात्र लक्षात येते की आपण सध्या ज्या संक्रमणातून जात आहोत तो विरहदायक नक्कीच आहे पण अशी ठाम बैठक ज्यांना आहे त्यांना त्यातून काही अंशी बाहेरही पडता येणे शक्य होत आहे.. करोनागुरूने खूप काही शिकवले आहे जे आपल्याला मान्य करावेच लागेल.. एखादी काळजातील व्यक्ती भेटत नसते किंवा आपल्यावर रागावलेली असते तरी भेट व्हावी असे वाटते.. मग मनात प्रतिमाचित्र उभे राहते जिथे आपण संवाद

करत जातो.. आपण त्या व्यक्तीचे प्रत्यक्ष असणे ह्यापेक्षाही त्या व्यक्तीचे मनात असणे महत्त्वाचे वाटू लागते.. मग कधीतरी भेट झाल्यावर सारे काही ओळखीचे वाटू लागते.. हे तर आधीच बोलून झाले आहे असे वाटत जाते.. खूप गाण्यांमध्ये असेच शब्द असतात ना.. माहेरवाशीण माहेराला जाण्यासाठी तळमळत असते मग ती म्हणते.. 'घाल घाल पिंगा वाऱ्या माझ्या परसात माहेरी जा सुवासाची कर बरसात.. ' कविकुलगुरू कालिदास तर मेघदूत पाठवतात प्रेयसीला सांगावा धाडण्यासाठी.. 'जा रे जा रे उड जा रे पंछी' किंवा 'जा रे जा रे ओ कारी बद रिया' अशा अनेक विरहगीतात तीच अनुभूती जाणवत जाते.. मनाला व्यक्त होता येते आणि दिलासा शोधण्याचा तो एक प्रयत्न असतो.. मानसशास्त्र देखील त्या गोष्टीला पुष्टी देत समुपदेशन करत असते.. आपल्या प्रत्येक कृतीवर अचेतन मनाचा पगडा असतोच असतो.. आणि मानसिक शांतीसाठी हे अचेतन मन काय सांगू पाहत आहे ते आपण ऐकलेच पाहिजे.. .शेवटी काय तर सद्यपरिस्थितीवर आपल्याला यशस्वी मात करायची आहे.. आणि जगणे सुकर करायचे आहे.

# 45

# घराचे झाले मंदिर..



रविवार सूटीचा दिवस.. अपर्णाने इडली-सांबारचा घाट घातला होता.. दोघे मुले अनय आणि तन्वी खुप खुश झाले होते.. नोकरी करणारी आई रविवारीच जेमतेम वाटेला येत असे.. अपर्णा एक आधुनिक आई जी स्वतःच्या करियरला सांभाळून पालकत्वाची धुरा सांभाळत होती.. राजेश म्हणजे मुलांचा बाबा सतत फिरतीवर असायचा आणि मग नकळत अपर्णाला एकल पालकत्व निभवावे लागे.. खुप तारेवरची कसरत होत असे पण ती आनंदाने घरीदारी वावरत असे.. अपर्णा जेमतेम तीस वर्षाची असतांना एका अपघाताने तिचे माहेर हिरावून नेले.. माहेरातली एकटी लेक जणू पोरकी झाली.. तिच्या आणि राजेशच्या आंतरजातीय विवाहाला सासरच्यांनी अमान्य केले असल्याने तेही दुरावले होते.. अपर्णाला नेहमी वाटायचे की

आपल्या मुलांना आजीआजोबांचे प्रेम मिळत नाही जे तिने लहानपणी भरभरून घेतले होते.. आजीआजोबा म्हणजे किती विसाव्याचे स्थान असते ना.!.आणि त्यांनाही दुधावरची साय अतिप्रिय असते अगदी आपल्या मुलांपेक्षाही.. त्यांच्याकडे अनुभवांची समृद्ध शिदोरी असते.. संस्कारांची खाण असते.. तिच्या डोळयाच्या कडा नकळत पालवल्या..

अपर्णा विचार करत होती ह्या जगात किती सारा विरोधाभास ठासून भरलेला आहे.. आजूबाजूची उदाहरणे डोळयासमोर तरळली.. आदळआपट करणाऱ्या बाईच्या जातीला कलंक ठरणाऱ्या काही वाह्यात सूना आठवल्या ज्यांना सासू सासरे केवळ फोटोतच आवडत असतात आणी ज्यांची दारे अशा तिर्थरूपांसाठी नेहमी बंद असतात.. त्यांच्या मुलांना अर्थातच संस्कारांची वानवा असते हे वेगळे सांगायला नको.. अपर्णाची मावसवहिनी अगदी तशीच होती जी सासरच्या मंडळींचा द्वेष करत असे.. स्वभावाने शांत आणि सोशिक असलेली अपर्णाची अलकामावशी आणि तिचे यजमान सुधीरराव सुनेच्या मनमानीपणामुळे त्रस्त झाले होते.. एकुलता एक मुलगा दुरावला होता.. आणि अवघ्या आयुष्यातील आनंद ढवळून निघाला होता.. अपर्णाने अलकामावशीला फोन लावला.. मावशी भोपाळला राहत होती.. मावशीचा आवाज

ऐकताच अपर्णाला भरून आले.. अपर्णा लहान असताना ह्याच मावशीने तिला अंगाखांद्यावर वाढविले होते.. आणि आता तर आईचे प्रेम ती मावशीत शोधत होती आणि तिला ते सापडतही होते.. ती मावशीला मुंबईला आपल्या घरी येण्याचा मनापासून आग्रह करत होती.. तिला माहित होते आपली स्वाभिमानी मावशी सहजासहजी लेकीकडे राहायला येणार नाही आणि आपल्यालाच माहेरपणाला बोलवेल.. काय निमित्त काढावे बरे दोघांना मुंबईला बोलावण्याचे हा विचार ती करत होती आणि त्याच विचारांमध्ये ती हरवून गेली.. मावशीची घालमेल तिला पाहवत नव्हती..

अनय आणि तन्वी दोघेही लोभस आणि अभ्यासू बाळे दुपारी शाळेतून घरी आले की सरळ पाळणाघरात जात असत.. तिथे त्यांना आवडत नसे पण नाईलाज असत असे.. अनय आठ वर्षाचा आणि तनू सहा वर्षाची घरात एकटे कसे सोडणार ही चिंता अपर्णाला होती.. अपर्णाच्या डोक्यात मग मुलांचाच विचार घोळत असे.. आज ऑफिसमध्ये गेल्यागेल्या तिच्या हातात एक लिफाफा येऊन पडला .. आनंद तिच्या गगनात मावत नव्हता कारण तिला पदोन्नती मिळाली होती पण त्यासाठी दिल्लीला तीन महिन्यांचे प्रशिक्षण घ्यावे लागणार होते.. अपर्णा मटकन खुर्चीत बसली.. आनंदाचा क्षण गढूळ होऊन गेला.. मुलांचे कसे काय होणार

आपण घरी नसलो तर.. जाऊ दे नकोच ती पदोन्नती.. पण असे म्हणायला ही तिचे मन चाचरत होते.. इतकी वर्षे जी मेहनत घेतली त्याला फळ आले होते.. पुढे मुले मोठे होऊन जातील आणि अलगही होतील तेव्हा रितेपण ग्रासत जाईल.. मग आजच ही सुसंधी का घालवायची.. विचार करून करून ती थकली होती.. काय करावे आणि काय उत्तर द्यावे बॉसला ह्यासाठी शब्दांची जुळवाजुळव ती शोधू लागली.. ती त्यांना म्हणाली मला दोन दिवस द्याल का निर्णय कळवायला.. मी नक्की सांगते.. वडिलांच्या वयाचे तिचे बॉस डोळ्यानेच तिला धीर देत होते कारण त्यांना अपर्णाबद्दल नक्कीच कौतूक होते.. आपल्या आयुष्यातील प्रत्येक भूमिकेला न्याय देण्याचा तिचा यत्न वाखाणण्याजोगा होता.. ते म्हणाले विचार कर पण ही सुसंधी हातातून निसटू देऊ नको.. त्यांची पत्नी शीला हीअलकामावशीची वर्गमैत्रिण होती आणि अपर्णाला आपली भाची मानत होती.. अपर्णानचेही शीलामावशीशी विशेष सख्य होतेच..

अपर्णाने आपले डेस्क आवरले आणि घरी जायला निघाली.. वाटेत गणपतीसाठी पेढे घेतले आणि मंदिरात गेली.. नमस्कारासाठी डोळे मिटले आणि तिचे डोळे घळाघळा वाहू लागले.. बाप्पा माझ्या लेकरांची काळजी घेशील ना.. मला

त्यांच्यासाठीच घराबाहेर पडायचे आहे.. मोलाने बघते कुणी त्यांचा सांभाळ करेल का तीन महिन्यांसाठी.. राजेशला सांगते की तू त्या कालावधीत टूरवर जाऊ नको.. अपर्णाच्या मनात नियोजनाचे आराखडे उमटू लागले.. आणि तिने निर्धार केला की योग्य ती व्यवस्था लावून आपण दिल्लीला जायचे आहे.. अलकामावशी हक्काची आहे पण त्यांना ह्या वयात कशी काय जबाबदारी द्यायची ना..?


मनातल्या अवघ्या संमिश्र भावनांना बांध घालत ती घराच्या दिशेने जाऊ लागली.. आज थोडा उशीरच झाला.. मुले वाट पाहत असतील आणि हो आज त्यांना नवीन गोष्ट सांगायची आहे.. गृहपाठ करवून घ्यायचा आहे.. कामाची यादी डोळ्यासमोर साकारताच तिचे पाऊले आपोआप वेग घेऊ लागली.. शिवाजी महाराजांच्या गोष्टीतली हिरकणी आठवली आणि तिचे तिलाच हसू आले.. नाही ग वेगळे तुझे आणि माझे जिणे..  काळ बदलला आहे इतकेच पण आईपण नाही बदलले.

नेहमी चावीने दार उघडून घरात येणारी ती आज दार उघडे पाहून थक्क झाली.. घरामध्ये मुलांचा उत्साही चिवचिवाट चालू होता.. गोष्ट सांगा ना.. अभ्यास घ्या ना असा लाडिक आग्रह मुले करत होती.. घर लक्ख आवरलेले होते.. सुखद धक्के अपर्णाला

बसत होते.. ती घरात आली आणि तिला देवघरात तेलवात करणारी अलकामावशी दिसली आणि बाल्कनीत झाडांना पाणी घालणारे सुधीरकाका दिसले.. स्वयंपाकघरातून खमंग वास दरवळत होता.. मावशी असे म्हणत अपर्णाने मावशीला मिठी मारली.. दोघींना आनंदाश्रू आवरले जात नव्हते.. 'बस बाळा दमून आलीस ना?.. हा घे चहा.. :मावशी.. अग तुला आनंदाची बातमी सांगायची आहे.. अग तुझी भाची आता ऑफिसर होणार आहे.. मावशी म्हणाली 'अग हो हो.. खुप मोठी हो.. आणि बिनधास्त जा हो दिल्लीला.. आम्ही राहणार आहोत तीन महिने इथेच.. अग आजी आजोबांना पण आस असते ना ग नातवंडांची आणि आम्ही असतांना तू कशाला काळजी करते.. आमच्या मुलाने पाठ फिरवली म्हणून काय झाले तूही तर लेकच आहे ना आमची.. ' अपर्णा म्हणाली .. 'अग तुला कसे काय माहित पडले ग.. बघ आपली मने किती जुळली आहेत ती.. मी साद दिली आणि तुम्ही हजर झालात.. असे प्रेम मिळायला नशीब लागते ग मावशी आणि मी खरंच खुप नशीबवान आहे बरं का.. 'दोघी गप्पांमध्ये रंगून गेल्या.. .मुले आजी आजोबांना सोडत नव्हती.. त्यांना म्हणत होती .. 'तुमचे सामान आम्ही लपवून ठेवले आहे आता तुम्हाला तुमच्या घरी जाताच येणार नाही.. ' त्यांचे ते निर्व्याज प्रेम पाहून सगळेच भारावून गेले होते.. मावशी म्हणाली.. 'अग शिलामावशीने मला

सांगितले की तुला अशी अशी संधी मिळत आहे आणि तुला दिल्लीला जावे लागणार आहे.. तुझी द्विधा मनस्थिती आम्ही जाणून होतो मग मीच बॅग भरायला सुरुवात केली आणि इकडे आलो निघून.. माझी ताई असती तर तिने मुलांना आजीचे प्रेम कुठंही कमी पडू दिले नसते पण असो.. आता आम्ही आहोत ना.. चला रे मुलांनो शुभम करोती म्हणायचे ना.. चला चला.. हं आणि आता रोज एकेक नवीन गोष्ट सांगणार हं तुम्हाला.. ' मुले तर जाम खुश होती.. अपर्णालाही आज शांत झोप लागणार होती.. तिने बाप्पाला हात जोडले आणि म्हणाली बाप्पा असे आजीआजोबा प्रत्येक घराला मिळू दे रे.. घराचे कसे मंदिर होऊन गेले आहे आज.. '

## 46
## महिला राजकारणातील एक प्यादे



भारतामध्ये राजकारणात महिलांना पन्नास टक्के आरक्षण दिले आहे ही खरंतर महिला सबलीकरणासाठी स्वागतार्ह अशी बाब आहे.आरक्षणामुळे पंचायत राज्य संस्था आणि स्थानिक शासन संस्था ह्यामध्ये महिलांचे प्रतिनिधित्व वाढले आहे.महिलांनी संस्थात्मक तसेच रचनात्मक राजकारणात आपल्या क्षमता सिद्ध केल्या आहेत.स्त्रिया नेहमीच संघर्षाला चिवटपणे झुंज देऊ शकतात आणि खरतर देवाने त्यांच्यात जे काही वेगळेपण दिले आहे त्याचा यथोचित वापर त्या पद मिळाल्यावर करू शकतात.उदा.गावपातळीवर त्यांना स्थानिक प्रश्नांची जाण असते त्यासाठी त्यांचे पारंपरिक ज्ञान उपयोगी पडत असते.बिगर शासकीय संस्था तसेच सोशल मिडियावर देखील आता त्या राजकारण हा विषय घेऊन सहज चर्चा करू शकतात हा देखील

एक सुखद बदल आहे.वैविध्यपूर्ण परिस्थितीत त्या वेगळ्या पद्धतीने विचार करू शकतात जसे की पुरुष फक्त एकाच दिशेने विचार करू शकतात.आजमितीस वर्णभेद, जातीभेद, भाषाभेद तसेच लिंगभेद असतांना देखील त्या आपले कार्य आत्मविश्वासाने करू पाहत आहे.

वरील सर्व बाबी अतिशय सकारात्मक अशा असल्या तरी प्रश्न हा आहे की राजकारणात काम करणाऱ्या महिला खरोखरच आत्मप्रेरित आहे का?त्यांना देशपातळीवरील समस्यांची जाण आहे का आणि जाण असली तरी त्या समस्यांच्या मुळापर्यंत त्या जाऊ शकतात का?त्यांचा राजकारण ह्या विषयाचा सखोल अभ्यास आहे का..?निसर्गाने त्यांना सर्जनशीलता आणि क्रियाशीलता दिली आहे त्याचा वापर त्या करतात का.?काही गुणात्मक अपवाद सोडल्यास ह्या सर्व प्रश्नांची उत्तरे नकारात्मक येत आहे. ही खरोखर आपल्या देशाची फार मोठी शोकांतिका आहे की त्यांच्या पदाचा अधिकार त्यांच्या जवळचा पुरुष गाजवत असतो.. ग्रामीण भागात पत्नी सरपंच पदावर असते आणि तिच्या सह्या नवरा करत असतो.ती घरकामात व्यस्त असते. कागदोपत्री घटनेनूसार तिच्या हाती सत्ता सोपवली जात नाही.पुरुषसत्ताक देशात पुरुषाच्या हो ला हो करणारी स्त्री सगळ्यांना प्रिय असते.तिने


स्वतःची बुद्धी वापरण्याचा प्रयास करताच तिचे चारित्र्य तपासून पाहिले जाते.. तिच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुढे केला जातो.तिने बालसंगोपन करणे किती गरजेचे आहे हे तिच्याच जातीच्या महिलांकडून सांगितले जाते.काही गुणात्मक अपवाद सोडला आपल्या लक्षात येईल की आजही त्या पैशांच्या दृष्टीने स्वतंत्र नाही.आर्थिक निर्णय घेण्यासाठी त्या पुरुषांवर निर्भर असतात.त्यांनाही त्याच्या छत्रछायेत सुरक्षित वाटत जाते पण इथेच त्यांनी कोषातून बाहेर आले पाहिजे.निर्वाचनात्मक राजकारण हे महिला सबलीकरणाची भाषा अशी व्यासपीठावरून गर्जना करणारे राजकारणी पुरुष प्रत्यक्षात तिच्या हातात सत्ता देतांना आपला हात आखडता घेतात आणि तिला कळसूत्री बाहुली बनवून टाकतात.सार्वजनिक जीवनात तिच्या सुरक्षिततेचा कळीचा मुद्दा उपस्थित केला जातो.पुरुषी चौकटीतून स्त्री संरक्षणाची भाषा बोलली जाते.तिच्या प्रश्नांबद्दल चाड असल्याचा अविर्भाव आणला जातो.. तिच्या प्रश्नांच्या मुळाशी त्याची विकृत मानसिकता आहे.निवडणूक क्षेत्र हे सार्वजनिक क्षेत्र असून ते अनेक अवैध मार्गाने व्यापलेले आहे आणि असे असतांना तिचे स्त्रीत्व एक हुकुमी एक्का म्हणून वापरले जाते.तिला सत्तेत वैध वाटा मिळतो पण अधिकाराचा प्रश्न अनुत्तरीतच राहतो.कौटुंबिक हिंसाचार अजूनही थांबला नाही.. व्यवहार तिला फारसा कळत

नाही असे लेबल लावत गुंतागुंतीच्या निर्णयप्रक्रियेपासून तिला दूर ठेवले जात आहे.सौदेबाजी तिला जमणार नाही म्हणून तिचा केवळ एक प्यादा म्हणून वापर केला जात आहे.. सत्ता पूर्णार्थाने हातात आल्यास त्या गुणात्मक बदल घडवू शकतात आणि लोकशाहीची संकल्पना अधिकाधिक आशयसंपन्न करू शकतात.प्रत्यक्षात मात्र तिला पुरुषी मानसिकतेला तोंड द्यावे लागते.पुरुषांचा तिच्याविषयी असलेला दृष्टीकोन जो पर्यंत बदलत नाही तोपर्यंत राजकारणातील तिची अवहेलना संपणार नाही.खरंतर मनात असा विचार डोकावतो की आम्ही खरच अबला आहोत का?आम्हाला आरक्षणाची गरज आहे का..?हा विचार करत असतांना नकळत एक स्त्री म्हणून मन अंतर्मुख होवून जाते.ती बहुआयामी आहे.. अष्टावधानी आहे.. शिक्षित आहे.. आत्मनिर्भर आहे तरी ती निर्भया नाही.पन्नास टक्के आरक्षण देऊनही तिला काम करण्याचे स्वातंत्र पुरुषांनी दिले पाहिजे.तिचे आणि त्याचे नाते नेहमीच पूरक ठरले आहे.तिच्या ठायी समाजसुधारणा करण्याची प्रचंड ऊर्जा आहे.. तिनेही आता खऱ्या अर्थाने सजग झाले पाहिजे.. आपले स्त्रीत्व जपत तिला प्रश्नांची उकल करता आली पाहिजे.हुकुमी विजयाची कसोटी म्हणून तिच्याकडे पाहणाऱ्या पुरुषांना तिने ठणकावून उत्तर दिले पाहिजे की माझ्या हातात असलेल्या सत्तेचा सकारात्मक वापर मीच करणार आहे.सर्वात महत्वाचे म्हणजे तिने

आत्मपरीक्षण केले पाहिजे.. राजकारणातील आपली भूमिका तिने तपासून पाहिली पाहिजे.आपल्या हक्कांची पायमल्ली होवू नये म्हणून जागृत असले पाहिजे.

# 47

## चंद्र आहे साक्षीला..



पौर्णिमेची प्रसन्न रात्र होती.. आभाळभर टिपूर चांदणे आणि मधोमध गोलाकार वाटोळा चंद्र पाहतांना डोळे अगदी तृप्त तृप्त होऊन गेले होते.. निसर्गाची किती अदभूत किमया असते ना.. आपण निसर्गाच्या कुशीत गेले पाहिजे तो तर देतच असतो.. रात्रीचे सोंदर्य डोळ्यात साठवतांना नकळत अंतर्मनाशी संवाद साधला जात होता.. रात्र काळोखी.. रात्र गूढ.. रात्र भयावह.. रात्र सावल्यांची. गुढ खेळाची.. रात्र कधी संपू नये अशी वाटणारी तर कधी सरता सुरू नये अशी.. एखादी रात्र काळरात्र ठरलेली.. असे काहीसे रात्रीबद्दल पूर्वग्रहदूषित मनात असते आणि त्या पार्श्वभूमीवर आजची पौर्णिमेची रात्र मनाला जास्तच भावली होती.. त्या त्या क्षणाचे ते ते आपले मनतरंग आपल्याला त्या क्षणाचा उत्कट आनंद देत असतात.. मन हलकेफुलके होत जाते आणि आपल्याला साध्या साध्या गोष्टीतून आनंद मिळत जातो.. दिवसामागून तर रोजच रात्र होत असते मग

आजची रात्रच का सुमधुर भासावी हेही त्याक्षणी एक कोडेच होते.. त्या माळरानावर आम्ही सगळे काळजातील माणसे शेकोटीसमोर बसलो होतो.. एरवी पण सगळ्यांची भेट होत असते पण त्यात औपचारिकता जास्त असते.. असे निवांत बसल्यावर अगदी काळजातले आतून आतून ओठावर येत जाते.. अर्थातच ओठावर येतात मनामनातली आपली आवडती गाणी.. गाणी गायला सर्वांनाच आवडते.. अहो आपले जीवनगाणे असते ते.. गातांना मग कळते आपण किती समृद्ध आहोत की असे जिवलग मैत्र देवाने आपल्याला दिले आहेत की ज्यांच्यामुळे गाण्यातील शब्दांना अर्थ प्राप्त झाला आहे.. गाण्यातील शब्द शब्दशः जिवंत भासू लागले आहेत.. मग शब्दपक्षी स्वरपंख लेवून मुक्तपणे विहरत जातात.. आनंद देऊन जातात.. ज्यांच्यामुळे गाणे आपल्या जीवनात आहे त्यांच्यासोबत हा स्वरानुभव नक्कीच संस्मरणीय असतो.

आकाशाकडे पाहत आम्ही ठरवले की चंद्र हा शब्द असलेले हिंदी किंवा मराठी गाणे म्हणायचे आणि काय आश्चर्य डोक्यात गाण्यांचा टपटप पाऊस पडू लागला.. खूप सारी गाणी आठवत गेली आणि सगळ्यांनीच त्यात सहभाग नोंदवला.. मग जाणवले अगदी वयाच्या प्रत्येक टप्प्यावर हा चंद्र मला गाण्यातून भेटत गेला आहे.. चंद्र आहे आयुष्याच्या साक्षीला असे म्हंटले तरी चालेल..

'चांदोबा चांदोबा भागलास का?' हे गाणे म्हणत असतांना डोळयासमोर बालपण तरळले.. आकाशातील चंद्र हवा म्हणून रुसलेले गोष्टीतले रामराजाचे बालरूप आठवले.. कौसल्यामाता मग आरशातून चंद्र दाखवते.. चंद्र ही संकल्पना डोक्यात येताच किती किती गोष्टी आठवल्या ..

'चंदा मामा दूर के, पुए पकाए बूर के

आप खाए थाली मे, मुन्ने को दे प्याली मे'

ही बालगीते ऐकत बालपण संपन्न झाले आहे..

' चंदामामा से प्यारा मेरा मामा

मेरे आखों का तारा मेरा मामा.. '

चंद्राच्या असण्याला रोजच्या जगण्याचा संदर्भ होता.. .'चंदा है तू मेरा सूरज है तू .. 'म्हणतांना वात्सल्य उफाळून येते.

.. 'चांदनी ओ मेरी चांदनी' गाण्यातील अवखळ श्रीदेवी आठवली.. 'चंदा रे मोरी बतिया सुन जा' म्हणणारी विरहिणी डोळयासमोर साकारली.. चंद्र प्रत्येकालाच आगळयावेगळया विश्वात घेऊन जातो.. मग ढगात असलेला पौर्णिमेचा चंद्र भाकरीचा चंद्र भासतो.. चंद्र नेमका कुणाचा..?चंद्र चांदण्यांचा की चंद्र रोहिणीचा..?चंद्र कधी ढगाआड तर कधी झाडाआड.. कधी

कुशीत तर कधी देहाआड.. चंद्र तर आहे केवळ एक संमोहन.. सहस्त्रचंद्र ज्यांनी पाहिले त्यांना चंद्र प्रगल्भ भासतो.. 'कैवल्याच्या चांदण्याला भुकेला चकोर.. ' .. 'रात्रीस खेळ चाले हा खेळ सावल्यांचा.. ' 'डोंगऱ्याच्या आड बाई चांद उगवला.'लोकगीतात तो सापडतो.. . 'हे चांदणे फुलांनी शिंपीत रात्र आली

धरती प्रकाश वेडी ओल्या दंवात न्हाली'.'.'चंदाराणी का ग दिसतेस थकल्यावाणी.. '.. ' चंद्र आहे साक्षीला.. चंद्र आहे साक्षीला.. '.. 'चांदणे शिंपीत जाशी चालता तू चंचले'.. .'चांद मोहरे चांदणी झरे' .. 'चांद मातला मातला.. त्याला कशी आवरू?' 'रात्र ही पौर्णिमेची.. '.. :उगवला चंद्र पुनवेचा.. '. 'केव्हा तरी पहाटे उलटून रात्र गेली.. '.. चांदण्यात फिरताना माझा धरलास हात.. '.. 'चांदण्यात झुलतो बाई गंध मोगरा…गंधामधुनी भिजतो गं चंद्र साजिरा.. 'आज चांदणे उन्हात हसले तुझ्यामुळे.. '.. 'दे मला गे चंद्रिके.. 'तुम गगन के चंद्रमा हो.. .मै धरा की धुल हु.. '. 'चांद छुपा बादल में.. '.. 'चांद आहे भरेगा.. ' मैंने पूछा चाँद से के देखा है कही.. मेरे यार सा हसी.. ' 'चांद मेरा दिल चांदनी हो तुम.. ' 'चंदा हो चंदा किसने चुरा ली तेरी मेरी निंदिया.. ' 'रात भी है कुछ सुनी सुनी चाँद भी है कुछ मद्धम मद्धम.. 'वो चाँद खिला वो तारे हसे ये

रात अजब मतवारी है.. '.. 'ये चांद सा रोशन चेहरा जुल्फो का रंग सुनहरा.. '

'आजा सनम मधुर चांदनी में हम.. '.. 'चाँद को क्या मालूम चाहता है उसे कोई चकोर.. '.. 'आधा है चंद्रमा रात आधी.. ' .. 'बदली मे छुप गया चांद परदेसी सैया लौट के घर तुम आना'.. 'चांद फिर निकला मगर तुम ना आये.. '.. 'चांद जाने कहा खो गया.. '.. 'चांद आहे भरेगा.. 'ओ चांद जहा वो जाये तू भी साथ चले आना.. कैसे है कहा है वो हर रात खबर लाना.'.'तू चंदा मैं चाँदनी, तू तरुवर मैं शाख रे.. तू बादल मैं बिजुरी, तू पंछी मैं पात रे'.. ..

'निले निले अंबर पर चाँद जब आये

प्यार बरसाये हम को तरसाये.. '

चंद्र माथ्यावर आला तरी चंद्राची एकेक गाणी आठवतच होती.. गाण्यातील चंद्र आणि डोईवरील चंद्र एकरूप झाले होते.. लुकलूकणाऱ्या चांदण्या हसून गाण्याला प्रतिसाद देत होत्या.. अजून काही गाणी राहून गेल्याचे जणू काही सांगत होत्या.

कविकुलगुरू कुसुमाग्रज

ह्यांच्या काव्यपंक्ती आठवल्या ज्यात चंद्र विसावला आहे.

'असे अनेक चंद्र येऊन गेले..  चांदणे देऊन गेले पण चांदणं देण्यासाठी त्यांनी मागितलं होतं मोल माझ्या आकाशाचं..

पण तुझा चंद्र इतका आत्ममग्न..

इतका निस्वार्थ की त्याने माझं आकाश तर राहोच..

पण माझा अंधारही मागितला नाही.. '

अशा रितोने चंद्र शब्दांतून झरतच गेला..

# 48

# बाईपणातील आईपण..



ती एक सतत धडपडणारी मध्यमवयीन आई.. आणि तिच्या डोक्यात नेहमीच एकुलत्या एक मुलाचा विचार असायचा.. अगदी दिवस उजाडल्यापासून त्याच्याच विचारांमध्ये ती व्यस्त असायची.. ऑफिसमधील स्टाफला माहीत झालेले असते की ती आता केवळ 'माझा मुलगा 'या विषयावर बोलणार आहे.. तिच्या मागे तिची थोडी कुचेष्टा देखील होत असे.. मुलाच्या संगोपनात गढलेली ती एक एकल पालक होती.. लाडका मुलगा मुन्ना म्हणजे तिचा जीव की प्राण म्हंटले तरी चालेल.. ही मुन्नाची आई मुन्नाबद्दलच भरभरून बोलत राहायची.. माझा मुन्ना असा.. माझा मुन्ना इतका हुशार की त्याला नेहमीच छान मार्क मिळतात.. मुन्ना किती गुणी मुलगा आहे आणि मुन्ना म्हणजेच माझ्या आयुष्यात सर्वकाही आणि बाकी काहीच नाही.. कुठल्याही गप्पांमध्ये मुन्ना असायचाच.. तिला भान नसायचे की तिच्या असल्या

कौतूकपरायणामुळे काही व्यक्ती दुखावल्या जात आहे.. त्यांना उगाचच न्यूनगंड येत होता आणि काहींना तर वाटत होते की ही मुद्दामच आपल्या जखमेवर मीठ चोळत आहे.. तिच्या तर ते गावीही नसायचे तरीही तिला चुकीचे लेबल लागायचे पण तिचे मुन्नापुराण मात्र अखंड चालूच असायचे.. खूपशी भाबडी आई होती ती जिला स्वतःचे असे विश्व नव्हते.. ऑफिसमध्ये आता हे चांगलेच माहित झाले होते त्यामुळे तिच्या हो ला हो करत सगळेजण ऐकून घेत असत.. तिची जिवलग सखी तिला सावध करू पाहायची.. तिच्या अस्तित्वाची जाणीव करून द्यायची.. 'उद्या मुन्ना मोठा झाला की त्याला त्याचे स्वतःचे विश्व असेल ग मग तुला एकटेपण येऊ शकते तर आजच सावध हो.. ऑफिस व्यतिरिक्त स्वतःचे विश्व निर्माण कर.. आतड्याची माया असली तरी ती इतकीही टोकाची नसावी की ज्यात स्वतःला कुठेच स्थान नाही.. जगण्याचे ते कारण असते हे जरी मान्य असले तरी स्वतःसाठी तू जगलेच पाहिजे.. '.. सखीचे बोलणे ती कधीच मनावर घेत नसे.. तिच्याकडे चमत्कारिक दृष्टीकोन टाकत तिथून निघून जात असे..

बघता बघता मुन्ना लग्नाचा झाला.. आता तिच्या स्वप्नरंजनात सूनबाईंनी प्रवेश केला होता.. त्याला साजेशी आणि

हिच्याही पसंतीची सून सोनपावलांनी घरात आली.. काही दिवसांनी ती मुन्नाच्या बायकोबद्दल म्हणजे आपल्या सुनेबद्दल भरभरून बोलू लागली.. एकंदरीत ठिक चालले होते.. ती खुशीत होती.. सुनेच्या रूपाने आपली मुलीची हौस पूर्ण होत आहे असे म्हणू लागली..

हल्ली हल्ली मात्र ऑफिसमध्ये ती अबोल भासू लागली होती.. मुन्नापुराण आटोक्यात आले होते.. सगळयांसाठी ते फार मोठे प्रश्नचिन्ह होते.. वेगवेगळे तर्कवितर्क लढवले जात होते.. सखीने त्याबद्दल छेडता तिला अश्रू अनावर झाले.. तिच्या मुन्नाला परराज्यात प्रमोशनच्या निमित्ताने जावे लागणार असते.. तिची इच्छा असते की त्याने ते नाकारावे आणि आपल्याजवळच रहावे पण सुनेला थोडी स्पेस हवी असते.. तिला सासूचे प्रेम थोडे जास्त वाटत असते आणि शेवटी असे होते की त्यांचे सुंदर नाते सूनेला बंधन वाटू लागते मग ती सून मुलाला सुचवते की आपण काही दिवस तरी आईपासून दूर राहिले पाहिजे.. आईचे आपल्या मध्ये अडकून पडणं आईसाठी घातक आहे.. स्वतःसाठी जगणे त्या विसरूनच गेल्या आहेत.. तिचा हा निर्णय ऐकताच आई एकदम कोलमडते कारण तिला स्वतःचं आयुष्य मुन्नाशिवाय अशक्य वाटत असते.. तिला खूप मोठा असा मानसिक धक्का बसतो..

खरंतर या गोष्टीची कल्पना तिला तिच्या जिवलग सखीने दिलेली असते पण तरीदेखील ती सजग होत नाही…नाते कसे सुटसुटीत असले पाहिजे.. नात्यांमधली रेघ स्पष्ट असली पाहिजे.. किती जरी ते नाते सुंदर उत्कट असले तरी त्याची सुंदरता आपल्याला जपून ठेवता आले पाहिजे.. मुलाला जन्म दिला म्हणून मुलाशी आपल्या जैविक नाते असते पण ही मुले स्वतंत्र व्यक्तिमत्त्व घेऊन जन्माला आलेली असतात आणि त्या मुलांवर आपण आपलं प्रेम लादू शकत नाही कारण आता त्याचे स्वतःचं वेगळं विश्व निर्माण झालेलं असते तर अशी ही आई मुन्नापासून कधीच मनाने विलग झालेली नसते .. ती विसरून गेलेली असते की आता त्याला पत्नी आणि मुले असे त्याचे विश्व असणार आहे आणि ते विस्तारत जाणार आहे .. या विस्तारलेल्या विश्वामध्ये आईच बोट मात्र नकळत सुटणार आहे.. आई सोबत असणारच आहे पण त्याच्या लहानपणी त्याने आईचे बोट पकडले होते ती घट्ट पकड आता ढिली होणार आहे. हे वास्तव स्वीकारले असते तर तिच्यासाठी आजचे जगणे खूपच सोपे झाले असते.. सखी तिला सांगत असते की ही बघ घरट्यातील चिमणपाखरे आता मोठी झाली आहेत.. भरारी घेत आहे.. कालपरवाच आईने त्यांना चोचीतून दाणा आणून दिला होता आणि चोचीत भरवला देखील होता.. आज चिवचिवाट थांबला आहे पण म्हणून त्यांची आई उदास दुःखी कुठे

आहे..?ती जीवनगाणे गातच आहे.. आपणही हे सारे पाखरांपासून शिकले पाहिजे ना.. मुन्नाच्या आईला कळत होते पण वळत नव्हते.. माझ्या संगोपनात काय त्रुटी राहिली असावी की तो माझ्यापासून दुरावला आहे असा विचार तिला स्वस्थ बसू देत नव्हता.. मुन्ना मनाने नक्कीच दुरावला नव्हता.. आईची भावनिक गरज त्याला होतीच फक्त त्याला आईला स्वतःबद्दल जगायला शिकवायचे होते..

अनेकदा स्त्रीला नेमके काय हवे आहे हे तिलाच कळत नाही.. नात्याचा गुंता आणि त्यात गुरफटलेली ती अशा प्रकारे दुःखाची धनी होते कारण तिच्यामध्ये मायेचा अथांग असा महासागर असतो आणि ती माया काहीशी दुरावली की तिच्यात आत्मविश्वासाची कमतरता येते.. बाईपणाच्या गोष्टीत आईपण ओघाने येत असते.. आईपणा व्यतिरिक्त अनेक छटा खरंतर बाईच्या आयुष्याला असतात पण तिने मनापासून स्वतःला बांधून घेतलेले असते.. मूल अपयशी ठरले तर तिला एक प्रकारचा न्यूनगंड छळत असतो.. ती त्यासाठी आपल्या कुशीला दूषणे देत जाते. मुले मोठी झाल्यावर स्वतःशी संवाद साधत असताना तिच्या तिलाच अनेक गोष्टी ज्ञात होत जातात .. कधीतरी जीवनावरील श्रद्धा डगमगू लागते आणि तसे पाहिले तर परिस्थितीला दोष देण्यात काहीच अर्थ नसतो हेही

तिला मनोमन उमगलेलं असते परंतु ती वेळ निघून गेलेली असते.. अवचित तिला आपला आतला आवाज अचानक गवसतो.. मग तिला मुक्त झाल्यासारखे वाटते..


आज मुन्नाची आई ऑफिसला आली तर अगदी खुशीत दिसत होती.. नियमितपणे योगाभ्यास केल्याने चेहऱ्यावर तजेला आला होता.. वय पाच वर्षांनी कमी झाल्यासारखे वाटत होते.. ती उत्साहाने म्हणाली.. 'सगळ्यांनी उद्या यायचे आहे.. माझ्या पुस्तकाचे प्रकाशन आहे.. छोटेखानी कार्यक्रम मुलाने आयोजित केला आहे.. सुनबाई मागे लागल्या होत्या म्हणून पुस्तकाचे मनावर घेतले तर ते असे प्रत्यक्षात साकार झाले आहे.. पूर्वी नियमितपणे लिहिणारी मी मधली काही वर्षे लिहिणे विसरूनच गेले होते.. लग्नानंतर बहाल झालेले मायलेकराचे शाश्वत नाते मला जगण्यासाठी पुरेसे होते.. मधली वर्षे त्याच्या संगोपनात गेली.. तो मोठा झाला वयाने पण माझ्यातील आई मात्र मोठीच होत नव्हती.. मुन्नाला आईपासून अवकाश हवासा वाटू शकतो हा विचार मी कधीच केला नव्हता.. मग मात्र वास्तवाच्या कुशीत शिरले.. स्वीकारायला वेळ लागला जरा कारण आयुष्यातील ती अनेक वर्षांची सवय होती..  आता लिखाणाचे बोट धरले तर रुसलेले शब्द झरझर मदतीसाठी धावून आले.. आता मात्र मी अखंडपणे

लिहिणार आहे.. खूप काही वाचायचे राहून गेले आहे त्याला आता न्याय द्यायचा आहे.. दोन वर्षांनी ऑफिसमधून निवृत्त झाल्यावर काय करावे हा प्रश्न मनाला भेडसावणार नाही.. तुम्हीही आजच आपल्या आनंदाच्या वाटा शोधा बरे..!.. मनाच्या आरोग्यासाठी हे खूप गरजेचे आहे.. उतारवयात केवळ आर्थिक तरतूद करून चालत नाही.. अशी मानसिक तरतूद करून ठेवली तरच जगणे सुकर होते.. '

तिच्यातील आईला तिच्यातली 'ती' आता गवसली होती.. एकाच ह्या जन्मी जणू फिरुनी नवे जन्मेन मी.. जीवनाला तिच्या नवा आयाम लाभला होता.. ते पाहता ऑफिसने समाधानाचा सुस्कारा टाकला..

## 49

# ओझे विरलेल्या क्षणांचे..



आज अनिकेतचा आहे नवीन ऑफिसमधील पहिला दिवस आणि त्याच्या मनामध्ये आहे थोडीशी अस्वस्थता आणि काहीशी धडधड.. नवीन बॉस कसा असेल याबद्दल तो जरा साशंक असतो. अनिकेतला अथक प्रयत्नानंतर हा ड्रीम जॉब मिळालेला असतो.अनिकेत ऑफिसमध्ये आल्याबरोबर त्याचा बॉस त्याच्याशी हस्तांदोलन करतो आणि त्याची आस्थेने विचारपूस करतो.अनिकेतला अजून बॉसच्या स्वभावाचा अंदाज आलेला नसतो.. असेच काही दिवस जातात त्यानंतर अनिकेतच्या लक्षात येते की आपला बॉस म्हणजे एक सद्गृहस्थ आहे आणि तो आपल्या अडचणी समजून घेत आहे.. कुठल्याही प्रकारचा नकारात्मक दृष्टिकोन त्याच्याकडे नाही आणि उगाचच बॉसगिरी करणाऱ्यांपैकी पण नाही .. त्याच्यातले माणूसपण विशेषतः अनिकेतला मनापासून आवडले होते.. एक दिवस असंच दोघेजण लंचटाईममध्ये बोलत असतात तेव्हा

अनिकेत त्याच्या मनातले भाव व्यक्त करत सांगतो की मला आधी वाटले होते की तुम्ही स्वभावाने खूप कडक असाल.. मी काहीसा दबून गेलो होतो.. वाटले मला सांभाळून घ्याल की नाही?.. पण प्रत्यक्षात तर तुम्ही मला अगदी माझ्या वडिलां-सारखे भासत आहात.. त्यावर बॉस खळखळून हसतात आणि म्हणतात.. 'मी जेव्हा नवीन नोकरीला लागलो होतो तेव्हा माझ्या बॉसने माझ्यावर खूप अशी बॉसगिरी केली होती त्यामुळे मी सतत दबून राहत होतो आणि कुठलेच निर्णय मी घेऊ शकत नव्हतो.उमेदीची काही वर्षे अशीच दबावाखाली सरकारी नोकरीमध्ये गेली.. ताणतणाव नकोसे झाल्यावर त्यानंतर मी हा जॉब घेतला आणि ठरवले की आपण केव्हाही समोरच्या व्यक्तीशी सौजन्यपूर्वक वागूनच त्याचा विश्वास संपादन केला पाहिजे.. मगच त्याच्यावर जबाबदारी सोपवली पाहिजे.. समोरची व्यक्ती संवेदनशील असल्यास त्याला नीटसे आपण समजूनही घेतले पाहिजे.. आधीच आपण नकारात्मक भूमिकेत शिरलो की नात्यातील सहजता हरवून जाते.. व्यवस्थापन विषय शिकत असतांना आमच्या सरांनी मॅनेजमेंट शब्दाची योग्य अशी व्याख्या सांगितली होती.. टू मॅनेज मॅन टॅक्टफुली.. त्यातील टी म्हणजे टॅक्ट असे समज.. माझ्या डोक्यात सरांचे शब्द भिनले आहेत.. आणि तेच मी प्रत्यक्षात अवलंबत आहे.. हाताखालील माणसे मनाने आपल्यासोबत जोडली पाहिजे

कारण सगळ्यांचे ध्येय एकच असते आणि ते म्हणजे कंपनीची प्रगती होय.. '

बॉसचे हे बोलणे ऐकताच अनिकेतचा जीव भांड्यात पडतो आणि तो त्या दिवसापासून अधिकच जबाबदारीने वागू लागतो.. बॉसच्या नजरेमध्ये त्याला सतत उच्चस्थानी राहायचे असते.. आधीच्या नोकरीतला अनुभव त्याचा खूप कटू होता.. त्याला तिथे कधीच समजून घेत नव्हते.. त्याच्याकडून खूप अशी कामे करून घेत होते आणि प्रशंसेचा शब्द कधीच वाटेला आला नव्हता.. साहजिकच त्याचा बॉसकडे पाहण्याचा दृष्टिकोन कलुषित झाला होता आणि आता त्या दृष्टीने त्याने आताच्या नवीन बॉसकडे पाहिले होते परंतु आता त्याची शंका मिटली होती.. कधीकधी आपली मते पूर्वग्रहदूषित असतात जी प्रत्यक्षात तशी नसतात.. आणि मग सोपे अवघड वाटायला लागते.. अनुभवाची एकच फुटपट्टी प्रत्येक माणसाला लावून चालत नाही.बॉस कसा असला पाहिजे जो नेहमीच आपल्याला समजून घेणारा असला पाहिजे.. न सांगता आतले शल्य जाणून घेणारा असला पाहिजे.. पण त्याचेही दोन प्रकार असतात.. माणसाचे असतात तसे.. चांगला आणि वाईट.. असे वर्गीकरण करत गेलो की माणसे ओळखणे सोपे होत जाते.. चांगला माणूस कुठल्याही भूमिकेत गेला तरी त्याचे चांगुलपण तो सोडत नसतो.आपल्या आजूबाजूची आपल्या

आयुष्यात येणारी माणसे नेहमीच बदलत असतात त्यामुळे जगण्याच्या अनुभवात देखील विविधता येत असते.कालचा दिवस उद्या म्हणजे आज येत असतो.

खरंच माणसामाणसातली नाती कशी असतात ना..?ऑफिस काय आणि घर काय सगळीकडे असेच तर असते.इथे कमीजास्त फरकाने प्रत्येकालाच भयंकर अहं असतो.. मनामध्ये अहंकाराच्या भिंती असतात आणि स्वतःविषयी अवास्तव अशा कल्पना देखील असतात परंतू त्यामुळे काय होते की माणसे दुरावत जातात.. अर्थातच व्यक्ती तितक्या प्रकृती हेच खरे आहे.. पायातील वहाण पायातच असली पाहिजे अशा मनोवृत्तीचे लोक असतातच जे नेहमीच हातचे राखून समोरच्या व्यक्तीशी वागत असतात..

यावरून सहजच लक्षात आले की आपल्या आयुष्यात येणाऱ्या व्यक्ती कशा असाव्यात किंवा आपल्याला कोण भेटेल हे आपल्या हातात कधीच नसते.. आपल्याला भेटलेली माणसे सुहृदयी निघाली तर आपण नकळत कृतकृत्य होत जातो.. आता हेच उदाहरण बघा ना.. मेघा त्या घरातील एकुलती एक सून.. जेव्हा घरी आली तेव्हापासून मेघाचे अतिशय लाड आणि कोडकौतुक होत आहे जे तिच्या सासूचे संसारात सुरूवातीच्या काळात अजिबातच झालेले नसतात.. सतत शब्दांचे बाण ती अकारण

सहन करत आलेली असते.. अविचारी लोकांना समजवून सांगण्यात आयुष्य खर्ची पडले होते.. तिला चुकीचे समजणारे लोक आजूबाजूला जास्त होते.एका दिवाळीत मेघाला सासूने पहिला दिवाळसण म्हणून ओवाळले.. उटणे लावून दिले आणि न्हाऊमाखु देखील घातले.. दिवाळीचे प्रसन्न पर्व होते.. सासूचे प्रेम पाहता मेघाला खूप भरून आले.. ती म्हणाली अगदी माझ्या आईप्रमाणे तुम्ही मला जीव लावत आहात.. आज पासून मी तुम्हाला 'अग आई असंच म्हणणार आणि मुलगी म्हणून लाडकोड पुरवून देखील घेणार.. आणि त्या दिवसापासून अहो आईची अग आई झाली.. दोघींचे नाते आजवर बहरतच आले आहे.नातेवाईकांमध्ये तसेच स्नेहीजनांमध्ये त्या दोघींच्या नात्यांची चर्चा होत असे की सासू-सुन हे नाते इतके निखळ, निर्मळ आणि निर्भेळ कसं काय असू शकते? ते नाते म्हणजे आदर्श नाते होते.. अगदी सासूची सासू म्हणायची की थोडे तरी हातचे राखून सुनेशी वागत जा नाहीतर ती डोक्यावर बसेल.. आपली सून इतकी का चांगली वागते हा प्रश्न त्यांना वाटायचे.. यावर मेघा हसून म्हणायची की अहो आजी असे कधी होत नसते.. माणसाला प्रेम दिले तर आपल्याला प्रेम मिळत असते.. आजेसासूने सुरुवातीच्या दिवसांमध्ये खूप खूप असा मानसिक त्रास दिलेला असतो.. अजूनही त्या सुनेला काही ना काही बोलतच असतात.. आपला तो अधिकार आहे असे समजून

मनमानी चालत असे.. हे सर्व मनाच्या तळघरात सासूने बंद करून टाकलेलं असते.. तिला आपल्याला जो त्रास झाला तो आपल्या सुनेला मेघाला होऊ नये असे मनापासून वाटत असते त्यामुळे ती सुनेचे खूप मनापासून काळजी घेत असते.. क्षमाशीलता हे फार मोठे औषध तिला गवसलेले असते.. आपल्या सासूला तर कधीच माफ करून टाकलेले असते.. इथे पण तेच म्हणता येईल की जेव्हा अधिकार आपल्याकडे आलेले असतात तेव्हा सत्ता देखील हातात आलेली असते आणि त्या सत्तेचा वापर कसा करावा हे प्रत्येकाने ठरवायचे असते.. कुणी त्या सत्तेचा वापर सकारात्मकरीत्या करतो तर कोणी नकारात्मकरित्या त्या सत्तेचा वापर करीत असतो.. मेघाची सासू स्वतःचा खूप छळवाद झालेला आहे तर ती आपल्या सुनेचा छळ करू शकते पण 'चांगली व्यक्ती'असल्याने ती तसे करत नाही किंवा एखादीला असे वाटते की मी असा त्रास सहन केला तर मग जगावर सूड घेण्याच्या भावनेतून मी का वागू नये.. त्याप्रमाणे ती आजूबाजूच्या लोकांशी वागत जाते आणि माणसं दुखावली जातात.. आपण आपल्या आयुष्यात नेहमीच ठरवले पाहिजे की आपल्याला नात्यात हिशोबी असून चालत नाही तर आपल्याला सर्वांना बरोबर घेत जीवनाच्या उद्दिष्टापर्यंत पोहोचायचे असते तरच संसार सुखाचा होत असतो.. बदलत्या काळानुसार नात्याचे परीघ

बदलत असतात.. विरलेल्या विझलेल्या क्षणांचे ओझे झुगारून देण्यातच शहाणपण असते.

## 50

## गेले द्यायचे राहून.. तुझे नक्षत्रांचे देणे..



तो पासष्ट वर्षाचा मुलगा आपल्या वडिलांचे उत्तरकार्य मनापासून करत असतो.. कुठलीच कसर त्यात राहू नये असा त्याचा मनापासून प्रयत्न असतो.. दाटलेले दुःखाचे कढ बाजूला सारत गुरुजी सांगतील त्याप्रमाणे पूजा चालली होती.. मनाच्या पटलावर आठवणींचा पट सरसर साकार होत होता.. लहानपणापासून तो आबांना सोडून अगदी नोकरीच्या निमित्ताने देखील दूर गेला नव्हता.. आज नव्वदीचे शिस्तप्रिय आबा निसर्गक्रमाने जग सोडून गेले होते.. अगदी संपन्न आणि समृद्ध आयुष्य जगलेल्या आबांना आपल्या एकुलत्या एक मुलाचा अभिमान नक्कीच होता.. आजवर शेवटपर्यंत घरात ते म्हणतील ती पूर्व दिशा होती.मुली त्यांच्या घरी सुखात होत्या.. फोनवरूनच विचारपूस करत आबांना सांभाळत होत्या.. कुणाचीच काहीच तक्रार नव्हती.. सून संस्कारी घरातील असल्याने मनोभावे सेवा करत होती.. तिच्या सुखाचा किंवा तिला

काय वाटते आहे हे अभावानेच विचारात घेतले जात होते.. सासूच्या माघारी सासऱ्यांचे पथ्यपाणी सांभाळत होती.

वयोवृद्ध आत्याबाई म्हणाल्या.. 'पितरांच्या जेवणात काहीच कमतरता नको.. वडाखीर आणि सोबत पाच मिठाया पण हव्याच हव्या.. तुझ्या आबांना गोड खूप आवडायचे.. सगळे कसे साग्रसंगीत हवे असे सांगून ठेवले होते त्याने माझ्याजवळ.. कावळा पण बघ लगेच शिवला पिंडाला.. '

'हो आत्याबाई.. सगळे काही त्यांच्या मनासारखे होत आहे.. ' मनात मात्र कुठेतरी हा विचार त्याच्या डोकावत असतो की यांनी आयुष्यभर माझ्याकडून मुलाची कर्तव्ये करून घेतलेली तर आहेतच परंतु आता वरती गेल्यावर देखील त्यांनी माझ्याकडून शब्द घेतलेला आहे की माझी उत्तरक्रिया व्यवस्थितच झाली पाहिजे.. नातू म्हणतो की आपण त्या ऐवजी गरीबांना वंचितांना दानधर्म का करत नाही.. त्याला वडील सांगतात की तू तसे आमच्या वेळेस कर.. आमची अशी कुठलीच इच्छा आकांक्षा नाही.. आईवडील जीवित असतांना त्यांची सेवा करणे महत्वाचे असते.. आबा तर अगदी तृप्त तृप्त होते.. आपल्या मताप्रमाणे जगले होते..

तो मनाशी खिन्नपणे हसतो आणि त्याच्या डोळयासमोर मागच्या आठवड्यातील प्रसंग येतो.. त्याच्या एकुलत्या एक मुलाला उच्च शिक्षणासाठी पैसे हवे असतात तर हा लगेच आपले राहते घर गहाण ठेवतो आणि पैशांची जुळवाजुळव करतो.. पत्नी पण आपली बचतगंगा काढून देते.. आपल्या मुलासाठी त्याच्या भविष्यकाळासाठी आपण सज्ज झाले पाहिजे ही भावना त्याच्या मनात असते त्यासाठी तो आपला वर्तमानकाळ बाजूला ठेवतो आणि मुलासाठी तो ठामपणे त्याच्या पाठीशी उभा राहतो.. ते आपले कर्तव्यच आहे असे त्याला वाटते.. इतिहासाची पुनरावृत्ती त्याला नको होती.. हाच प्रसंग जेव्हा त्याच्या आयुष्यात घडलेला असतो जेव्हा त्याला उच्चशिक्षणासाठी खूप पैशांची गरज असते तेव्हा त्याच्या वडिलांनी त्याला ते अजिबात दिलेले नसतात आणि सांगून टाकलेले असते की तुझें तुलाच शिक्षण करायचे आहे.. उगाच इतर मुलांचे पाहून हट्ट करू नको.. शिष्यवृत्ती घेत तो पदवी मिळवतो.. त्याकाळी तो पैसा वडिलांनी दिला असता तर आज त्याचे आयुष्य नक्कीच बदलले असते किंवा तो आणखी प्रगती करु शकला असता परंतु वडिलांनी त्यासाठी स्वतःला असुरक्षित केलेले नसते.. तो काळच कदाचित इतका स्पर्धात्मक आणि आग्रही नसावा आणि मुले पण आग्रही नसावीत.. अंथरूण पाहून पाय पसरावे आणि गप्प बसावे असे सांगण्यात येत होते.. कदाचित

त्यांच्या ठिकाणी ते बरोबरही असतील.. आयुष्यात फार मोठे नुकसान झाले असेही नाही .. प्रगतीचा वेग मात्र मुंगीच्या गतीने झाला.. परंतु आज वडील गेल्यानंतर जी वडिलोपार्जित संपत्ती त्याच्या वाटेला आलेली आहे त्या संपत्तीचा योग्य तो विनियोग करण्यासाठी वयाचा उत्साह त्याच्याकडे नाही.. त्याला संपत्ती मिळणार म्हणून हितशत्रू वाढले आहेत.. काळ आता मागे फिरविता येणे शक्यच नाही.. तरुणवयातील काही स्वप्ने अपूर्णच राहिली होती त्यासाठी त्यानेही हट्ट केला नव्हता.. बुद्धिमत्ता असून त्याला वाव मिळू शकला नव्हता.. बरोबरीची मुले कमी गुणवत्ता असूनही पैशांच्या बळावर पुढे निघून गेली होती.. त्याचाही अट्टाहास नव्हताच.. पितृदेवो भव म्हणत तो कर्तव्ये पार पाडत होता.. वडिलांनी केले ते चूक असेही म्हणत नव्हता पण आपल्या मुलामागे तो ठामपणे उभा राहणार होता.. मुलाला स्वतःजवळ बांधून ठेवणार नव्हता.. पिढीपिढीतील हा सकारात्मक बदल हसतहसत स्वीकारलाच पाहिजे. शेवटी काय तर वेळेला महत्व असते.. .पुन्हा पुन्हा त्याच त्या काळरूपी लाटांना आपण स्पर्श नाही करू शकत.. हातातून बरंच काही अलगदपणे निसटून जाते ज्याचे जगाला फारसे घेणेदेणे देखील नसते.. मनाच्या तळाशी साचत राहते एक खंत किंवा एक जखम.. कितीही विसरायचे म्हंटले तरी बोच असतेच.. आयुष्य वाचायला घेतले की मग ते

लक्षात येते.. आपण स्वीकारण्याची जादू अवलंबत जातो.. मनाला समजावत जातो आणि त्या गोष्टीचा उच्चारही करत नाही.. मधली सँडविच पिढी कमीजास्त फरकाने हे सारे सहन करत आली आहे.. अर्थातच घर घर की कहानी वेगवेगळी असू शकते.

मागच्या पिढीला जे जमले नाही ते आपण करून दाखवले पाहिजे असा चंग त्या मोठ्या झालेल्या पासष्ट वर्षाच्या मुलाने केला.. स्वतःचा भविष्यकाळ सुरक्षित केल्यावर उरलेली रक्कम मुलाचे आयुष्य उभारण्यासाठी वापरली कारण आता काळसुद्धा खूप बदलला आहे.. बाबांचा काळ कधीच मागे पडला आहे.. आता तेच मापदंड नवीन पिढीला लावताच येणार नाही कारण आता त्यांना आहे अटळ स्पर्धा.. नको तितकी असुरक्षितता आणि नको तितकी महागाई.. पूर्वी संपूर्ण शिक्षणाला जितके पैसे लागायचे त्यापेक्षाही जास्त पैसे प्राथमिक शिक्षणाला लागत आहे.. आज त्याला मदतीचा हात दिल्यावर त्याचा मार्ग सुकर होणार होता.. त्याचा मुलगाही त्याच्यासारखाच हुशार आणि मेहनती असल्याने त्याचे नक्कीच चीज होणार होते.. आताही तो शैक्षणिक कर्ज काढणार होता.. पैसा आयुष्यात येत जातो पण महत्व आजच्या वर्तमानकाळाचे असते.. नात्यामध्ये नुसतेच मागणी करत जाणे हेही अन्यायकारक ठरत असते.. आबांनी दाखवला तसा तटस्थपणा

दाखवणे जीवघेणे वाटत होते..  मुलाकडून हक्काने सर्व काही सेवा करवून घेणारे आबा.. व्यवहारी आबा आज काळाच्या पडद्याआड गेले होते.. सोबत तर काहीच नेता येत नाही.. मुलगा आणि सून त्यांच्यातील सर्व चांगल्या गोष्टी आठवून आठवून आल्यागेल्या नातेवाईकांना सांगत होते.. त्यांच्या जीवनात भकास पोकळी निर्माण झाली होती.. कारण आबांचे असणेही सवयीचे झाले होते.. आबा आता केवळ आठवणीत उरले होते..

**ई साहित्य प्रतिष्ठानचे हे तेरावे वर्ष.**

**स्वाती पाचपांडे यांचे हे ई साहित्यवरचे दुसरे पुस्तक.**

स्वाती पाचपांडे या व्यवस्थापनशास्त्राच्या तज्ञ लेखिका. या विषयावर त्यांची पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत. त्याशिवाय त्या अनेक वर्तमानपत्रे व नियतकालिकांतून लिहीतात. महिलांना व्यवस्थापनाची सवयही असते आणि विशेष आवश्यकताही. त्यामुळे अपल्या ज्ञानाचा परीघ त्या गृहविज्ञानापर्यंत नेतात आणि समस्त जगच त्यात सामावून घेतात. या विषयावरील पुस्तकांना अनेक व्यावसायिक प्रकाशकांकडून मागणी असते. परंतू मराठीतील जास्तीत जास्त वाचकांपर्यंत आपले साहित्य जावे म्हणून त्यांनी ई साहित्यची निवड आपल्या पुस्तकांसाठी केली आहे.

स्वाती पाचपांडे यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक आपली पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. म्हणून तर शंभू गणपुले (नऊ पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर (९ पुस्तके), डॉ. वसंत बागुल (१७ पुस्तके), शुभांगी पासेबंद (९ पुस्तके), अविनाश नगरकर ( चार पुस्तके), डॉ. स्मिता दामले (सात पुस्तके), डॉ. नितीन मोरे (२७ पुस्तके), अनील वाकणकर (९), अनंत पावसकर(४ पुस्तके), मधू शिरगांवकर (७),

अशोक कोठारे (बारा हजार पानांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १६ पुस्तके), विनीता देशपांडे (७) उल्हास हरी जोशी(७), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (८), डॉ. वृषाली जोशी(१६), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी(६), डॉ. नंदिनी धारगळकर (८), अंकुश शिंगाडे(५), आनंद देशपांडे(३), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३), अरुण फडके(२) स्वाती पाचपांडे(२) असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी, कसलेले लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये। विशेषीं लोकीं ’इ’यें।

दृष्टादृष्ट विजयें। होआवे जी।